# राजकारणातील महिलांचा सहभाग




दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र

- विशेषांक २०२५ -

# List of Studies

| | |
|---|---|
| 1. | Status of Women Dedicated in Spiritual Field in India |
| 2. | Status of Women in Urban Slums in India |
| 3. | Status of Women in Bharatiya Family |
| 4. | Socio-Economic Status of Tribal Women in India |
| 5. | Status of Nomadic Tribal Women in India with special reference to Rajasthan and Maharashtra |
| 6. | Status of School going Girls in India |
| 7. | Status of Girls in Higher Education in India |
| 8. | Status of women School Teachers in India at Work Place |
| 9. | Status of Working Women in India |
| 10. | Status of Farmer Women in India |
| 11. | Status of Women in Co-operative Sector of India with special reference to Gujrat |
| 12. | The status of Female Domestic Workers in India with special reference to Madhya Pradesh |
| 13. | A Study on Issues and Challenges of Fisher Women in India with special reference to Kerala |
| 14. | Work Life Balance of Female Medical Professionals in India with special reference to Rajasthan |
| 15. | Work Life Balance of Urban Women in India with special reference to Telangana and Karnataka |
| 16. | A study of Work Life balance of Women Scientist with reference to Research Institutes of India |
| 17. | Status of Women in the families of Border Areas in India with special reference to Jammu & Kashmir |
| 18. | Status of Women in the families of Border Areas in India with special reference to Bengal |
| 19. | Status of Women in Naxal Affected Area in India, with special reference to Chhattisgarh |
| 20. | A study on Evil Customs related to Women in Madhya Pradesh with special reference to Malwa region |
| 21. | Status of Women Prisoners in Jammu and Kashmir ' |
| 22. | Study on Status of Women Police in India with special reference to Vidarbha (Maharashtra) |
| 23. | Gender Study of School Syllabus in India |
| 24. | Women related Policies in India with special reference to International Conventions and Conferences on Women : An overview |
| 25. | Role of Women in Indian Parliament while enacting Central Laws (2001-2016) |
| 26. | Status of Women in Politics in India |

# महिला विश्व
# विशेषांक - २०२५

# राजकारणातील महिलांचा सहभाग

## ‘दृष्टि’

स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र

१३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन,

सरस्वती मंदिर शाळेमागे, पुणे ४११००२ (महाराष्ट्र)

मो. ८६६८२१०१७४

**Email :- drishti.pune@gmail.com**

**Website : www.streeadhyayan.org**

(केवळ खाजगी वितरणासाठी)

- **प्रकाशन** : **१० सप्टेंबर २०२५**

- **प्रकाशक**
  दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र
  १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन
  सरस्वती मंदिर शाळेमागे, पुणे ४११००२ (महाराष्ट्र)
  मो. ८६६८२१०१७४
  ईमेल : drishti.pune@gmail.com

- **संपादक**
  डॉ. अंजली देशपांडे
  स्वाती लेले
  रंजना खरे

- **मुखपृष्ठ** :
  श्री. रवि पवार, साकेत कम्युनिकेशन, पुणे

- **भाषांतर**
  सविता काजरेकर

- **मुद्रक**
  संवाद ट्रेडप्रिंट्स
  ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० (महाराष्ट्र)
  मो. ९४२२३२१२२९

- **सहयोग मूल्य** : **रु. १००/– मात्र**

- **ISBN : 978-93-94669-22-2**

या अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय...

बरेच दिवस 'दृष्टि' कार्यकर्त्यांच्या मनात असलेला महिलांच्या राजकीय सहभागाचा विषय, लोकसभेने सर्वानुमते संमत केलेल्या 'नारी वंदन अधिनियम' या ठरावामुळे विशेषांकाच्या रुपात येत आहे. महिलांची आंतरिक शक्ति त्यांना सर्वच क्षेत्रात सहभागी होण्याची प्रेरणा अनादि कालापासून देत आली आहे. परिस्थितीनुसार, कालानुरूप त्यांचे प्रमाण कमी जास्त होत आलं आहे परंतु सर्वच काळात ती शक्ति तशीच राहिली आहे. जगभराचा आढावा घेतला तरी आपल्याला असेच दिसेल. स्त्रीची मानसिकता, तिची समावेशी दृष्टी, तिचं कुटुंबाचं केंद्र असणं, भवतालाच्या हिताचा विचार करणं या तिच्या अंगभूत गुणांमुळे ती सर्वच क्षेत्रात सहभागी आहे.

भारतातील विचारसरणीच्या पार्श्वभूमीवर तर हे अधिक प्रकर्षाने जाणवते. स्वत:च्या, कुटुंबाच्या,आणि समाजाच्या हितासाठी, परिवर्तनासाठी ती पुढे झालेली दिसते आहे. तिच्यावर आलेली कोणतीही जबाबदारी ती याच तत्त्वांचा आधार घेऊन पार पाडते. याच शृंखलेत तिचा शासनकर्ती म्हणूनही सहभाग आहे. पुरातन काळापासून भारतात अनेक राण्यांनी राज्यशकट सांभाळले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, त्यावेळच्या राजकारणातही महिलांचा सक्रिय सहभाग दिसून येतो. पारतंत्र्याच्या काळापासूनच त्या राजकीय प्रतिनिधित्व करीत आहेत. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या मांडणीमध्येही १५ महिलांचा सहभाग होता हे आपण जाणतो. जगभरात असे उदाहरण एकमेव असेल. आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताचे प्रतिनिधित्व हंसा मेहता, विजयालक्ष्मी पंडीत यांनी केले आहे.

आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार त्या त्या देशाची राज्यघटना देशाच्या घटनेने निवडलेल्या नागरिकांना देते. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीपासून (१९५०) महिलांना मतदानाचा अधिकार आहे. महिलांना मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी स्वातंत्र्यापूर्वीच काही जणींनी संघर्ष केला होता. पुढारलेल्या, विकसित म्हणवणाऱ्या देशांमध्ये मात्र यासाठी महिलांना संघर्ष, बलिदान करावे लागले आहे. मतदानाचा अधिकार असल्यामुळे लोकसंख्येच्या ५०%असलेल्या महिला मतदारांचा विशेष विचार केला पाहिजे असे जगभरात सगळीकडेच मानले गेले.विकसित देशांमध्ये त्यांच्या मतांचा प्रभाव प्रतिनिधित्वावर पडतो असेही लक्षात आले. महिलांची साक्षरता, विविध क्षेत्रातील त्यांचा सहभाग, त्यांची विचारशक्ती यानुसार भारतात त्यांचे मतदानाचे प्रमाण वाढू लागले.

आता ते पुरुषवर्गापेक्षा काही ठिकाणी जास्तीही झाले आहे. या अंकात आपल्याला हे वाचायला मिळेलच. निवडणुकीच्या राजकारणातील अनुभवी व्यक्तींचे लेख आपल्या अंकात आहेत. महिला आरक्षणाचा प्रत्यक्ष ठराव आणि त्याचे विश्लेषणही आपल्याला वाचायला मिळेलच. लोकसभेत महिला आरक्षणाचा ठराव होण्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांमधले आरक्षण देशभरात सर्वांनी अनुभवले आहे. तेही आपल्याला या अंकात डोळ्याखालून घालता येईल. महिलांच्या दृष्टिकोनातून हे निवडणुकीचे राजकारण कसे चालते याचा

थोडक्यात आढावा काही आकडेवारीसह घेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. आपल्या प्रतिक्रियांचे आणि सूचनांचे स्वागत आहेच. सर्व लेखक, प्रिंटर आणि वाचक या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद ! अत्यंत नेमक्या, ओघवत्या भाषेत लेखांचे भाषांतर करणाऱ्या श्रीमती सविता काजरेकर यांचेही आभार!

डॉ. अंजली देशपांडे

(सचिव)


**कार्यकारी मंडळ**

**अरुणा सारस्वत – अध्यक्ष**

**डॉ. अंजली विश्वास देशपांडे – सचिव**

**शुभांगी संजय तांबट – सहसचिव**

**डॉ. पुष्पा रानडे – कोषाध्यक्ष**

b

**सदस्य**

| | | |
|---|---|---|
| व्ही. शांताकुमारी | ए. सीता | गीता गुंडे |
| निर्मला आपटे | | रंजना करंदीकर |
| मीनाक्षी पिशवे | | गीता जयंत गोखले |
| डॉ. सुवर्णा रावळ | | पुष्पा नडे |
| भाग्यश्री साठ्ये | | ममता यादव |

# अनुक्रमणिका


- राज्यकर्त्या स्त्रिया

  सुनीला सोवनी ........ ०७
- स्त्रिया आणि राजकारण (१९४७-१९७५)

  डॉ. विद्या देवधर ........ ११
- स्त्रिया आणि राजकारण : आणीबाणी ते २०२४

  डॉ. विद्या देवधर ........ १९
- महिला आरक्षण विधेयकाचा इतिहास

  डॉ. मनिषा कोठेकर ........ २९
- नारी शक्ति वंदन अधिनियम

  विभावरी बिडवे ........ ३६
- आणखी किती-सरपंचपती?

  भीम रासकर ........ ४५
- महिला मतदानाचे वाढते प्रमाण, महिलांच्या नेतृत्वात विकासाची पहाट!

  विजया रहाटकर ........ ५३
- हे आव्हान स्वीकारुया...

  डॉ. मेधा कुलकर्णी ........ ५५
- राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व : एक तुलनात्मक जागतिक आढावा

  डॉ. वरदा संभूस ........ ६३
- राज्यकर्ती अहिल्याबाई

  डॉ. नयना कासखेडीकर ........ ७४
- भारतातील राज्यकर्त्या स्त्रिया

  डॉ. मनीषा दीपक पुराणिक ........ ७८

● भारतीय महिला व राजकारण

अचला शर्मा ........................................................................................ ८३

● १९४७ पासून आजपर्यंत राजकारणात महिलांचा सहभाग

डॉ. स्नेहा भगत ........................................................................................ ८६

● २०२४ लोकसभा निवडणुकीत महिलांचा सहभाग

श्री. अजीत कुमार ........................................................................................ ९०

# राज्यकर्त्या स्त्रिया

**सुनीला सोवनी**

लेखिका, मुक्त पत्रकार, अ.भा. प्रचार प्रमुख,

राष्ट्र सेविका समिती



भारतीय राज्यकर्त्या या विषयाचा प्राचीन काळापासून मागोवा घेताना हे लक्षात घ्यावे लागते की आजचा बहुश: पाश्चात्त्य जीवनदृष्टीतून प्राप्त झालेला राज्य, राष्ट्र, समाज, संस्कृती, कायदा इत्यादी विषयक दृष्टिकोन प्राचीन काळी नव्हता. यशापयशाचे मोजमाप करताना लिंग सापेक्ष भावनाही नव्हती. कर्तृत्व मोजण्याचे निकष पूर्णपणे वेगळे होते त्याला एकात्म जीवनदर्शनाचे, कर्तव्य धर्मनिष्ठ जीवनव्यवस्थेचे अधिष्ठान लाभले होते.

प्रारंभिक काळात परब्रह्म परमेश्वरी चैतन्यशील एकटीच होती. तिला अनेक व्हावेसे वाटल्यावर या शक्तीचे दोन भागात विभाजन झाले एक स्त्री (प्रकृति) तर दुसरा भाग पुरुष. कोणी लहान अथवा मोठा नाही. एकातून दोन झाले त्यांच्यापासून अनेक झाले ते भिन्न रस, रंग, ध्वनी, आकार यातून अभिव्यक्त होऊ लागले. सर्वजण परस्पर संबंधी, सर्वजण परस्पर पूरक...! यामुळेच अतीप्राचीन काळाच्या राज्यकर्त्या स्त्रियांचा अथवा पुरुषांचा उल्लेख अतीशय सहजपणे येतो. मंत्रद्रष्ट्या स्त्रियांची ३६ सूक्ते वेदांमध्ये बद्ध झालेली आहेत; तशाच वेगवेगळ्या क्षेत्रात अग्रणी स्त्रियांची माहितीही मिळते. त्यात अर्थातच मुद्‌गलानी, विष्पला अशा लढाऊ स्त्रियाही आढळतात. मात्र त्यांचा रणधुरंधरपणा त्या स्वत: राज्यकर्त्या होत्या की सेनापती याची माहिती देत नाहीत. मात्र समस्त मानव समाजाला आपल्या कर्तृत्वाचा, स्वामीत्वाचा परिचय करून देणारी वाक्‌भृणी ही ऋषीका आदिवेद ऋग्वेदाच्या १०व्या मंडलात १२५व्या सूक्तात येते. ती म्हणते 'या जगाची अधिष्ठात्री, जगत् स्वामीनी, निर्माणकर्ती, रक्षणकर्ती, सर्वत्र संचारी मीच आहे' ''माझा महिमा स्वर्गाहून श्रेष्ठ आहे'' हे संपूर्ण सूक्त अन्य सर्व सत्तास्थानांचा फोलपणा अधोरेखित करित शक्ति (स्त्री) तत्त्वाची महत्ता, सामर्थ्य सिद्ध करण्यास पुरेसे आहे.

श्रृति काळात म्हणजेच वेद, उपनिषदे, ब्राह्मण, अरण्यके यामधून समाजजीवनाचे, सत्तास्थानांचे, राजांचे वर्णन भेद–भावना विरहित पद्धतीने येते. काळ अतीप्राचीन असल्याने शिलालेखासारखे दृश्य पुरावे उपलब्ध होणे अशक्यच! मौखिक परंपरा व ग्रंथ भांडारातूनच ते शोधावे लागते.

यानंतरच्या रामायण–महाभारत पुराण काळातील राज्यकर्त्या स्त्रियांचे उल्लेख प्रचुर प्रमाणात मिळतात, दृष्टिकोनही समजतो.

वाल्मिकी रामायणात (अनुवाद, गीताप्रेस गोरखपूर) श्रीरामाच्या राज्यारोहणाऐवजी त्याला १४ वर्षे वनात जाण्याची आज्ञा देण्यात आली आहे, हे वृत्त जेव्हा अयोध्येचे राजगुरू वसिष्ठ यांना समजते तेव्हा ते कैकयीला म्हणतात.

'नगन्तव्यं वनं (७–२३–२४) देव्या सीतया शीलवर्जिते। अनुष्ठास्यत रामस्य सीता प्रकृतमासनम्' ।।२३।। (बालकाण्ड सर्ग २७–२३–२४) चारित्र्याचा त्याग करणाऱ्या दुष्ट स्त्रिये, सीता वनात जाणार नाही. ज्या सिंहासनावर रामाचा अधिकार आहे त्या सिंहासनावर सीता बसेल.

रामायणात असाच दुसरा एक प्रसंग येतो. वालीवधानंतर राज्याचा वारसदार म्हणून वीर हनुमंत वालीपत्नी तारेला, 'तू राज्यग्रहण करावे, त्यासाठी तू सर्वार्थाने योग्य आहेस' असे आवाहन करतो. तो म्हणतो 'हे साध्वी, बेटा अंगद त्याचप्रमाणे सर्व वानरगण यांचे हे राज्य तुझ्याचमुळे सनाथ होईल. त्यामुळे आता तूच या राज्याची स्वामिनी हो.' (किष्किंधा– २१–८)

राज्यग्रहण करण्यासंबंधाने केलेले आवाहन दोघींनी स्वेच्छेने फेटाळून लावले. सीतेने रामाबरोबर वनात जाण्याचा निर्णय स्वत: घेतला, तसा हट्ट करून ती वनात गेली. तारेने हनुमंताच्या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही. अंगदाचा राज्याभिषेक झाला. ही दोन्ही उदाहरणे विलक्षण आहेत. दोघेही आवाहनकर्ते अत्यंत श्रेष्ठ, गणमान्य ज्यांच्या शब्दाला कमालीची किंमत होती अशा श्रेणीचे आहेत. अर्थातच मोठा दबदबा असणाऱ्या अयोध्या व किष्किंधा राज्ये सांभाळण्यासाठी सीता व तारा सक्षम असल्याखेरीज अशा प्रकारचा पर्याय मान्यवरांकडून येणार नाही हे उघड आहे.

भारतीय पुराणकथानके राज्यकर्त्या स्त्रियांच्या उल्लेखांनी संपन्न आहेत. मात्र ऐतिहासिक संदर्भ साधनांच्या दृष्टीने अनेक कथांनकांकडे तथ्य म्हणून पाहणे अवघड जाते, तरीही पुराणांमधूनही तत्थ्याधारित राजवंशाचे इतिहासही मिळतात. रचनाकाळानुसार संदर्भ बदलतात. असे असूनसुद्धा सर्वच इतिहासकार चिनी प्रवासी ह्यू एन–सँगच्या कथनाला इतर पुराव्याच्या आधारे मान्यता देतात. त्याच्या ग्रंथात हिमालयाच्या पूर्व–पश्चिम भागातील स्त्री राज्यांचा उल्लेख आला आहे. गढवाल भागात परंपरेने स्त्रियाच राज्य करीत व त्या भागाला सुवर्णगोत्र देश म्हणून ओळखत. वराहमिहीरानेही आपल्या बृहद्संहितेत वायव्य सरहद्द प्रांतातील स्त्री राज्यांची माहिती दिली आहे. या प्रकारचे तुरळक संदर्भ वगळता स्त्रीराज्यांविषयीचा अधिक तपशील आज उपलब्ध नाही.

शीलालेख, ताम्रपट, नाणी, वास्तू, वस्तू, भांडी, चित्रे, शिल्पे, उत्खननात सापडलेल्या भू रचना, कागदपत्रे इत्यादी ऐतिहासिक साधनांच्या आधारे स्त्रीराज्यकर्तीच्या व्यक्तित्वाचे व कर्तृत्वाचे पुरावे सातवाहनी साम्राज्याची महाराणी नागनीकेपासून उपलब्ध होतात. या महाराणीने राज्यशकट चालविले. स्वत:च्या नावाचे नाणे पाडले. वहिवाटीच्या व्यापारी मार्गावर राज्यमहिमा वर्णन करणारा प्रस्तर लेख खोदून आपल्या साम्राज्याचा डंका पिटला आणि हे सर्व ख्रिस्तशताब्दी सुरू होण्याच्या कितीतरी आधीच! महाराणी नागनीकेनंतर अगदी आजपावेतो अनेक सम्राज्ञींनी सबंध भारतवर्षात आपले कर्तृत्व गाजवले, ठसवले. समाजाला प्रेरणा दिली. नागनीकेने संपूर्ण दक्षिण भारतावर राज्य केले. भारताच्या उत्तरेला शक–हूणांपासून अनेकांची क्रूर आक्रमणे झाली त्यावेळी दक्षिण भारतात राज्यशकट हाती घेत विजयपताका फडकत

ठेवणाऱ्या इ.स.नाच्या प्रारंभीच गौतमी बलश्री महापराक्रमी सातवाहनी सम्राट सातकरणी याला घडवत शौर्य, विद्या, कला अशा सर्वार्थाने भरभराट घडवणाऱ्या राज्याचे शकट हाती घेतले होते. हे राज्य सुमारे ४५० वर्षे टिकले तर चौथ्या–पाचव्या शतकात विद्या–वैभव यांनी दुमदुमणारे राज्य सलग १३ वर्षे वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिने सांभाळले. मंदिरांची निर्मिती केली शाक्त–शैव आदि पंथांना एकत्र बांधले.

दक्षिणेवर महिला राज्यकर्त्या आपला अमीट ठसा उमटवत होत्याच, तशाच पूर्वेकडील भौमकरवंशात जगाच्या इतिहासातील एकमेव म्हणता येईल असा पराक्रम ८व्या –९व्या शतकात ओडिशातील भौमकरवंशात घडून आला. सलग ८ पिढ्या महिलांनीच राज्य केले. त्रिभुवन, महादेवी, पृथ्वी महादेवी, गौरी महादेवी असा अलौकितांनी भव्य कामगिरी करून दाखवली.

इ. स. १००० च्या सुमारास काश्मिरमध्ये सुरंगा, दिड्डा यांनी राज्यशकट हाती घेतले होते. गुजरातमध्येही न्यायप्रिय मयणल्ला, कलात्मक जलमंदिर निर्माण करणारी राणी उदयमती राज्यकर्त्या झाल्या होत्या.

सलग ६० वर्षे पोर्तुगीजांना 'दे माय धरणी ठाय' करायला भाग पाडणाऱ्या अबक्का माता–पुत्री धूर्त चाली खेळत लढाया जिंकत होत्या. यांचे राज्य मंगरूळ जवळील. तर त्याच्याही आधी १३ व्या शतकात महाराणी रुद्राम्बाने बलाढ्य यादवांना धूळ चारीत राज्य व्यवस्थेवर पकड मिळवली होती. महाराणी दुर्गावतीने बलाढ्य अकबराशी दोन हात केले तर केळदीच्या चेन्नमाने शिवपुत्र राजारामाला आश्रय देऊन थेट औरंगजेबाला आव्हान देण्याचा महापराक्रम गाजवला. तमिळनाडूची वेलू नचियार ब्रिटीशांना पराभूत करणारी एकमेव स्त्री राज्यकर्ती! राणी कित्तुर चन्नम्मा, राणी झांशीवाली यांच्यासारख्या स्वाभिमानी राज्यकर्त्यांची मोजदाद करणेही अवघड आहे.

तमिळनाडूची मंगमाळ, केरळच्या गौरी लक्ष्मीबाई, सेतू पार्वतीबाई यांनी अतिशय उज्ज्वल कामगिरी पार पाडली आहे. असेच बंगालमधील राणी भवानी, राणी रासमणी यांनी लक्षवेधी कामगिरी पार पाडली आहे.

लोकमाता देवी अहिल्याबाई यांचे त्रिशताब्दी जयंती वर्ष चालू आहे. त्यांच्या कर्तृत्वाला मानवंदना द्यावी तेवेढ थोडीच! उद्योग, शेती, पर्यावरण, शिक्षण अशा प्रत्येक क्षेत्रात त्यांनी देदिप्यमान कामगिरी करून दाखवली आहे.

भारतीय राज्यकर्त्यांचा प्रवास खूप मोठा. प्रत्येक प्रांतात, प्रत्येक जमातीत राज्यकर्त्या महिलांचे उल्लेख मिळतात हे विशेष होय.

सर्वच राज्यकर्त्यांचे एकत्रित अवलोकन केले असता काही सन्माननीय अपवाद वगळता बहुतेक सर्व राजराण्यांकडे अपघातामुळे राजसत्ता आली किंवा बहुधा मुलाच्या नावे त्यांनी राज्य सांभाळले. परंतु आश्चर्य याचेच वाटते की, राज्य सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्याकडे अकस्मात आली असली तरी उत्कृष्ट शासक म्हणून आपला दबदबा त्या कशा काय उत्पन्न करू शकल्या? नागरी सुव्यवस्था उत्पन्न करणे, सार्वभौमत्व अबाधित राखणे, विकासकामांना चालना देणे, आक्रमण परतवणे, अंतर्गत बंडाळी शमवणे, आदर्शवत न्यायनिवाडा करणे अशी अनेकविध कार्ये त्यांनी कशी काय केली असतील?

यातले एक तर्कशुद्ध उत्तर अगदी सुस्पष्ट आहे ते म्हणजे जरी विशिष्ट परिस्थितीमुळे त्यांना राज्य सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारावी लागली असली तरी तशी जबाबदारी न येता सुद्धा सर्व प्रकारचे प्रशिक्षण

त्यांना मिळाले असणार, दरबारी मुत्सद्दीपणाची जाण येण्यासाठी निर्णय प्रक्रियेत सहभाग, लढायांचा सराव, न्यायदान व शासन पद्धतीचे नीतिनिर्धारण या सर्व कामाचे निरीक्षण त्या करत असणार. अशा प्रकारचा अवसर मिळाल्याखेरीज अचानक आलेल्या जबाबदारीतून देदीप्यमान कामगिरी बजावणे केवळ अशक्य ठरते. दरबारी मंडळींबरोबर चर्चा करणे वेगळे व त्यांच्यावर विसंबून निर्णय घेणे वेगळे. या कर्तबगार स्त्रियांचे निर्णय व त्यांनी दाखवलेली धडाडी विसंबनावर आधारित असेल असे वाटत नाही. त्यामुळे ज्या जबाबदारीतून त्यांनी पदे भूषविली ती पदे नामधारी नसून या महिलांमधली क्षमता, तडफ, साहस सिद्ध करणारी होती.

राजपद यशस्वीरित्या सांभाळण्यामागे आणखी एक कारण लक्षात घेण्याजोगे आहे ते म्हणजे त्यांना मिळालेली सर्वसामान्य प्रजेची साथ. एखाद्या बाईला राज्य करणे झेपणारच नाही म्हणून विरोध झालेला कुठल्याच राजवटीत आढळत नाही. उलट यातील बहुतेकींनी राजमातेप्रमाणेच लोकमाता हे दायित्व चोखपणे बजावल्यामुळे त्या समाजात अतिशय प्रिय झाल्या होत्या. सरदार–मनसबदार आदी मंडळींनी काही ठिकाणी बंडाळीचे निशाण उभारले परंतु त्या 'बाईला विरोध' असा दृष्टिकोन नव्हता. राज्यकर्त्या महिलेच्या सामाजिक सामर्थ्याला किरकोळीत घेणाऱ्या शत्रूचा जेव्हा धुव्वा उडाला तेव्हा अशा चुकीची पुनरावृत्ती शत्रूनेही केली नाही. राज्यातील सैनिकांना तर रणरागिणीच्या नेतृत्वाखाली लढण्यात धन्यता वाटे.

राजसत्तेशी संबंधित महिलांची यशोगाथा आणि गुणवैशिष्ट्ये पाहू लागलो की, राजा वा राणी यासारखे भेद जळमटाप्रमाणे वाऱ्यावर उडून जातात. एकाही राज महिलेने स्त्रीपणाची ढाल मिरवली नाही. त्यांचा निश्चय एकच–आपापल्या राज्याची कीर्तिध्वजा अत्यंत उंचीवर नेऊन डोलवायची. अशा कर्तबगार स्त्रिया देशाच्या कुण्या विशिष्ट भागाचे वैशिष्ट्य नव्हे, देशाच्या सर्वभागातून आपली लोकोत्तर कामगिरी बजावणाऱ्या स्त्रिया निपजल्या आहेत. त्या सामाजिक उतरंडीतील सर्व जाती–पंथातून आल्या आहेत. ज्ञात इतिहासाच्या आरंभापासून (राजपरिवारात) अनुलोम–प्रतिलोम (आंतरजातीय) विवाह झाले आहेत. बालविवाहापासून–स्वयंवरापर्यंत सारी उदाहरणे या अभ्यासात मिळतात. राजकर्त्यांमध्ये सतीप्रथा पाळणाऱ्या जशा होत्या तशाच सतीप्रथा धुडकावणाऱ्याही होत्या. सतीप्रथा धुडकावल्याने कुणाचीही अवहेलना झाली नाही. एवढा विशाल भारत देश सगळ्याजणींचे अक्षर शिक्षण उत्तम दर्जाचे झाले असावे. काही चरित्रात तसे उल्लेख मिळतात.

दिड्डा राणीसारखा एखादा अपवाद वगळता सर्व राज्ञींनी चारित्र्य संपन्नतेला अतिशय महत्त्व दिले. आपण ईश्वरीय सत्तेच्या प्रतिनिधी म्हणजेच लोककल्याणासाठीच राज्यकर्ता आहोत, हे भान सर्वांनी जपले. प्रत्यक्ष राजपद मिळाले नसलेल्या राजपत्नींनाही ही जाणीव फार मोठ्या प्रमाणावर होती. त्या जाणिवेतूनच गावे दान देणे, तलाव बांधणे, बाजारपेठा वसवणे, मंदिरांची निर्मती करणे अशा जनकार्यात त्या आघाडीवर असत. कधी स्वत: राजपद सांभाळून, कधी राजमाता बनून, कधी राजपत्नीच्या अधिकारांनी त्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली. ही सदैव स्मरणात ठेवण्याजोगी गोष्ट आहे.

सर्व धर्म–पंथांना बरोबर घेऊन चालण्याचे, त्यांच्यातील एकोपा कायम ठेवण्याचे कसब बहुतांश सर्व राण्यांनी दाखविले. भारतीय राज्यकर्त्या स्त्रियांचा हा प्रवास म्हणजे झळाळणारा सुवर्ण प्रवाह आहेस्फूर्तीदायक, चैतन्यमयी!!

# स्त्रिया आणि राजकारण (१९४७-१९७५)



**डॉ. विद्या देवधर**

हैदराबाद,

शिक्षण एम. ए., एम. फिल., पीएच.डी., सुवर्णपदक उस्मानिया विद्यापीठ,

युजीसी रिसर्च फेलोशिप २००४–०९, लोकसभा रिसर्च फेलोशिप २०१६ – १८.

भारताला अतिशय समृद्ध असा इतिहास आहे म्हणूनच वेदकाल, मध्ययुगीन काल आणि अव्वल इंग्रजी काळातही स्त्रियांचा राजकारणामध्ये सहभाग असल्याची आपल्याला अनेक उदाहरणे मिळतात. स्वातंत्र्योत्तर राजकारणात महिलांचा सहभाग पाहत असताना त्याची बीजे आपल्याला या कर्तृत्ववान प्रशासक आणि वीरांगनाच्या इतिहासामध्ये दिसतात. आधुनिक भारतात १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापासून झाशीच्या राणीसारखे सक्षम नेतृत्व आपल्याला लाभले होते याचा आपणास नेहमीच अभिमान आहे. इंग्रजी सत्तेबरोबर शालेय शिक्षणाचा प्रसार होत गेला आणि सर्वसामान्य घरातील महिलाही शिकू लागल्या. महात्मा गांधीजी यांचे सत्याग्रह आणि भगिनी निवेदिता, मॅडम कामा व पुढे सरोजिनी नायडू आदी महिलांचा सहभाग व नेतृत्व यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला महिलांचा प्रतिसाद मिळत गेला. प्रांतिक सरकारांमध्ये स्त्रियांचा सहभाग, मतदानाच्या हक्काची मागणी यासंबंधित आंदोलनातही स्त्रिया सहभागी झालेल्या दिसतात.

- **घटना समितीतील महिला :**

१५ ऑगस्ट १९४७, भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला, स्वतंत्र झाला. भारतीय स्वातंत्र्याची चाहूल दुसरे जागतिक महायुद्ध संपले तेव्हाच लागली होती. युद्ध संपल्यानंतर भारताला एक स्वतंत्र देश म्हणून घोषित करण्यास ब्रिटिश तयार झाले. ऍटली यांनी १९ फेब्रुवारी १९४६ रोजी भारतीय घटना समितीची स्थापना करण्यासंबंधीचे संकेत पार्लमेंटमध्ये दिले. नऊ डिसेंबर १९४६ रोजी भारतीय घटना निर्मितीच्या पहिल्या सभेत २९६ सभासदांपैकी २०७ सदस्य उपस्थित होते. २९ ऑगस्ट १९४७ रोजी घटनासमितीमधील मसुदासमितीच्या अध्यक्षपदी डॉक्टर भीमराव आंबेडकर यांची नेमणूक झाली. घटना समितीमधील सर्व १५ महिला सदस्यांना भारतीय समाज आणि राजकीय परिस्थितीचे आकलन होते, जागतिक घडामोडींचे भान होते. भारतीय इतिहास, संस्कृती व परंपरा यांची जाण होती. परिवर्तन होत असताना शांतीपूर्ण पद्धतीने समाजाचा विकासही कसा होत जाईल याबद्दल महिलांनी गंभीरपणे विचार केला होता. सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, राजकुमारी अमृत कौर आदि सर्व सभासद भगिनी, स्वातंत्र्य आंदोलन आणि समाजकार्य यांच्याशी अनेक वर्षे निगडित होत्या. घटना समितीच्या सर्व चर्चा आज

उपलब्ध आहेत. या महिला सभासद, स्त्रियांच्या प्रश्नांबरोबर, शिक्षण, न्यायव्यवस्था, धार्मिक स्वातंत्र्य, अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीयांच्या समस्या, समान नागरी कायदा या विषयात सूचना करित काही सुधारणाही सुचवित होत्या. सुचेता कृपलानी आणि अम्मू स्वामीनाथन ध्वजसमितीत होत्या. रेणुका रे, दाक्षायणी वेलायुधान या घटना समितीतील सदस्यांबरोबरच पद्मजा नायडू, उमा नेहरू, श्रीमती जयश्री या अंतिम सरकारमध्ये सभासद होत्या. बेगम एझाज रसूल, हंसा मेहता, पूर्णिमा बॅनर्जी, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, मालती चौधरी, कमला चौधरी आणि एनी मस्कारने याही घटना समितीच्या सदस्य होत्या. घटना समितीमध्ये केवळ १५ महिला होत्या पण अंतिम निर्णय घेताना त्यांच्या मताचा जरूर विचारही होत होता हे महत्त्वाचे. चर्चांमध्ये सहभागी होत या महिलांनी आपले विचार ठामपणे मांडत अनेक नवे मुद्देही उपस्थित केले होते.

भारतीय घटना परिवर्तनशील आहे. काळानुसार होणाऱ्या बदलांबरोबर घटनेमध्ये दुरुस्ती करण्याची सोय आहे. अशा या घटना निर्मितीत स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे, तसेच घटना दुरुस्ती विधेयकाकडे प्रारंभकालीन महिला खासदारांनी नेहमी पक्षभेद विसरून सकारात्मक पद्धतीने पाहिले आहे. जनतेची मानसिकता या महिलांना समजत होती म्हणूनच आवश्यक ते बदल सुचवताना लोक समजुतींना फार मोठे धक्के देणे त्यांनी टाळले आहे. लोकसभा आणि राज्यसभेतील महिला खासदारांसमोर घटना समितीतील या देशभक्त व बुद्धिमान महिलांचा आदर्श आहे.

- **मतदानाचा आग्रह, निवडणूक प्रचार :**

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतातील सर्व प्रांतातून अनेक महिलांना राजकीय परिस्थितीचे भान आले होते आणि आपल्या हक्कांची जाणीव विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच त्यांना झाली होती. त्यासाठी जमेल तसे प्रयत्न करण्यासही त्या संघटित होत होत्या. भारतीय प्रतिनिधींना सत्तेत सहभागी करून घेण्याचा भारत सरकारने १९१९ मध्ये विचार केला त्यावेळी रमाबाई रानडे, सरलाबाई नाईक यांच्यासह मार्गारिट कझिन्स यांनी एक निवेदन देऊन महिलांना मतदानाचा हक्क मिळावा अशी विनंती केली होती. चार महिने या विषयावर चर्चा झाली आणि त्यानंतर शिकलेल्या स्त्रियांना मताधिकार मिळाला पाहिजे असा कायदा झाला. मुंबई येथील रमाबाई चेंबूरकर या १९३८ पासून पार्ले अंधेरीमधून मुन्सिपालिटीमध्ये लोकनियुक्त सदस्य होत्या. हिंदू महासभेच्या प्रतिनिधी रमाबाईंनी मार्केट व गार्डन समितीच्या अध्यक्ष म्हणून जे काम केले त्यामुळेच आज या भागात उत्तम आणि मोठा फळ व भाजी बाजार विस्तारला आहे. १९५२ मध्ये कॉलराग्रस्तांसाठी त्यांनी शुश्रुषा व प्रथमोपचार केंद्र चालविले. १९६२, ६५ आणि ७१ च्या युद्धकाळात महिलांना संघटित करून अनेक सैनिक कुटुंबांना व सरकारला मदत निधीही पाठवला होता. महिलांचे अशातऱ्हेचे कार्य भारतभर स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकातच मोठ्या प्रमाणात चालू होते. १९६० च्या दशकातही देशभक्तीचा आणि समाजसेवेचा भाग म्हणून महिला राजकारणात सहभागी होत होत्या. १९५७ मध्ये भारतीय जनसंघाचे मुंबईतील पहिले आणि एकमेव विधानसभा उमेदवार मधुकर महाजन यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे एकत्रितपणे (युतीमधून) निवडणूक लढवली. मधुकररावांच्या चेंबूर मतदारसंघात

लोकसभेसाठी पिटर अलवारीस उमेदवार होते. तेव्हा मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, लीला अलवारीस यांच्याबरोबर सुशीलाताई महाजनही निवडणूक प्रचारात भाषणे करण्यास जात होत्या. त्या काळात महिलांनी वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये जाऊन लोक जागृती करणे, लोकांच्यात मिसळणे ही गोष्ट दुर्मिळ असतानाही सर्व पक्षांनी महिला कार्यकर्त्यांना सातत्याने पाठिंबा दिला आणि जनतेनेही ह्या महिलांचे स्वागत केले होते असे आजही सुशीलाताई महाजन मोठ्या समाधानाने सांगतात. मुंबईमधील निर्मलाताई शेंडे १९६२ पासून जनसंघाचे काम करू लागल्या. महिलांमध्ये काम वाढवायचे असा विचार करून कामकरी कष्टकरी समाजात प्रौढ साक्षरता वर्ग त्यांनी सुरू केले, गुन्हेगारी व दारू गाळण्यासारखे काम करणाऱ्या लोकवस्तीत सुद्धा जाऊन महिला जागृतीचे काम करत राहून तेथील मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. अशा या कार्यकर्त्या महिला पुढे महापालिका, विधानसभा आणि लोकसभा उमेदवार म्हणून निवडणुका लढवत गेल्या. १९५२ मधील पहिल्या लोकसभेत २४ महिला खासदार होत्या. ही संख्या पुढे थोडी थोडी वाढत गेलेली आपल्याला दिसते. प्रारंभ काळात निवडणुकीमध्ये सहभागी असलेल्या महिला मुख्यतः स्वातंत्र्य आंदोलनात काम केलेल्या कार्यकर्त्या होत्या. देशभक्तीचे एक माध्यम म्हणून त्या राजकारणाकडे पाहत होत्या.

- **महिला खासदार :**

राज्यसभेतील खासदार निवडीचे नियम लोकसभेपेक्षा वेगळे आहेत. राज्यातील अनुभवी आणि कार्यक्षम माणसे राज्यसभेत प्रतिनिधित्व करून, भारतीय राजकारणामध्ये अर्थपूर्ण योगदान देतील असे घटना समितीच्या सभासदांना वाटत होते. राज्यसभेतील पहिल्या पिढीतील महिला, स्वातंत्र्य आंदोलनाबरोबर अन्य सामाजिक कामातही भाग घेत होत्या. राजकुमारी अमृत कौर, अम्मू स्वामीनाथन या अखिल भारतीय महिला परिषदेच्या संस्थापक समितीच्याही सदस्य होत्या. लक्ष्मी मेनन आणि नंदिनी सत्पथी याही महिला परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष होत्या. बेगम अझिज रसूल, अम्मू स्वामीनाथनसारख्या काहीजणी स्थानिक सरकारी आणि हंगामी लोकसभेच्याही सभासद होत्या. सामाजिक संस्थांमध्ये या महिलांचा अनुभव, त्यांनी तेथे केलेले नेतृत्व हे प्रारंभ कालीन राज्यसभा सदस्यांच्या कामकाजामध्ये ठळकपणे लक्षात येत होते. पद्म पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महिलांबरोबर अभिनेत्री, लेखक, कलावंत महिलाही राज्यसभेमध्ये होत्या. श्रीमती रुक्मिणी देवी अरुंडेल (५२ ते ६२) यांनी अर्थसंकल्पावर चर्चा करताना सांगितले की ज्ञान मिळेल आणि जीवनदृष्टी सुधारेल अशा पद्धतीने शिक्षण दिले पाहिजे. भारती रे, मार्गरिट अल्वा, नजमा हेपतुल्ला अशी अनेक उदाहरणे देता येतील. हिंदू विवाह कायदा १९५५ च्या अंतर्गत असलेल्या स्पेशल मॅरेज ॲक्टमध्ये कायदेशीर विभक्तपणाची सोय नव्हती ही गोष्ट सर्वप्रथम सीता परमानंद यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली होती आणि राज्यसभेचे हे पहिलेच विधेयक एका स्त्रीच्या प्रयत्नांनी संमत झाले, या घटनेचा उल्लेख सरकारी अहवालामधूनही आहे. नामनिर्देशित खासदार शकुंतला परांजपे यांनी महाराष्ट्रात कुटुंब नियोजनासंबंधी खूपच कार्य केलं होतं आणि त्यांच्याच प्रयत्नांमुळे कुटुंब नियोजन हा आरोग्य विभागाचा महत्त्वाचा कार्यक्रम ठरवला गेला. शकुंतलाबाईंनी मांडलेल्या या विषयाचे प्रसार माध्यमांनी मोठे स्वागत केले. संवेदनशील महिला खासदार महिलांच्या प्रश्नावर बारकाईने अभ्यास व चिंतन

करून तो प्रश्न नीट समजूनही घेत. साध्या-भोळ्या, अशिक्षित आणि मेहनती भारतीय महिलांना, अनेक संकटांचा खंबीरपणे सामनाही करावा लागतो याचे भान महिला खासदार व आमदारांना नेहमीच होते.

लोकसभेतील आणि विधानसभेतील महिला या लोकप्रतिनिधी असतात, आपल्या प्रभागातील लोकांशी त्यांचा सातत्याने संबंध येत असतो आणि त्यांचा हा अनुभव सभागृहातील त्यांच्या वक्तव्यामधून, प्रश्नांमधून स्पष्ट होतो. स्वतंत्र भारताच्या पहिल्या आरोग्य मंत्री राजकुमारी अमृत कौर, सोळा वर्षे गांधीजींच्या सहाय्यक होत्या. हंगामी लोकसभेत काँग्रेसच्या सभासद होत्याच पण पहिल्या लोकसभेच्याही खासदार झाल्या. १९५७ मध्ये त्यांची नियुक्ती राज्यसभेवर झाली. वैद्यकीय शिक्षणासाठी ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सची दिल्लीमध्ये स्थापना करण्यात राजकुमारींनी विशेष प्रयत्न केले होते. आरोग्य आणि शिक्षण या दोन प्रश्नांच्या माध्यमातून अधिकाधिक देशसेवा करायचे राजकुमारी अमृत कौर यांनी ठरवले होते. पीत पत्रकारिता आणि स्वैराचार याकडे सभागृहाचे लक्ष वेधून त्यावर अंकुश लावण्यासंबंधीच्या सूचना लक्ष्मीकांतम्मा आणि अनेक सदस्यांनी वारंवार केल्या होत्या. प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरा विवाह केला तर त्या प्रथम पत्नीला होणारा त्रास सुभद्रा जोशी यांनी सभागृहात आग्रहाने मांडला आणि पुढे त्या संबंधात कायदाही झाला. महिला लोकप्रतिनिधी सभागृहात अधिकाधिक वेळ उपस्थित राहत असतात हेही सर्वेक्षणामधून सिद्ध झाले आहे. याशिवाय आपल्या कामाकडे आणि मतदारांकडे अधिक जबाबदारीने पाहण्याचा त्यांचा आग्रह असतो. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पंचवीस-तीस वर्षांच्या कालखंडात सर्वसामान्य महिलांपर्यंत राजकारण पोहोचवणे हेही एक आव्हान होते आणि त्यासाठी अनेक महिला कार्यकर्त्यांनी महिलांमध्ये जागृती करण्याचे महत्त्वाचे काम केले. छोट्या छोट्या वस्त्यांमधून शिक्षण, स्वच्छता, आरोग्य, स्वयंरोजगार असे अनेक उपक्रम सुरू केले अनेक राजकीय पक्षांचे स्वतंत्र महिला विभाग याच प्रारंभ काळात सुरू झाले आणि राजकीय घडामोडींमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय ठरू लागला.

- **देश-विदेश :**

बुद्धिमान आणि कर्तृत्ववान महिलांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा स्वतंत्रपणे उमटवला होता. सरोजिनी नायडू यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सभांमधून सातत्याने महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडली तर मॅडम कामा यांनी १९०७ च्या ऑगस्टमध्ये स्टटगार्ड येथे स्वतंत्र भारताचा झेंडा फडकवला होता.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेसाठी १९४८ मध्ये हंसा मेहता यांनी भारतीय महिलांचे अधिकार आणि कर्तव्य या विषयाचे एक प्रारूप तयार केले. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या, मानवाधिकार संबंधीच्या पत्रकावर हंसाजींच्या या लेखनाचा प्रभाव दिसतो. युनेस्कोच्या भारतीय प्रतिनिधी मंडळाच्या प्रमुख पदाची जबाबदारी राजकुमारी अमृत कौर यांच्यावर सोपवली होती. युनोस्कोमधील त्यांच्या भाषणाचे मोठे स्वागत झाले होते आणि यामुळे भारतीय महिलांचा सन्मानही वाढला होता. युनायटेड स्टेट्सकडून काही काळ घटना समितीचे सदस्य राहिल्यानंतर विजयालक्ष्मी पंडित यांची भारताच्या रशियामधील राजदूत म्हणून नेमणूक झाली होती.

## ● रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले :

सत्याग्रह आणि आंदोलने यांच्या पन्नास वर्षे आधीपासून इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव सुरू होते. शेकडो क्रांतिकारक फासावर चढले, हजारोंना सक्षम कारावास भोगावा लागला आणि भारत स्वतंत्र झाला. तेव्हा बहुसंख्य संस्थानिक भारताच्या एकछत्री केंद्रीय सत्तेमध्ये विलीन झाले. काश्मिरमध्ये घुसलेल्या पाकिस्तानी सैन्याला भारताने परतवून लावले. हैदराबाद आणि गोवा मात्र भारत सरकारने नंतर जिंकून घेतले. स्वातंत्र्यानंतर झालेल्या या लढ्यामध्ये महिलाही विविध माध्यमातून सहाय्य करीत होत्या.

## ● हैदराबाद मुक्ती संग्राम :

हैदराबादमध्ये स्वातंत्र्याची जाणीव १९ व्या शतकाच्या अखेरीपासूनच प्रबळ होत गेली. १९३८ मधील 'वंदे मातरम' सत्याग्रह हे त्यातील महत्त्वाचे पाऊल म्हणता येईल. या काळात सत्याग्रहींना महिलांनी विशेष मदत केली होती. मुस्लिम करत असलेल्या धर्म परिवर्तनाचे प्रयत्न थांबवण्याचा आणि कासार, टांगेवाले व फुलवाले असे अनेक व्यवसाय हिंदूंनी करावेत असा प्रयत्न हिंदुमहासभेने केला. मुस्लिम कासाराच्या हातून बांगड्या भरू नयेत म्हणून, वीर वामनराव जोशी यांच्या पत्नी सरस्वती बाईंबरोबर, दंडणक व कुर्वलकर यांच्या आईही घरोघरी बांगड्या भरायला जात होत्या. खादी वापरणे आणि सूतकताई हे गांधीजींचे कार्यक्रम महिलाच मोठ्या प्रमाणावर राबवत होत्या, ज्याला निजामाचा विरोध नव्हता. १९४२ च्या चळवळीमुळे हैदराबाद संस्थानातील अनेक प्रमुख पुढारी आणि पुरुष कार्यकर्ते तुरुंगात होते. २ ऑक्टोबरला गांधी जयंती साजरी करण्याचे महिलांनी ठरवले त्याला मात्र निजामाने परवानगी नाकारली. निजामाच्या बंदीला न जुमानता टी. रामस्वामी, त्यांच्या पत्नी वनमाला आणि बहिण कमलाबाई, विमलाबाई मेलकोटे या मंडळींनी गुप्तपणे सभा घेण्याचे ठरवले परंतु त्यापूर्वीच पद्मजा नायडू यांना अटक झाली परंतु सभा घ्यायचीच असे ठरवून ज्ञानकुमारी हेडा भूमिगत झाल्या. दोन ऑक्टोबरला सायंकाळी सर्वजण एकत्र जमले, मुसलमानी वेशात, पडद्याच्या गाडीत बसून सर्व सभेच्या ठिकाणी पोहोचले आणि सभाही घेतली अशी आठवण ज्ञानकुमारी हेडा यांनी लिहून ठेवली आहे. भारतीय स्वातंत्र्याचे पडघम वाजू लागले. त्याचवेळी हैदराबादमध्ये मात्र रझाकारांच्या बेबंद वागणुकीला, निजामाचाही आशीर्वाद मिळत राहिला. भारतात सामील व्हायचे नाही असे तर निजामाने ठरवले होतेच, पण येथील मुसलमानांच्या अत्याचारांकडे, जाळपोळ- लुटालुट, सक्तीची धर्मांतरे आणि महिलांची असुरक्षितता याकडे निजामाने पूर्णपणे दुर्लक्ष केले. १९४७ नंतर केवळ वंदे मातरमच्या घोषणा देत तरुण मुला-मुलींनी काढलेल्या प्रभात फेऱ्या किंवा सरकारी इमारतींवर तिरंगा झेंडे लावणे, यापलीकडे जाऊन सशस्त्र प्रतिकार करण्याचे निजाम सरकारातील जनतेने ठरवले. गुप्तपणे शस्त्रे गोळा करणे, दारूगोळा पुरवणे, बंदुका आणि पिस्तुले यांची वाहतूक करणे या कार्यामध्ये महिलांनी निर्भीडपणे भाग घेतला होता. यावेळी सिंधुताई भालेराव आणि अन्य महिलांसह लोकजागृतीचे, पत्रके छापणे-वाटणे अशी अनेक प्रकारची कामे केली. सरस्वतीबाई बापट यांनी तर आपल्या दोन वर्षाच्या मुलासकट तीन महिने तुरुंगवास भोगला. दगडाबाई शेळके यांनी बंदूक चालवण्याचे आणि लढाईचेही शिक्षण घेतले. घोड्यावर बसून पुरुष वेष धारण करून, एका हातात बॉम्ब घेऊन, आपल्या

अपंग मुलासह त्यांनी निजामाच्या छावणीवरही हल्ला केला होता. त्यासाठी तुरुंगवासही भोगला. त्यांच्या या सततच्या क्रांतिकारी मोहिमांमुळे घरामधून त्यांना विरोध होत होता. तेव्हा त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या संसारसुखाचीही स्वहस्ते होळी केली, यासारखे धैर्य अगदी दुर्मिळ आहे. स्वतंत्र भारतात ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या सभासद म्हणूनही दगडाबाईंनी काम केले होते. २०१३ मध्ये वयाच्या ९८ व्या वर्षी मराठवाड्यातील या झाशीच्या राणीचे, दगडाबाईंचे निधन झाले.

- **गोवा विमोचन :**

स्त्रियांचे कर्तृत्व आणि धैर्य याचा प्रत्यय स्वातंत्र्योत्तर काळातील गोवा विमोचन आंदोलनातही आला. पोर्तुगीजांना गोव्याच्या खाली दक्षिणेला पश्चिम किनाऱ्यावर आपले साम्राज्य वाढवता आले नाही याचे श्रेय उल्लाळच्या राणी अबक्काला दिले जाते. गोव्यामध्ये पोर्तुगीजांना १९२८ सालापासून विरोध होत गेला. पहिल्या स्वातंत्र्य सेनानी महिला म्हणून बर्था (Berta) आणि डॉ. बीटराईस (Beatrice) यांना दिले जाते. १९४५ मधील गोवन युथ लीगची बर्था संस्थापक सदस्य होती आणि डॉक्टर टी. बी. कुन्हा(cunha) हे १९४६ ते ५३ पोर्तुगीजांच्या तुरुंगात होते तेव्हा त्यांचे वृत्तपत्र बर्था यांनी चालवून लोकजागृतीचे महत्त्वाचे काम केले होते. डॉ. बीटराईसने मुंबईतील पोर्तुगीज दूतावासात विरोध नोंदवून पंतप्रधान नेहरूंपर्यंतही गोव्याचा प्रश्न पोहोचवला होता. १९४३ मध्ये 'गोवा सेवा संघ' सुरू झाला. प्रमिलाबाई जांबौलीकर मुलींसाठी खादी निर्मितीचे वर्ग घेत आणि स्वतःही खादी वापरत होत्या. वत्सला कीर्तने यांना १८ जून १९४६ रोजी मडगाव मध्ये जेव्हा अटक झाली तेव्हा, ललिता कंटकसह ४० महिलांना घेऊन प्रमिलाबाईंनी पोर्तुगीजांवर मोर्चा नेला. उमाबाई शिराळे, इंदिरा भिसे, वत्सला कीर्तनी, जीवन तारापूरकर, शारदा पेनकर कामत, मुक्ता तारापूरकर याही त्यांच्या सहकारी होत्या. ६ जून १९४८ रोजी पोर्तुगीजविरोधी आंदोलनात प्रमिलाबाईंना अटक होऊन कारावासही भोगावा लागला होता. गोवा स्वतंत्र झाल्यानंतर गोव्याला महाराष्ट्रात विलीन न करता स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा अशी आग्रही भूमिका घेऊन प्रमिलाबाई आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. डॉ. रतन खंवटे, शशीकला होराडकर, शालिनी लोयलेंकर, लिबिया लोबो सरदेसाई अशा अनेक स्वातंत्र्यसैनिक महिलांची नावे आदरपूर्वक घेतली जातात. 'चले जाव' चळवळीतील कार्यकर्त्या सिंधु देशपांडे यांनी महाराष्ट्रातून गोव्यामध्ये येऊन २३ जून १९५४ रोजी भारताचा राष्ट्रध्वज फडकावला आणि पोर्तुगीजांचा तुरुंगवासही भोगला. तुरुंगात त्यांच्याबरोबर सुधाताई जोशीही होत्या. लक्ष्मीताई पैगणकर यांना १७ फेब्रुवारी १९५५ रोजी तिरंगा बाळगला आणि अन्य देशद्रोही कारवायांच्या संशयावरून अटक होऊन मार्च १९५९ पर्यंत चार वर्षे पोर्तुगीजांचा तुरुंगवास सोसावा लागला. सुधाताई जोशी यांच्या नेतृत्वाखाली ४ एप्रिल १९५५ रोजी अनेक महिलांनी सत्याग्रह केला. सुधाताईंच्या भगिनी आशा फडके याही स्वातंत्र्यसैनिक होत्याच पण उत्तम कीर्तनकारही होत्या. कीर्तनाच्या माध्यमातून त्या स्वातंत्र्य आंदोलनाचा प्रचारही करीत होत्या. भारतीय स्वातंत्र्ययुद्धात या जागरूक आणि धाडसी महिलांचा सहभागही लक्षणीय आहे.

- **महिला मंत्री आणि इंदिरा गांधी :**

भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात राजकुमारी अमृत कौर केंद्रीय आरोग्यमंत्री होत्या. त्यानंतर मात्र अनेक वर्षे महिलांना कॅबिनेट मंत्रीपद मिळाले नव्हते. सहाव्या आणि नवव्या मंत्रिमंडळात सरोजिनी महर्षी,

नंदिनी सत्पथी, सुशीला रोहतगी, सरोज खापर्डे यासारख्या अनुभवी महिला राज्यमंत्री होत्या. सरोजिनी नायडू–उत्तर प्रदेश, पद्मजा नायडू– पश्चिम बंगाल, विजयालक्ष्मी पंडित– महाराष्ट्र या महिलांनी राज्यपाल पद भूषविले होते. भारतामध्ये आजपर्यंत १८ महिलांनी मुख्यमंत्रीपद भूषविले आहे. पहिल्या महिला मुख्यमंत्री सुचेता कृपलानी या कट्टर गांधीवादी आणि स्वातंत्र्यसैनिक होत्या. १४ ऑगस्ट १९४७ रोजी रात्री बारा वाजता त्यांनी गायलेल्या वंदे मातरम् या गीताने स्वतंत्र भारतात स्वातंत्र्याचा जयघोष झाला होता. १९५२ आणि ५७ मध्ये खासदार म्हणून त्या दिल्लीतून लोकसभेत गेल्या. २ ऑक्टोबर १९६३ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री झालेल्या सुचेता कृपलानी, कठोर आणि शिस्तप्रिय होत्या. त्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांचा ६२ दिवस चाललेला संप अतिशय कौशल्याने हाताळला. जून १९७२ ते मार्च १९७३ आणि मार्च १९७४ पासून डिसेंबर १९७६ पर्यंत नंदिनी सत्पथी ओडिशाच्या मुख्यमंत्री होत्या. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षातर्फे, ऑगस्ट १९७३ मध्ये गोव्याच्या मुख्यमंत्री म्हणून शशिकला काकोडकर यांची नियुक्ती झाली. एप्रिल १९७९ पर्यंत त्यांनी समर्थपणे कारभार सांभाळला.

भारतीय स्वातंत्र्यापासून १९७७ पर्यंत नेहरू कुटुंबाकडेच  पंतप्रधानपदाची सूत्रे होती. फक्त दीड वर्ष १९६५ आणि ६६ मध्ये लालबहादूर शास्त्री पंतप्रधान होते. त्या कार्यकाळात आपण पाकिस्तानचा सपशेल पराभव केला होता. भारताच्या एकमेव महिला पंतप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी म्हणजे मूर्तिमंत धैर्य होय. १९६६ पासून १९७७ पर्यंत त्या सलग तीन वेळा पंतप्रधान झाल्या होत्या. १९८० ते ८५ पर्यंत या कालखंडासाठी त्यांची चौथ्यावेळी निवड झाली होती परंतु त्यांच्या दुर्दैवी हत्येमुळे हा कार्यकाळ १९८४ मध्येच संपला. १९५० च्या दशकात पंतप्रधान नेहरू यांच्या खाजगी सचिव म्हणून त्यांना मदत करताना त्यांनी राजकारण आणि भारताची मानसिकता याचे बारकाईने अवलोकन केले होते. पंडितजींच्या निधनानंतर १९६४ मध्ये राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यानंतर लालबहादूर शास्त्रीजींच्या सरकारात इंदिराजी सूचना आणि प्रसारण मंत्री होत्या. शास्त्रीजींच्या दुःखद आणि आकस्मित निधनानंतर इंदिराजी पंतप्रधान झाल्या. इंदिराजीचा पंधरा वर्षाचा हा कालखंड स्वतंत्र भारताच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचा मानला जातो. केवळ भारतीय राजकारणच नव्हे तर भारताचे अर्थकारण, आंतरराष्ट्रीय व्यापार, लोकशाही मूल्य आणि भारतीय सार्वभौम सत्ता या सर्वच क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण आणि वादग्रस्त घटना या काळात घडल्या. १९६९ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पडलेली फूट ही अतिशय महत्त्वाची घटना होती. १९७१ चे पूर्व आणि पश्चिम सीमेवर जिंकलेले भारत पाकिस्तान युद्ध आणि बांगलादेशाची निर्मिती म्हणजे इंदिराजींच्या धैर्याचे आणि दृढनिश्चयाचे महत्त्वाचे उदाहरण आहे. बांगलादेशाची निर्मिती म्हणजे केवळ लोकांच्या इच्छेप्रमाणे आलेल्या सरकारची केवळ निर्मितीच नव्हती तर कोणत्याही प्रांतातल्या, देशातल्या मानवाधिकारांचे रक्षण होईल असे ठोस आश्वासन भारताने दिले होते. सिमला करारानुसार जिंकलेला पाकिस्तानचा भूभागही भारताने परत केला होता, हे सगळे निर्णय आणि भारताची रणनीती यामुळे एक लोकशाही विचाराचा आणि अहिंसक परंतु अन्यायाचा खंबीरपणे सामना करणारा शूरवीरांचा देश अशी भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पटलावर निर्माण झाली. राष्ट्रीयस्तरावरही पहिली दहा वर्षे समाजवादी विचाराने आणि लोकशाहीपद्धतीने इंदिराजींचा राज्यकारभार चालला होता. शेतजमीन सुधारणा कायदा भारतभर स्वीकारला गेला. पंजाबचे विभाजन होऊन

हरियाणा हा नवीन प्रांत तयार झाला. संस्थानिकांचे तनखे रद्द करण्यासाठी घटनेत दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती. राज्यसभेत बहुमत कमी पडले तेव्हा इंदिराजींनी मंत्रिमंडळाची तातडीची बैठक घेऊन संस्थानिकांची मान्यताच काढून घेण्याचा राष्ट्रपतींचा अध्यादेश लागू केला. बँकांच्या राष्ट्रीयकरणाचाही इंदिराजींनी असाच तातडीने निर्णय घेतला. १९६९ मध्ये मोरारजीभाईंना अर्थमंत्री पदावरून मुक्त केले आणि अर्थ खाते स्वतःकडे घेतले. नैसर्गिक आपत्तीशी खंबीरपणे सामना करीत इंदिराजींनी २० सूत्री कार्यक्रम किंवा गरिबी हटाव यासारख्या जनहितार्थ योजनाही जनतेसमोर ठेवल्या.

याच काळात इंदिराजींमधील एका राजकारणी आणि सत्तापिपासू व्यक्तिमत्त्वाचे प्रत्यंतर हळूहळू येऊ लागले. १९७१ च्या निवडणुकीमध्ये गैरव्यवहार केल्याबद्दल, इंदिराजींवरील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध होऊन, सहा वर्षांसाठी निवडणूक न लढवण्याचा निर्णय अलाहाबाद न्यायालयाने दिला. न्यायालयीन आदेश अमान्य करून घटनेच्या ३६५ व्या कलमाचा उपयोग करून २५ जून १९७५ रोजी इंदिराजींनी आणीबाणी जाहीर केली. लोकशाही, वैचारिक स्वातंत्र्य या सर्वांचा लोप झाला होता. न्यायव्यवस्था कोलमडून पडली. घटनेच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली झाली.

भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा झाल्यानंतर अवघ्या काही वर्षातच लोकशाही व्यवस्थेला सुरुंग लागला. सत्तेच्या राजकारणाला आलेले वेगळे महत्त्व, वाढत गेलेला भ्रष्टाचार आणि देशभक्तीची पायमल्ली हा एका दिवसात घडलेला बदल नव्हता. स्वातंत्र्याची पहाट उगवत असताना नव्या स्वतंत्र भारतातील व्यवस्थेबद्दल एक धोक्याची सूचना दुर्गाबाई जोशी यांनी आपल्या पागलखाना (१९४१) या कादंबरीत दिली होती. भारतात संयुक्त सरकारे स्थापन झाली तेव्हापासूनच राजकारण्यांची सत्तापिपासू वृत्ती मध्य प्रांताच्या कायदेमंडळातील सदस्य दुर्गाबाई जोशी (MLA) यांच्या लक्षात येत होती व अस्वस्थही करीत होती. स्वातंत्र्यानंतरही प्रचारपुस्तके छापून, खेड्यापाड्यातून भाषणे देत लोकजागृती करण्याचे कार्य त्या अनेक वर्षे निस्पृहपणे करीत होत्या. 'देशभक्तांना वेडे ठरवून तुरुंगात डांबले असून कोणतेही देशकार्य न केलेले स्वार्थी लोक सत्तेवर आले आहेत' असे स्वप्न पागलखाना या कादंबरीत लेखिकेला पडते. ती भीती या कादंबरीत व्यक्त केली होती. आपल्या सत्तापदाला धोका आहे या भीतीने अन्य कोणतेही ठोस कारण नसूनही २५ जून १९७५ रोजी इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. येथे राजकारणातील सुभद्रा जोशी यांच्या द्रष्टेपणाचा प्रत्यय आपल्याला येतो. कादंबरीतील परिस्थितीचे मूर्त स्वरूप आणीबाणींमधून स्पष्ट झाले. आणीबाणींसंबंधी माहिती आपण पुढील लेखात पाहू.

## ◆ संदर्भ


- कायदेनिर्मितीत स्त्रियांचे योगदान – डॉ. विद्या देवधर
- स्त्री लिखित कादंबरी, प्रेरणा व प्रवृत्ती – डॉ. विद्या देवधर
- हैदराबाद मुक्तिसंग्रामतील स्त्रिया, सत्याग्रही,विशेषांक, ज्ञानकुमारी हेडा
- History of Women's Contribution to Goa's struggle for Freedom (1928-1961) Pranjal Sakhardande

# स्त्रिया आणि राजकारण : आणीबाणी ते २०२४



**डॉ. विद्या देवधर**

हैदराबाद,

शिक्षण एम. ए., एम. फिल., पीएच.डी., सुवर्णपदक उस्मानिया विद्यापीठ,

युजीसी रिसर्च फेलोशिप २००४–०९, लोकसभा रिसर्च फेलोशिप २०१६ – १८.

एक उत्तम राजकीय नेता ही इंदिराजींची प्रतिमा पंतप्रधानपदाच्या दहा वर्षात तयार झाली होती. इंदिराजींनी आपल्या कारकिर्दीत पाकिस्तानशी झालेल्या पूर्व आणि पश्चिम सीमेवरील दोन लढायांबरोबर अनेक नैसर्गिक आपत्तींचा खंबीरपणे सामना केला होता. मात्र आपली सत्ता टिकली पाहिजे, या हट्टा पायी त्यांनी पुढे लोकशाहीतील अनेक महत्त्वाचे संकेत व अधिकार नाकारले. विरोधी पक्ष, न्यायव्यवस्था आणि नागरिकांचे भाषण स्वातंत्र्य या गोष्टी स्वीकारण्यामध्ये इंदिराजींचे बळ कमी पडले. न्यायालयाने त्यांची निवडणूक आणि निवड अवैध ठरवली असूनही त्यांनी न्यायालयीन आदेश अमान्य केला. घटनेच्या ३६५ व्या कलमाचा उपयोग करून देशात आणीबाणी जाहीर केली. विरोधी विचारधारा असलेले पक्ष, संस्था आणि त्यांचे कार्य यावर बंदी घातली. विरोधी मताच्या विचारवंतांना आणि  सामान्य नागरिक व पत्रकारांना बेकायदेशीरपणे तुरुंगात रवाना केले. २५ जून १९७५ रोजी आणीबाणी जाहीर झाली. त्या दिवसापासून २१ मार्च १९७७ रोजी सार्वत्रिक निवडणुका जाहीर होईपर्यंत नोकरशाहीमध्ये शिस्त आली तरी लोकशाही, वैचारिक स्वातंत्र्य या सर्वाचा लोप झाला होता. न्यायव्यवस्था कोलमडून गेली होती. घटनेच्या मूलभूत हक्कांचीच पायमल्ली झाली होती.

- **अकारण आणीबाणी :**

२५ जूनला रात्री आणीबाणी घोषित केली आणि भारतभर अटकसत्र सुरू झाले. भारतीय जनसंघ, समाजवादी, सीपीएम, द्र.मु.क. या राजकीय पक्षांबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अन्य संघटनांच्या कार्यकर्त्यांना कोणतेही कारण न देता पकडून तुरुंगात  डांबले गेले. माननीय अटलजी आणि अडवानी यांनाही कोणतीही पूर्वसूचना न देता बेंगलोर मध्येच अटक केली तर प्रवासाला निघालेल्या सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचीही रवानगी येरवडा तुरुंगामध्ये झाली. सव्वा लाख राजकीय पक्षाचे आणि ७५ ते ८० हजार संघ स्वयंसेवकांची धरपकड झाली. अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले तरीही अटक सत्र चालूच होते. पकडलेली ही मंडळी देशद्रोही मुळीच नव्हती फक्त इंदिराजींच्या पेक्षा त्यांची मते वेगळी होती आणि त्यांचे नेते जयप्रकाश नारायण, नानाजी देशमुख हे अधिक लोकप्रिय झाले होते. या लोकांची लोकप्रियता वाढली तर पुढे आपल्याला राज्य गमवावे लागेल या भीतीने इंदिरा गांधींनी या पक्षाच्या आणि राष्ट्रीय

स्वयंसेवक संघाच्या सर्वच कार्यकर्त्यांना चौकशी विना तुरुंगात टाकले, एवढेच नव्हे तर त्यांच्याशी अतिशय वाईट पद्धतीने व्यवहार केले. जॉर्ज फर्नांडिस यांचे बंधू लॉरेन्स फर्नांडिस यांच्याशी स्नेहसंबंध असल्याच्या कारणावरून स्नेहलता रेड्डी यांना तुरुंगवास तर सोसावा लागला. दुर्दैवाने तुरुंगातील अत्याचारांना त्या तोंड देऊ शकल्या नाही आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला. गुन्हेगारांपेक्षाही वाईट वागणूक अनेक कार्यकर्त्यांना दिली गेली. जानेवारी १९७६ मध्ये तामिळनाडू आणि मार्च १९७६ मध्ये गुजरात येथील द्र.मु.क व जनसंघ यांची सरकारे बरखास्त केली. उर्वरित भारतात काँग्रेसचीच सरकारे होती. याबरोबरच पत्रकारांना पकडले गेले. अनेक वर्तमानपत्रे बंद करावी लागली.

## ● आणीबाणी विरोध– महिलांचा सहभाग :

या हुकुमशाहीला विरोध करण्यासाठी आता भारतीय जनता सज्ज झाली होती. शिवसेना आणि भारतीय कम्युनिस्ट पार्टी फक्त इंदिरा गांधीं बरोबर होती. बाकी सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन लोक संघर्ष समितीची स्थापना केली. त्यामार्फत १४ नोव्हेंबर १९७५ ते २६ जानेवारी १९७६ पर्यंत जागोजागी भारतभर सत्याग्रह करण्याचे निश्चित झाले. एक लाख तीस हजार सत्याग्रहींनी आपला विरोध दर्शवला, त्यापैकी ८० हजार सत्याग्रही हे संघ परिवारातील होते. राष्ट्र सेविका समिती या अखिल भारतीय महिला संघटनेवर बंदी नव्हती परंतु समितीच्या सेविकांनीही सत्याग्रहात भाग घेतला. प्रस्तुत लेखिकेने रूपारेल कॉलेजमधील सत्याग्रहाचे नेतृत्व केले. बहिण सुषमासह आठ मुलींना पकडण्यात आले आणि त्यांना आर्थर रोड तुरुंगात काही दिवस राहावे लागले. समिती प्रचारिका सिंधुताई फाटक यांनी दिल्ली, पंजाब, उत्तर प्रदेशासह संपूर्ण उत्तर भारत ढवळून काढला. जागोजागी सभा घेऊन महिलांना सत्याग्रहासाठी व अन्य मदतीसाठी प्रेरित केले. असेच काम समितीच्या सेविकांनी आसाम पासून कर्नाटक, तेलंगण, तामिळनाडू पर्यंत दक्षिण भारतातही मोठ्या प्रमाणात केले होते. विद्यमान प्रमुख संचालिका वंदनीय शांताक्का यांनीही बेंगलोर मध्ये सत्याग्रहीच्या एका तुकडीचे नेतृत्व करून तुरुंगवास पत्करला होता. त्याचबरोबर कुसुमताई साठे, सुशीला महाजन, प्रमिलाताई मेढे यांच्या शिष्टमंडळाने विनोबाजींची भेट घेऊन इंदिराजींपर्यंत आपले मत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सत्याग्रहाने विराट रूप धारण केल्यामुळे तुरुंगही लहान पडू लागले होते. तरुण मुलांनी आपल्या भावना कॉलेजच्या आवारात व्यक्त केल्या असा युक्तिवाद केल्यामुळे लेखिकेसह अनेक मुलींची तुरुंगातून लवकर सुटका झाली. घराघरातील पुरुष माणसे तुरुंगात होती. महिलांनी बाहेर राहून आपले घर संसार सांभाळून, त्याचबरोबर तुरुंगातील लोकांचे मनोबलही वाढवले. सणावारी एकत्रितपणे गोडाचे जेवणही पुरवले. सुनिता आरळीकर आणि त्यांचे पती हे दोघेही तुरुंगात होते. सुनीताताईंचा लहान मुलगा त्यांच्याबरोबर एका तुरुंगात आणि पती दुसऱ्या तुरुंगात अशी परिस्थिती होती. ‘विंचवाचे बिऱ्हाड’ या आपल्या आत्मकथनात आणीबाणीच्या दिवसातील सुनीताबाईंनी वर्णन केलेली परिस्थिती मनाला चटका लावणारी आहे. राजमाता विजयाराजे सिंधिया आणि जयपूरच्या गायत्री देवी या राजघराण्यातील महिलांबरोबर तुरुंगात गुन्हेगार स्त्रियांना ठेवून त्यांना मानसिक त्रासही दिला गेला. व्यक्ती स्वातंत्र्य आणि भाषण स्वातंत्र्य यावरील बंदीच्या विरोधात देशभरातील लेखकांनीही प्रचार मोहीम उघडली. महाराष्ट्रात पु. ल. देशपांडे आणि दुर्गाबाई भागवत यांच्यासह अनेक लेखकांच्या जागोजागी सभा होऊ लागल्या. दुर्गाबाईंना अटक झाली आणि तुरुंगवास सोसावा लागला. काँग्रेसच्या विरोधी राजकीय मत आहे एवढेच कारण नव्हे तर

'आम्हाला आमचे स्वतंत्र मत आहे' हे मांडणाऱ्या लेखकांनाही जेव्हा अटक होत होती तेव्हा एका स्त्रीने लादलेली ही आणीबाणी किती भयंकर असेल याची आपल्याला आज पन्नास वर्षांनीही कल्पना येईल.

## ● संविधानातील बदल आणि कायदे :

आणीबाणीच्या या कालखंडात घटनेच्या नवव्या अनुसूचीनुसार ४७ नवीन कायदे पंतप्रधानांनी केले आणि ते संमत करून घेतले. लोकसभेने संमत केलेल्या विधेयकाला न्यायालयात आव्हान देता येते, परंतु नवव्या अनुसूचीद्वारा, झालेल्या कायद्यावर सर्वोच्च न्यायालयात प्रश्न उठवता येत नाही. या काळात 'मिसा' कायद्याखाली वॉरंट शिवाय हजारो निरपराध लोकांना तुरुंगात टाकले. त्याचबरोबर 'फेरा' कायदाही लागू झाला. सोशालिस्ट आणि सेक्युलर या शब्दांचा समावेश घटनेमध्ये याच काळात इंदिरा गांधींनी करून घेतला.

## ● इंदिरा गांधी–अखेरचे पर्व :

जानेवारी १९७७ मध्ये नंदिनी सत्पथी आणि जगजीवन राम यांनीही काँग्रेस पक्ष सोडला. १६ जानेवारी १९७७ रोजी आणीबाणी समाप्त होउन मार्चमध्ये निवडणुका जाहीर झाल्या. विरोधी नेत्यांच्या पाठीशी लोकनायक जयप्रकाश नारायण आणि नानाजी देशमुख यांच्यासारखे खंबीर नेते होते. मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली विविध विचारधारांच्या लोकांचे जनता पक्षाचे सरकार आले. आणीबाणीत झालेले अत्याचार आणि इंदिरा गांधी यांच्या राजकीय चुका यामुळे त्यांना ही निवडणूक गमवावी लागली. स्वातंत्र्यानंतर तीस वर्षांनी भारताच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले प्रथमच काँग्रेस सत्तेबाहेर गेली होती. इंदिराजींचे राजकीय अस्तित्व मात्र या पराभवानंतरही टिकून राहिले आणि १९८० मध्ये त्या पंतप्रधान झाल्या तेव्हा त्यांनी अतिशय कौशल्याने परराष्ट्रीय योजना आखल्या. अन्य युरोपियन देशांशी संबंध वाढवून रशियाच्या संकेतावर चालणारा देश ही भारताची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला. इंदिराजीनी वैज्ञानिक आणि शास्त्रज्ञ यांच्या परदेशात भेटी घेऊन त्यांना भारतात परत येण्याची प्रेरणा दिली. याच काळात पंजाब अस्वस्थ होता आसाम मध्ये दिवसाढवळ्या खून मारामाऱ्या होत्या. एकेकाळी इंदिराजींनीच जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांना अभय दिले होते. आता त्यांनी स्वतंत्र खलिस्तानची मागणी लावून धरली. खलीस्तान्यांना शासन करण्यासाठी भारतीय सैन्याला हरमंदिर साहेब परिसरात घुसण्याचा इंदिराजींनी आदेश दिला. ऑपरेशन ब्लू स्टार या मोहिमेमध्ये ४९२ खलिस्तानी मारले गेले.तीनशे भक्त आणि ७९ जवान व सेनाधिकारी सुद्धा शहीद झाले. याचा परिणाम म्हणजे ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिराजींच्या राहत्या घरीच त्यांच्या दोन अंगरक्षकांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. एका सामर्थ्यशाली व महत्त्वाकांक्षी नेतृत्वाचा अंत झाला. राजकारणी कूटनीतिज्ञ आणि कुशल नेता असलेल्या इंदिराजींना पाश्चात्य जगाच्या तुलनेत भारताने पंतप्रधानपदाचा मान स्वातंत्र्यानंतर अल्पकाळातच दिला. स्त्रीलाही पुरुषा इतकी बुद्धी आहे आणि राज्य सांभाळण्याची तिची क्षमता आहे याची जाणीव भारतीयांना आहे याचे हे उत्तम उदाहरण म्हणता येईल.

## ● जागतिक महिला वर्ष, महिला जागृती :

१९७५, ७६ ही वर्षे आणीबाणी आणि जागतिक महिला वर्ष यामुळे अतिशय वेगळ्या प्रकारे गाजली. महाविद्यालयीन आणि थोड्या मोठ्या अशा अनेक महिला राजकारणामध्ये त्या काळात सक्रिय झाल्या

होत्या.  त्यातील अनेक जणी नंतरही राजकारणात आल्या, तिथे स्थिरावल्या, उच्च पदालाही पोहोचल्या. सुमित्रा  महाजन, सुषमा स्वराज, वसुंधरा राजे यांनी आपले काम आणीबाणी काळातच सुरू केले होते. सुमित्राताई राष्ट्र सेविका समितीच्या सेविका होत्याच. त्याशिवाय लग्नानंतर इंदूरमधील महिला मंडळ, अहिल्या समिती यामध्ये कार्यरत होत्या. आणीबाणीच्या काळात संघबंधूंना मदत करण्यासाठी पुढे असणाऱ्या सुमित्राताई, लोक जागृतीसाठी वाड्यावस्त्यातून रामायणाची प्रवचनेही करू लागल्या. सासरी माहेरी संघ–समितीचे वातावरण होते त्यामुळे लोकसेवेचे बाळकडू त्यांना मिळालेले होते परंतु राजकारणात मात्र कोणी नव्हते. वक्तृत्व आणि अभ्यास यामुळे सुमित्राताई पुढे इंदूरमध्ये उपमहापौर आणि नंतर खासदार झाल्या. पंधराव्या लोकसभेच्या लोकसभा अध्यक्ष झाल्या. आणीबाणीच्या काळात संघाच्या घरात लग्न होऊन आलेल्या उत्तराखंड येथील विनोद बहुगुणा यानंतर समाजसेवेकडे वळल्या आणि आता उत्तराखंड मध्ये राज्यमंत्रीही आहेत. वसुंधरा राजे या राजघराण्यातीलच होत्या, तरुण वयात त्या राजकारणात आल्या आणि पुढे केंद्रीय राज्यमंत्री व राजस्थानच्या मुख्यमंत्रीही झाल्या. ममता बॅनर्जी जयप्रकाशजी नारायण यांच्यावरील श्रद्धेमुळे आणीबाणीतील आंदोलनाशी जोडल्या गेल्या आणि पुढे राजकारणात त्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. आपल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजी यांच्याही घरी कोणतेही राजकीय वातावरण नाही याची आपण नोंद घेतली पाहिजे. राजकारणात आलेल्या काही महिलांना घरातील राजकीय वातावरणात प्रोत्साहन मिळाले. त्याचबरोबर अनेक जणी स्वप्रेरणेने राजकारणात आल्या आणि तेथे स्थिरावल्या असे आपल्याला दिसते. १९७५ नंतरचे हे दिवस स्त्री जीवनात पुन्हा एक नवे परिवर्तन घडवणारे होते. महिला वर्षांमुळे सर्वत्र महिलांच्या हक्कांबद्दल एक जागृती आली होती. तसेच महिला कल्याण, महिलांच्या उपयोगी योजना, याचाही विचार समाजात अधिक होऊ लागला होता. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली नवी पिढी शिक्षणाबद्दल अधिक जागृत होती आणि स्त्रियांमध्ये आत्मविश्वासही आला होता. आणीबाणीनंतर आपल्याला महिला संचलित अनेक सेवाभावी संस्था भारतभर सुरू झालेल्या दिसतात आणि या संस्थांमार्फत विविध प्रकारचे भरीव कार्य आजही दिसून येते. तेव्हा महिला वर्ष, महिला दशक हे महिलांच्या आणि महिलाविषयक जागृतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे मानले पाहिजे.

### ● कार्यकर्ता ते अधिकारपद :

महिलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले. सार्वजनिक कामात त्या भाग घेऊ लागल्या आणि हळूहळू खासदार व आमदार महिलांची संख्या ही वाढत गेली. स्वातंत्र्यानंतर प्रथमच २००४ ते २००९  या काळात एकापेक्षा अधिक महिलांना कॅबिनेट मंत्रीपद दिले गेले होते. भारत सरकारने महिला सशक्तिकरण या विषयाला अग्रक्रम दिला आणि सोळाव्या लोकसभेत नरेंद्र मोदीजींच्या २३ जणांच्या मंत्रिमंडळात सहा महिला कॅबिनेट मंत्रीपदावर होत्या. या महिलांवर आव्हानात्मक खातीही सोपवली होती. नेहमी पुरुषांना दिले जाणारे परराष्ट्र मंत्रालय सुषमा स्वराज यांच्याकडे होते. निर्मला सीतारामन यांच्याकडे संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी सोपवली. सर्व महिलांच्या दृष्टीने  ही अतिशय अभिमानाची घटना आहे. केंद्रीय अर्थखाते निर्मला सीतारामन २०१९ पासून अतिशय सक्षमपणे सांभाळत आहेत. नगरसेवक आणि उत्तर प्रदेशच्या आमदार असलेल्या शीला कौल १९८० पासून ८४ पर्यंत शिक्षण, समाज कल्याण आणि सांस्कृतिक मंत्रालयात

राज्यमंत्री होत्या तर १९९१ पासून शहरी विकास मंत्री होत्या. परदेशी विश्वविद्यालयांना भारतीय विद्यापीठांशी संलग्न करून घेण्याचे महत्त्वाचे काम शीला कौल यांनी केले आहे. राज्यसभेचे उपाध्यक्षपद ज्यांनी सोळा वर्षे सांभाळले त्या नजमा हेपतुल्ला संसदीय कार्यपद्धतीशी चांगल्याच परिचित आहेत. १९८० पासून २०१५ पर्यंत राज्यसभेच्या खासदार असलेल्या नजमाजींनी २०१४ मधील नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात अल्पसंख्य मंत्रालयाचे मंत्रिपद भूषवले आणि त्यानंतर मणिपूरचे राज्यपाल पद.

- **कल्याणकारी कायदे :**

भारतात सर्वत्र हुंडापद्धती प्रचलित आहे. काही भागात या अमानुष प्रथेला थांबवता येत नाही म्हणून स्त्रीभ्रूणहत्याही होत होत्या. १९५१ मध्येच हुंडाविरोधी कायद्यासंबंधी विचार सुरू झाला. १९८० मध्ये कृष्णा साही आणि प्रमिला दंडवते यांनी या कायद्यात सुधारणा सुचवल्या, मार्गरिट अल्वा यांनीही सुधारित विधेयक मांडले होते. टेलिव्हिजन संबंधीचा कायदा अंबिका सोनी यांनी आपल्या मंत्रिपदकाळात म्हणजे २००९ नंतर अधिक स्पष्ट केला. लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण आणि पोस्को (posco) हे महत्त्वपूर्ण कायदे महिलांच्या प्रयत्नातून झाले आहेत. मानवी तस्करी, अल्पवयीन मुलांची काळजी आणि संरक्षण, महिलांवरील कुटुंबांतर्गत अत्याचार यासारखे कायदे होताना सभागृहातील सर्व महिलांनी त्याला पाठिंबा दिला होता.

- **वैश्वीकरणानंतर बदलती मानसिकता :**

१९९० नंतर काळ झपाट्याने बदलला. जागतिकीकरण आणि वैज्ञानिक प्रगती यामुळे आपले सामाजिक व आर्थिक जीवन बदलले, जगण्याच्या गरजा, माणसाची विचार पद्धती बदलली. त्याचा परिणाम विधानसभा आणि लोकसभेतील चर्चा विषयांवरही दिसतो. २००० नंतर झालेले नवे कायदे बदलत्या परिस्थितीचा मागोवा घेत तयार झालेले दिसतात. अधिकाधिक महिला चर्चांमधून भाग घेऊ लागल्या. १९७७ पर्यंत सभागृहातील अधिकांश महिला काँग्रेसच्या असल्यामुळे आणि अन्य पक्षाच्या खासदारांनाही लोकोपयोगी कायदे करणे हे खासदारांचे काम आहे याचे सतत भान असल्यामुळे विधेयकाच्या विषयाला धरून चर्चा होत असत. १९९० पासून राजकीय चित्र सतत बदलत राहिले होते. २०१४, २०१९ मध्ये १३ राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला लोकसभेत होत्या, त्यामुळे विधेयकातील चर्चांना सुद्धा त्याच्या उपयुक्ततेपेक्षा राजकीय रंग होता. त्यापूर्वीच्या काळात विधेयकाचे महत्व लक्षात घेऊन, चर्चा करताना ही माझ्या पक्षाची विचारधारा आहे असे सांगायची गरज वाटत नव्हती. जागतिकीकरणाबरोबर बदललेल्या मानसिकतेमुळे, आपले अस्तित्व दाखवण्याला महत्त्व आल्यामुळे प्रत्येक महिला खासदार आपल्या पक्षाचे नाव घेत बोलू लागल्या. पंधराव्या लोकसभेत अनुसूचित जातीच्या १२ आणि, अनुसूचित जनजातीच्या पाच महिला खासदार होत्या हे आकडे सामाजिक जागृती वाढत गेल्याचे निदर्शक आहे. अधिकाधिक प्रांतातील महिलांचे प्रतिधिनित्वही लोकसभेमध्ये दिसू लागले. घटना दुरुस्ती विधेयकांमध्ये दैनंदिन जीवनाशी संबंधित, वर्तमानकालीन विधेयकांमध्ये महिलांना अधिक रुची असल्याचेही आपल्याला दिसून येते. लोकपाल आणि लोकायुक्त विधेयकावर झालेल्या चर्चात महिलांचा आवाजही मिसळला होता. अणुशक्ती बरोबर पर्यावरण विधेयकाचे महत्वही महिलांनी जाणलेले दिसते. स्त्री शिक्षणाबरोबर अर्थार्जन

आणि रोजगार समस्यांकडेही महिलांनी सभागृहाचे लक्ष वेधलेले दिसते. आमदार आणि खासदार यांनी हाताळलेले महिलांचे प्रश्न, त्यांची मांडणी, त्यांचा अभ्यास, यामध्ये आपल्याला फार मोठ्या प्रमाणात फरक झालेला दिसतो.

- **महिला मुख्यमंत्री :**

महिला आमदारांचे काम राज्यासाठी महत्त्वाचे आहे. २०२५ पर्यंत भारतामध्ये १८ महिला मुख्यमंत्र्यांनी राज्यकारभार केलेला आहे. शशिकला काकोडकर(गोवा), जयललिता (तामिळनाडू), शीला दीक्षित (दिल्ली), मायावती (उत्तर प्रदेश), राबडी देवी (बिहार), वसुंधरा राजे (राजस्थान) यांनी एकापेक्षा अधिक वेळा मुख्यमंत्री म्हणून शपथ ग्रहण केली आहे. महिला मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्याला अनुकूल असे अनेक कायदे करण्याला अग्रक्रम दिला आहे. भारतातील पहिल्या महिला मुख्यमंत्री, श्रीमती सुचेता कृपलानी या कट्टर गांधीवादी देशभक्त आणि स्वातंत्र्यसैनिक होत्या. प्रशासनावर त्यांची पकड मजबूत होती म्हणूनच उत्तर प्रदेशासारखे सर्वात मोठे राज्य त्यांनी समर्थपणे सांभाळले. आपुलकी, प्रखर इच्छाशक्ती आणि लढाऊ वृत्तीचा संगम असलेल्या भारतीय स्त्रीचे हे रूप होते. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेल्या सुचेता कृपलानी म्हणजे तत्त्वांची तडजोड न करणारी वात्सल्य मूर्ती माता, अशी त्यांची आठवण राजकारणातील माणसे काढतात. जयललिता यांनी चार वेळा मुख्यमंत्रीपदावर राहून १६ पेक्षा अधिक वर्षे तामिळनाडू प्रांताची व्यवस्था पाहिली. महसूल विभाग आपल्या हातात ठेवून महिलांसाठी अनेक योजना सुरू केल्या. मुख्यमंत्रीपदाचा कारभार पाहण्यास सुरुवात करताच त्यांनी स्वस्त दारूची सगळी दुकाने बंद करून देशी दारू निर्मितीवर अनेक निर्बंध लावले. मागासवर्गीयांसाठी २७ टक्के आरक्षण देण्यासाठी नॅशनल इंटिग्रेशन कौन्सिल मागेपुढे पाहत असताना त्यांनी ५०% आरक्षणाची घोषणा केली आणि असा कायदा बनवण्यासाठी पुढे त्यांनी लोकसभेतही आपले अस्तित्व दाखवले. तामिळनाडूमध्ये पन्नासपेक्षा अधिक टक्के आरक्षणाचे संविधान पारित करून घेतले. दिल्ली मेट्रोच्या यशाचे श्रेय मुख्यमंत्री शीला दीक्षित यांना दिले जाते. पंधरा वर्षे मुख्यमंत्रीपदावर असलेल्या शीला दीक्षित आपले सासरे उमाशंकर दीक्षित यांच्यामुळेच राजकारणात आल्या होत्या. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती या २१ व्या वर्षी आपल्या कुशल नेतृत्वामुळे राजकारणात स्थिरावल्या. अडतीसाव्या वर्षी मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचलेल्या त्या पहिल्या दलित महिला मुख्यमंत्री होत्या. भारतीय इतिहासाचे एक नवीन पर्व इथे सुरू झाले. भारतात प्रथमच दलित समाजातील महान व्यक्तींची त्यांनी स्मारके बनवली. अल्पसंख्यांक आणि दलितांसाठी काम करणाऱ्या मायावतींना अखिल भारतीय नेता मानले जाते. भारतीय जनता पक्षातील ज्येष्ठ नेत्या राजमाता विजया राजे सिंधिया यांच्या कन्या वसुंधरा राजे १९८४ पासून भाजपा युवा मोर्चाच्या राजस्थान प्रांताच्या उपाध्यक्ष म्हणून काम करू लागल्या. त्यानंतर ८५ मध्ये आमदार आणि ८८ मध्ये त्या लोकसभेत खासदार झाल्या. विदेश मंत्रालयात राज्यमंत्री झाल्या. २००३ मध्ये वसुंधराजी राजस्थानच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री झाल्या. कृषी, महिला सशक्तिकरण, शिक्षण, औद्योगिक विकास, ऊर्जा, पर्यटन, कला आणि संस्कृती या विभागांसाठी वसुंधराजी यांनी अनेक योजना तयार केल्या आणि राजस्थानच्या विकासाला नवी दिशा दिली. प्रलोभने दाखवून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी

धर्म स्वातंत्र्य विधेयक २००६, हे वसुंधरा राजे यांनी संमत करून घेतले. पतीला मुख्यमंत्रीपद सोडावे लागले म्हणून राबडी देवीने ते सांभाळले हे सर्वश्रुतच आहे. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल या मात्र १९८७ पासून गुजरात भाजपशी जोडल्या गेल्या आहेत. १९९४ मध्ये राज्यसभा सदस्य म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९९८ पासून त्या चार वेळा आमदार म्हणून निवडून गेल्या. २०१४ मध्ये गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान झाले तेव्हा आनंदीबेनवर गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवली गेली. गुजरातमधील पाणीप्रश्न, लँड सीलिंग बिल, एग्रीकल्चरल लँड बिल संमत केले. सीमा भागातील भारतीयांशी मैत्री करून जल किंवा भू मार्गाने दहशतवादी भारतात घुसतात हे लक्षात घेऊन त्याला आळा घालण्यासाठी GUJCOCA हा पूर्वीच गुजरात विधानसभेने संमत केलेला कायदा राष्ट्रपतींकडे साक्षरीविना पडून राहिला होता त्याचा पाठपुरावा करून आनंदीबेन सरकारने तो पारित केला.

- **महिला आरक्षण:**

स्वकर्तृत्वाने आणि कष्टाने राजकारणातील विविध पदांवर पोहोचलेल्या महिला आज आपल्याला दिसतात. स्त्रियांनी मतदानाचा हक्क मिळवला तरीही राजकारणात पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळवण्याचा मार्ग सोपा आणि सहज नव्हताच. त्यामुळे महिलांना ३३% आरक्षण मिळावे असा सूर सर्व पक्षांमधूनच येऊ लागला. १९८९ मध्ये राजीव गांधींनी महिला आरक्षण विधेयकाचा विचार सर्वांसमोर मांडला. त्यानंतर १९९२ आणि ९३ मध्ये नरसिंहराव यांच्या सरकारने संविधान सुधारक विधेयक ७२ आणि ७३ च्या अंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील सार्वजनिक संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावं असे निश्चित झाले. राज्यांनी हे आरक्षण स्वीकारल्यानंतर आज पंचायती व नगरपालिका यांच्यामध्ये १५ लाख महिला निवडून गेलेल्या आहेत.

१९९६ मध्ये देवेगौडा यांच्या सरकारमध्ये पुन्हा एकदा लोकसभेतील महिलांच्या आरक्षणाचा प्रश्न मांडला गेला परंतु लोकसभेने हे विधेयक संमत केले नाही. त्यानंतर ९६ मध्ये विधेयकासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना झाली. गीता मुखर्जी या त्याच्या अध्यक्ष होत्या आणि त्यांनी अहवाल देताना ओबीसी व एस. सी. लोकांनाही या ३३ टक्क्यांमध्ये आरक्षण मिळावे, असाही विषय मांडला होता. दोन वर्षानंतरच अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारने सुद्धा पुन्हा एकदा महिला आरक्षण विधेयक मांडले, परंतु दुर्दैवाने याही वेळेला हे विधेयक पास झालं नाही. १९९९,२००२,२००३ मध्ये वाजपेयी सरकारच्या कालावधीत मांडलेल्या या विधेयकाला संपूर्ण बहुमत मिळू शकले नाही. त्यानंतर मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये पुन्हा २००८ मध्ये हे विधेयक आले आणि त्यात गीता मुखर्जी आयोगाने सुचवलेल्या मुद्द्यांमध्ये अजून काही बदल सुचवले गेले व २०१० मध्ये फक्त राज्यसभेत हे बिल संमत झाले. लोकसभेत नव्हे. २०१४ मध्ये लोकसभा बरखास्त झाल्यानंतर महिला आरक्षण विधेयकही मान्य न होता तसेच राहिले.

महिला आरक्षण विधेयक २०२३, 'नारीशक्ती वंदन अधिनियम' म्हणून प्रसिद्ध असलेला हा कायदा १९ सप्टेंबर २०२३ रोजी संसदेच्या विशेष अधिवेशनादरम्यान लोकसभेत सादर करण्यात आला. या

कायद्यामध्ये लोकसभा, राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेतील ३३ टक्के जागा महिलांसाठी राखून ठेवण्याची व्यवस्था केली आहे. राजकीय पक्षांमध्ये एकमत नसल्यामुळे २७ वर्षांपासून सुरू असलेल्या कायदेविषयक चर्चेचा हा कळस होता. ज्यामध्ये महिला आरक्षण विधेयक २०१० देखील समाविष्ट आहे. नवीन संसद भवनात विचारात घेतलेले हे पहिले विधेयक होते. २८ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी विधेयकावर स्वाक्षरी केली आणि त्याच दिवशी राजपत्र अधिसूचना देखील प्रकाशित करण्यात आली. अनेक वर्षांपासून चाललेल्या महिलांच्या प्रयत्नांना यश आले.

- **महिला आरक्षणाचे परिणाम :**

१९९२ मध्ये पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळामध्ये ७३ आणि ७४वे संविधान संशोधन अधिनियम मान्य झाले यामुळे पंचायतराज संस्था यांना आरक्षण अनिवार्य केले गेले. याद्वारे पंचायत राजमध्ये महिलांना ३३.३% आरक्षण मान्य झाले. त्यानंतर आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, केरळ, महाराष्ट्र, ओरिसा, राजस्थान, त्रिपुरा, आणि उत्तराखंड यांनी आपल्या प्रांतांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देऊ केले. सर्व ठिकाणच्या महिलांना संधी मिळावी या हेतूने महिलांसाठी आरक्षित असलेले मतदारसंघ सतत बदलत ठेवले. महिलांचा राजकारणातील सहभाग अशा रीतीने वाढवता आल्यानंतर एकूणच चार ते पाच टक्के असलेला महिलांचा सहभाग २५ ते ४०% महिलांपर्यंत गेला आणि त्यामुळे हजारो महिलांना स्थानिक स्वराज्यसंस्था किंवा ग्रामपंचायतीमध्ये काम करण्याची, नेतृत्व करण्याची संधी मिळाली. अति सामान्य महिलांना सुद्धा पंचायतीत सदस्य म्हणून स्थान होते. परंतु थोड्या उच्चवर्णीय किंवा पूर्व सरपंचांच्या कुटुंबातील महिला सरपंच बनत होत्या. याचबरोबर महिलांना पंचायतीच्या कामाची माहिती व्हावी आणि त्यांच्यातील नेतृत्व गुण वाढावेत यासाठी विशेष मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. तामिळनाडूमध्ये महिलांमधील शिक्षणाचा अभाव लक्षात घेऊन त्यांना पंचायतीच्या व्यवहाराचे शिक्षण देण्यात येत होते. महाराष्ट्र, आंध्र प्रदेशांमध्ये स्वयंसेवी संस्था मार्गदर्शनाचे काम करत होत्या. या मार्गदर्शनामुळे महिलांमधील आत्मविश्वास निश्चितच वाढलेला दिसतो. कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे निवडलेल्या महिलांना पुढे स्थानिक राजकारणातून, प्रादेशिक आणि केंद्रीय राजकारणातही प्रवेश मिळत गेला. महिलांचा ग्रामपंचायतीच्या व्यवहारांमध्ये शिरकाव झाल्यानंतर पाणी आणि रस्ते याकडे अधिक लक्ष दिले जाऊ लागले. पुरुषांना शेती, सिंचन, शिक्षण आणि रस्ते यामधील विकासाबद्दल अधिक आस्था होती. परंतु महिलांचा सहभाग वाढल्यानंतर सर्वांगीण विकासासाठी महिलांवरील अत्याचार, बालसंगोपन, गर्भवती महिलांचे आरोग्य या विषयांचाही त्यामध्ये समावेश झाला.

- **राजकीय पक्षांत महिलांचे स्थान :**

राष्ट्रीय स्तरावरील वेगवेगळ्या पक्षांमधून महिलांच्या स्वतंत्र संघटना काम करीत होत्याच परंतु आरक्षणानंतर भाजप महिला मोर्चा, अखिल भारतीय महिला काँग्रेस, आप महिला शक्ती या अधिक सक्रिय झालेल्या दिसतात. काँग्रेस पक्षाकडे अनेक वर्षे देशाचे नेतृत्व होते. गरीबी हटाव ही त्यांची मुख्य घोषणा होती. २००४ नंतर महिलांचा सहभाग वाढत गेला. त्यानंतर २००९ मध्ये प्रथमच लोकसभाध्यक्षपदी एका

महिलेची, मीरा कुमार यांची निवड झाली तर प्रतिभा पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या. भाजपच्या जडणघडणीमध्ये महिलांचा सहभाग प्रारंभापासूनच होता. भाजपने मोठ्या प्रमाणात महिला सशक्तिकरण, महिलांमधील नेतृत्व गुण, आर्थिक विकास आणि ३३ टक्के आरक्षण या विषयांकडे अधिक लक्ष दिले होते. त्याशिवाय भाजपा ज्याचा पाठपुरावा करीत आहे त्या समान नागरी कायद्याचेही महिलांना विशेष महत्त्व वाटते आहे. यामुळे स्त्री–पुरुषांना सर्व धर्मात समान अधिकार मिळतील असा विश्वास आहे. महिलांवरील अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्यासाठी या कायद्यांचा उपयोग होईल असे वाटते. भारतीय कम्युनिस्ट पार्टीने स्त्री पुरुष समानतेला प्रारंभापासून महत्त्व दिले होते.

१९९० मध्ये राजकीय पक्षांमध्ये महिलांचा सहभाग दहा–बारा टक्केच होता. महिला मुख्यतः सामाजिक कार्यात अधिक भाग घेत असत परंतु त्यानंतर राजकीय जाणिवा वाढत गेल्या आणि महिला मोठ्या प्रमाणात राजकारणात आल्या. प्रसिद्धीची इच्छा आणि माध्यमे यांचीही यात भूमिका आहे. २०१९ मधील सार्वजनिक निवडणुकांमध्ये तामिळनाडूमधील नाम तामिलर काची (katchi) यांनी पन्नास टक्के महिलांना उमेदवारी दिली. भारतातील हा पहिलाच पक्ष जो महिलांना समान जागांवर संधी देत होता. त्यानंतर २०२१ मधील तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी महिलांना ५०% उमेदवारी दिली होती.

निवडणुकांमध्ये महिलांची उमेदवारी जशी वाढत गेली त्याप्रमाणात निवडून आलेल्या महिलांचे प्रमाणही थोडेफार वाढत गेले अर्थात अजूनही ते अत्यल्प म्हणावे असेच आहे. महिला आरक्षणांतर्गत जेव्हा ३३% महिला उमेदवार असतील तेव्हा सभागृहातील महिलांचे प्रमाण नक्कीच वाढलेले दिसेल. याचबरोबर महिला नेत्यांबरोबर महिला कार्यकर्त्या मोठ्या प्रमाणात वाढत जातात असेही दिसते महिलांचा राजकारणात असा अप्रत्यक्ष सहभाग असणे ही लोकजागृतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची घटना आहे.

- **समाजसेवा,आंदोलने आणि राजकारण :**

राजकारणामध्ये असलेल्या महिला कालांतराने समाजकार्याकडे वळतात अर्थात यापेक्षा उलटाही प्रवास काही वेळा झालेला दिसतो. स्त्रियांच्या आंदोलनांचा परिणाम राजकारणावर मात्र नक्कीच झालेला आहे. पाणीवाली बाई म्हणून दिल्लीत पोहोचलेल्या मृणालताई गोरे यांनी महागाई विरोधी लाटणं मोर्चा काढला होता. त्याला सर्व विचारांच्या आणि सर्व थरातल्या महिलांनी प्रचंड पाठिंबा दिला होता आणि सरकारी निर्णयावर त्याचा नक्कीच प्रभाव पडला होता. ही गोष्ट  आणीबाणी पूर्वीची आहे. स्त्रियांच्या आंदोलनांची काही उदाहरणे आपल्याला ठळकपणे दिसतात. मथुरा बलात्कार (१९७२), भवरी देवी सामूहिक बलात्कार (१९९२) या घटनांचा सर्व स्त्री संघटनांनी जोरदार निषेध केला. २०१२ मधील निर्भया अत्याचार घटनेमुळे सारा देश हादरून गेला.  परिणामी महिला आंदोलनाचा रेटा वाढत गेल्यामुळे ३ एप्रिल २०१४ रोजी बलात्कार विरोधी निर्भया कायदा संमत झाला. १९८५ मध्ये शहाबानोला सुप्रीम कोर्टाने न्याय दिला होता पण १९८६ मध्ये मुस्लिम समाजाच्या दबावामुळे व पुढील निवडणूकीत मुस्लिम मते मिळणार नाहीत या भीतीने राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील कॉँग्रेस सरकारने मुस्लिम महिला अधिनियम पारित केला. मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार नाकारला गेला. नंतरच्या काळात तलाक पीडित महिलांच्या पाठीशी; तीन

तलाक विरोधात अनेक महिला संस्था खंबीरपणे उभ्या राहिल्या. मोर्चे काढले, स्वाक्षऱ्या गोळा केल्या, पत्रे लिहिली. १३ राज्यांतील ७० हजार महिलांनी पत्रे लिहून पंतप्रधानांना मुस्लिम पर्सनल लॉ मध्ये सुधारणा करण्याची विनंती केली आणि पुढे २०१९ मध्ये तीन तलाक विरोधी कायदा पंतप्रधान नरेंद्र मोंदींच्या काळात संमत झाला.

आंध्र प्रदेशामधील दारूबंदी आंदोलन, नेल्लोर जवळील लहानशा गावात प्रौढ शिक्षण वर्गाच्या निमित्ताने एकत्रित आलेल्या महिलांनी सुरू केले. घरात होणारी मारहाण किंवा गरीबी याचे महत्त्वाचे कारण दारू आहे हे या नवशिक्षित महिलांच्या लक्षात येऊ लागले. कोणतीही संघटना किंवा राजकीय पक्ष यांच्याशी संपर्क न करता महिलांनीच एकत्र येऊन दारू ठेकेदारांची दुकाने बंद करण्याचा निर्णय घेतला. पुढे ही चळवळ सर्व आंध्र प्रदेशात पसरली. दारूचे दुकानदार आणि गुत्तेदार दारू विक्री चालू राहावी म्हणून या बायकांनाच पैशाची लालूच दाखवत होते पण आंदोलनकारी महिला आपल्या निश्चयावर ठाम राहिल्या. पुढे दोन वर्षात तीनशे दुकाने बंद केली. कुणीही एक नेता किंवा कोणत्याही एका संस्थेने या चळवळीचे नेतृत्व केले नाही किंवा मार्गदर्शनही केले नाही. पीडित महिलांच्या पाठीशी संपूर्ण राज्यातून सर्व थरातल्या आणि जाती–धर्माच्या महिला उभ्या राहिल्या. एक विशाल आंदोलन उभे राहिले. 'निवडून आलो तर संपूर्ण आंध्र प्रदेशात दारूबंदी करीन.' असे आश्वासन एन.टी. रामाराव यांनी प्रचार सभेत जाहीरपणे दिले आणि त्यानंतर निवडणुकांमध्ये तेलगू देशम पक्ष बहुमताने जिंकून आला. संपूर्ण दारूबंदीचा कायदा आंध्र प्रदेश मध्ये त्यांनी लागू केला. उत्तराखंडातील गौरादेवी आणि अन्य महिलांच्या चिपको आंदोलनातूनच पुढे पर्यावरण मंत्रालयाची निर्मिती होऊन, पर्यावरण संबंधित अनेक निर्णय भारत सरकारने घेतले. मेधा पाटकर यांच्या प्रयत्नातून बंगालमधील नॅनो कारचा प्रकल्प हलवावा लागला होता. त्यामुळे पुढे जमीन अधिग्रहण कायद्यामध्ये केंद्र सरकारने अनेक सुधारणाही केल्या. अरुणा रॉय यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध सुरु केलेल्या संघर्षामधून भारतीय जनतेला 'माहितीचा अधिकार' मिळवून दिला. स्त्री शक्तीचे एक आगळे वेगळे दर्शन आपल्याला या महिला चळवळीतून आणि महिलांच्या नेतृत्वामधून दिसते. शैक्षणिक किंवा आर्थिक स्तर उंचावत गेला तरी निश्चय, निष्ठा, कार्यतत्परता या महिलांच्या गुणांचे दर्शन आपल्याला घरात आणि बाहेरही होते. स्त्रियांनी अनेक आंदोलने केली, नेतृत्व केले आणि राजकीय सत्ताधाऱ्यांना समाजाला अनुकूल असे निर्णय घेण्यास भाग पाडले.

राजकारणाने आपल्या जीवनाला वेढून टाकलेले असते, म्हणूनच 'वैयक्तिक असे जे आहे तेही पोलिटिकल आहे' असे म्हटले जाते. भारतीय स्त्रियांचा राजकारणातील प्रवास अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्याचा धावता आढावा घेतानाही अनेक महत्त्वाच्या घटना व व्यक्तींचा लेखांमध्ये उल्लेख करणेही शब्दमर्यादेमुळे अशक्य आहे, याची मला जाणीव आहे. भारतीय स्त्रीचे राजकारणातील स्थान किती क्रियाशील आहे याची तोंडओळख या लेखामधून निश्चितच होईल. धन्यवाद!

## ◆ संदर्भ


- कायदेनिर्मितीत स्त्रियांचे योगदान; डॉ. विद्या देवधर, राष्ट्रीय पुस्तक न्यास

# महिला आरक्षण विधेयकाचा इतिहास



**डॉ. मनिषा कोठेकर**

बी. ए. एम. एस्., एम. डी. (शरीर क्रिया)

भूतपूर्व प्राचार्य, श्री आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर

भारत सरकारच्या राष्ट्रीय युवा आयोगाच्या भूतपूर्व सदस्य.

*(महिला आरक्षण म्हंटले की, आपल्या डोळ्यांसमोर राजकीय आरक्षणच येते.याचे स्वाभाविक कारण म्हणजे सत्तास्थानी बसलेल्या लोकांची दखल अधिक घेतली जाते,तसेच येथे राहून अधिक प्रभावीपणे स्त्रिया काम करु शकतात व समाजावर त्या कामाचा प्रभावही अधिक पडतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणद्वारा विभिन्न स्थानी सत्तेवर आलेल्या महिलांनी हे सिद्ध करून दाखविले आहे. अजून वरच्या स्तरावर मात्र 'महिला आरक्षण' अस्तित्वात आलेले नाही. अनेकदा याचा प्रस्ताव मांडला गेला, दिवस–न–दिवस चर्चेच्या फैरी झडल्या तरी अजूनही त्याला सर्वसंमती न मिळाल्याने हा प्रस्ताव थंड्या बस्त्यात पडला आहे. काही वर्षांपूर्वी या विषयातील तज्ज्ञांनी याला विभिन्न पर्यायही सुचविले होते,पण त्यावर सर्वसंमती होऊ शकली नाही. २०१० मध्ये यासंबंधीचे बील राज्यसभेत पास झाले, पण लोकसभेत मात्र याला विरोध करण्यात आला. त्या लोकसभा विसर्जनाबरोबरच हे विधेयकही संपुष्टात आले, जे आजतागायत परत मांडले गेलेले नाही. साधारण १० वर्षांपूर्वी लिहिलेल्या या लेखात त्या वेळच्या स्थितीचा आढावा घेतला आहे.)*

'महिला आरक्षण' म्हणजे विविध ठिकाणी महिलांना पुढे येण्याची संधी प्राप्त व्हावी म्हणून दिलेल्या सवलती होय. शिक्षण,नोकऱ्या,विविध समित्या इ. ठिकाणी महिलांना काही प्रमाणात राखीव जागा ठेवल्या जातात,या प्रमाणेच राजकारणात किंबहुना सत्ताकारणात महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे म्हणूनही त्यांच्या करिता जागा राखीव ठेवल्या जातात. अर्थात हे आरक्षण सध्या तरी केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेतच लागू आहे. अनेक वर्षांपसून लोकसभा व विधानसभेतही हे लागू करावे म्हणून मागणी होत असली, तरी अजून मात्र ते भिजत घोंगडेच पडले आहे. या 'महिला आरक्षण विधेयका'चा संपूर्ण प्रवास विविध वळणे घेत पुढे गेलेला दिसतो.

१९९३मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ३३% आरक्षण ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती द्वारा अमलात आले. त्या आधीच कर्नाटक सरकारने २५% आरक्षण लागू केले होते, तर १९९० मध्ये महाराष्ट्र सरकारने सुरवातीला ३०% व नंतर १९९३ मध्ये ३३% आरक्षण ग्रामीण तथा शहरी स्थानिक स्वराज्य

संस्थेमध्ये कायदा पारित करून आणले होते. या बाबतीत महिलांनी किंवा महिला संघटनांनी याची मागणी लावून धरली होती,असे घडले नाही. तसे अचानकच हे बील समोर आले.त्यामुळे या आरक्षणाद्वारे १९९६ पर्यंत सुमारे दहा लाख महिला वेगवेगळ्या सत्तास्थानी आल्या, तरी लोकसभा वा राज्यसभेतही या प्रकारचे आरक्षण आणावे याकडे कोणाचे फार लक्ष गेले नव्हते. १२ सप्टे.१९९६ ला देवेगौडा सरकारने ८१ वी घटनादुरुस्तीद्वारा अकराव्या लोकसभेत प्रथम या प्रकारचे 'महिला आरक्षण विधेयक' मांडले. लोकसभा व विधानसभा येथील १/३ आरक्षणासह ते संयुक्त संसदीय समिती समोर आले.यापूर्वी जरी काही समित्यांसमोर काही संघटनांच्या प्रतिनिधींनी याबद्दल निवेदनं दिली होती, तरीही हे विधेयकही महिला संघटना किंवा अन्य लोकांच्या मागणीवरून ते या ठिकाणी मांडले गेले असे म्हणता येत नाही. हेच विधेयक पुढे Women Reservation Bill (WRB) या नावाने प्रचलित झाले. मात्र अकराव्या लोकसभेच्या बरखास्तीबरोबर ते ही संपुष्टात आले.

१४ डिसेंबर १९९८ ला अटलबिहारी वाजपेयींच्या एनडीए सरकारने ८४ वी घटना दुरुस्ती करून हे आरक्षण विधेयक १२ व्या लोकसभेत मांडले. त्याला १५ वर्षाची कालमर्यादाही लावली गेली होती. मात्र १९९८ला लोकसभेच्या बरखास्तीबरोबर हेही संपुष्टात आले. २३ डिसेंबर १९९९ ला परत एनडीए सरकारने १३ व्या लोकसभेत ८५ वी घटनादुरुस्ती द्वारा ते मांडले. पण त्याही वेळा सर्व राजकीय पक्षांमध्ये यावर एकमत होऊ न शकल्याने त्याचे भविष्य अंधारातच राहिले. २००२ मध्ये एकदा व २००३ मध्ये दोनदा परत हे विधेयक मांडून पारित करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला गेला. २००४ मध्ये युपीए सरकारने त्यांच्या जाहिरनाम्यामध्ये त्याचा अंतर्भाव केला. २००८ मध्ये सरकारने हे विधेयक तांत्रिक दृष्टया रद्द होवू नये म्हणून १०१ वी घटनादुरुस्ती करून राज्यसभेत परत मांडले. २००९ मध्ये परत एकदा १०८ वी घटनादुरुस्तीद्वारा हे विधेयक मांडले गेले. वारंवार घटना दुरुस्ती करून तत्कालीन सरकारद्वारा हे विधेयक मांडल्या गेले, परंतु दुर्दैवाने परत परत ते तेवढ्याच जोरकसपणे फेटाळले गेले. महिला संघटनांनीही ते पारित व्हावं म्हणून विविध प्रकारे प्रयत्न केलेत. पण सतत कुणी ना कुणी त्याला विरोध करत गेले. विरोध करणाऱ्यांना 'आहे त्या स्वरुपात विधेयक' नको होते, तर महिला संघटनांनी 'आहे त्या स्वरूपात'च ते पारित व्हावं असा हट्ट धरला होता.

२०१० मध्ये कॅबिनेटने त्याला राज्यसभेत मांडण्याची मंजूरी दिली.८ मार्च २०१० ला राज्यसभेत हे विधेयक पारित करण्याचा खूप प्रयत्न झाला. या दरम्यान ६ वेळा सदन बरखास्त करण्यात आले. या वेळी काँग्रेसला या संदर्भात कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा देण्यास अपयश आले व हतबुद्ध होवून परत एकदा त्या विधेयकाचे द्रौपदीसारखे वस्त्रहरण होतांना निमूटपणे पहावे लागले. मात्र ९ मार्च २०१० ला अनेक प्रयत्नानंतर १८६ मतांनी ते राज्यसभेत पारित झाले. केवळ एक मत त्याच्या विरोधात नोंदवले गेले, तर तृणमूल काँग्रेसने त्या वेळी अनुपस्थित राहण्याचे ठरवले. बहुजन समाज पक्षाने मतदानावर बहिष्कार घातला व आता सगळे हे विधेयक लोकसभेत मांडण्याची वाट पाहत आहेत. या विधेयकाला विरोध करणाऱ्यांमधे राजदचे लालूप्रसाद यादव व समाजवादी पार्टीचे मुलायमसिंह यादव हे प्रामुख्याने होते. त्यांच्या

मते हे विधेयक फक्त उच्चभ्रू महिलांनाच सत्तास्थानी पोचवेल व मागासलेल्या तसेच मुस्लीम समाजातील महिलांना यात काहीही स्थान राहणार नाही.

हे 'महिला आरक्षण विधेयक'नेमके काय आहे,त्यात नेमक्या कुठल्या मुद्द्यांचा अंतर्भाव केला आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.यातील ठळक मुद्दे पाहिले तर लक्षात असे येते की, याद्वारा लोकसभेतील आणि विधानसभेतील जवळपास १/३ जागा किंवा ३३% जागा महिलांसाठी आरक्षित असणार आहेत.म्हणजेच लोकसभेत १८१ तर एकूण २८ राज्यातील विधानसभांमधील ४,१०९ जागांपैकी १,३७० जागा महिलांसाठी आरक्षित असतील. ज्या जागा अनुसूचीत जाती व जमातींसाठी राखीव आहेत, त्याही ठिकाणी तसेच आरक्षण राहील. हे आरक्षण फिरते असेल. चिठ्ठी पर्याय (draw of lots) पद्धतीने लागोपाठच्या तीन निवडणुकांमध्ये तो मतदारसंघ महिलांकरिता फक्त एकदाच आरक्षित होईल,याची काळजी घेतली जाईल.

यावर ज्या विविध मुद्द्यांना घेउन रान माजवले गेले, ते लक्षात घेउन मधल्या काळात विभिन्न तज्ज्ञांनी या विधेयकाला निरनिराळे पर्याय देखील सुचवले आहेत. राखीव जागांना विरोध करणाऱ्यांनी 'फोरम फॉर डेमोक्रेटीक रिफॉर्म्स' द्वारा १९९८ मध्ये 'पर्यायी विधेयक' मांडले. त्यांच्या कार्यकर्त्या मधु किश्वर यांनी आपल्या 'मानुषी' या द्वैमासिकातून याचा सतत पाठपुरावा केला व 'मिळून साऱ्याजणी' नेही याचा पुरस्कार केला. त्यांनी त्यात पुढील मुद्दे प्रामुख्याने मांडले होते.फिरत्या आरक्षणामुळे निर्माण होणारी अनिश्चितता लक्षात घेता व दुसऱ्यांदा तो मतदारसंघ खुला झाल्यावर त्यातून महिला बाहेर फेकल्या जाण्याची संभावना असल्याने, मतदारसंघ राखीव करण्याऐवजी प्रत्येक अधिकृत राजकीय पक्षांना १/३ मतदारसंघात स्त्रियांची उमेदवारी देणे बंधनकारक करावे. याकरिता १९५१ च्या Representation of the People Act मध्ये तशी सुधारणा करावी. ज्या पक्षात असे होणार नाही तेथे प्रत्येकी महिला उमेदवारामागे दोन पुरुष उमेदवाराची हकालपट्टी करणे बंधनकारक असेल,असे त्यात प्रावधान ठेवावे.

मुकेश दलाल, रामी छाब्रा यांनीही २००० मध्ये महिलांकरिता ५०% मतदारसंघ द्विसदस्यीय करावेत असे सुचवले होते. १५ जुलै २००३ ला मनोहर जोशी लोकसभेचे प्रवक्ता असतांना या विषयाकरिता चार राजकीय पक्षांची एकत्रित बैठक झाली, ज्यात भाजप, इंडियन नॅशनल काँग्रेस(आय),भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी व समाजवादी पक्ष; यांचा समावेश होता. त्यात १/३ द्विसदस्यीय मतदारसंघाचा पर्याय पुढे आला. यात त्या मतदारसंघात एक पुरुष व महिला सदस्य असेल, अशी योजना प्रस्तावित केली होती. सरकारकडे त्याचा मसूदा तयार करण्याची मागणीही वारंवार केली गेली. १९ जुलैला भाजपच्या रायपूरच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत ५४३ पैकी १८१ मतदारसंघ एकदाच द्विसदस्यीय,म्हणजे १पुरुष व १ महिला; असे करावेत असा ठरावही पारित झाला. परिणामत: प्रत्येक निवडणूकीत यामुळे लोकसभा सदस्यांची संख्या ७२४ (३६२+ १८१ + १८१) अशी होईल,असे त्यांनी मांडले. हेच राज्यसभेला व अनुसूचित जाती–जमातीच्या आरक्षणाला लागू होईल,अशी तजवीज यात होती. यात महिलांना ३३% च्या ऐवजी २५% च प्रतिनिधित्व मिळणार होते (७२४ पैकी १८१)याला पुढे काँग्रेसने विरोध केला. २००५–२००६ मध्ये शिवराज पाटील यांनी तर पार्लमेंटच्या जागाच वाढवून ८०० करा असे म्हटले. २००८–०९ मध्ये भारतीय स्त्री शक्तिसारख्या महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या संघटनेनेही द्विसदस्यीय मतदारसंघाची मागणी केली,जेणे करून महिलांना समान संधी मिळू शकेल.

हे जे विविध पर्याय समोर आलेत त्या सगळ्यात काही ना काही त्रुटी आहेत,असे लक्षात येते. मधुकिश्वरने जो पर्याय मांडला त्यात जो राजकीय पक्ष याचे पालन करणार नाहीत,त्यांचे एका महिला उमेदवारामागे दोन पुरुष सदस्य निलंबित करावेत असे म्हंटले आहे, पण ते दोन सदस्य नक्की कुठले निलंबित करायचे याची स्पष्टता नाहीये. तसेच यात अशीही होण्याची भीती व्यक्त केली जाते की, जे मतदारसंघ कमजोर असतील ते महिलांना दिले जातील. यात स्त्रियांना केवळ १/३ उमेदवारी दिल्यास स्त्रियांचे प्रतिनिधित्व खरेच वाढेल असे सांगता येत नाही. कारण ज्या जागा जिंकता येणे कठीण आहे, अशाच जागा पक्षामार्फत स्त्रियांना देण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका अहवालानुसार अर्जेंटिनात ३०% स्त्रियांना तिकीट देण्याची तरतूद केल्यावरही निवडून आलेल्या उमेदवारांत स्त्रिया केवळ १% होत्या.रामी छाब्रा व इतरांनी जे ५०% द्विसदस्यीय आरक्षण सुचविले आहे ते कुठल्या आधारावर याची स्पष्टता नाही.तसेच मनोहर जोशी यांनी १८१ मतदारसंघ द्विसदस्यीय व फिरते करावे असे सुचविले, त्यात ते फिरते असल्याने यावेळी नक्की कुठले महिलांसाठी राखीव असणार याची निश्चिती नसणार. त्यामुळे याची टांगती तलवार संभाव्य उमेदवारावर असणार आहे. तसेच शिवराज पाटील यांनी मतदारसंघांची संख्या ८०० करायला सांगितली आहे, त्याचा महिलांना नक्की कोणता व कसा उपयोग होईल याबद्दल साशंकता आहे.

अशाप्रकारे महिला आरक्षण विधेयकाच्या या पर्यायांमधे जशा त्रुटी आहेत,तशीच स्थिती मुळात आत्ता मांडल्या गेलेल्या विधेयकाची ही आहे.वर उल्लेख केल्याप्रमाणे फिरते आरक्षण असल्याने दर निवडणुकात १/३ मतदारसंघाचे भवितव्य व तेथील वर्तमान पुरुष वा स्त्री आमदार–खासदारांचे भवितव्य अनिश्चित असेल. हे विधेयक संसदेत प्रलंबित राहण्याचे प्रमुख कारण म्हणजे ही फिरत्या आरक्षणाची तरतूद आहे. हे विधेयक पास झाल्यास विद्यमान पुरुष तसेच स्त्री खासदारांपैकी १८१ जणांना पुढील सार्वत्रिक निवडणुकीत आपला मतदारसंघ गमवावा लागेल. जें अयोग्यही आहे व त्यांच्या दृष्टीने ही राजकीय आत्महत्या आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांमधेही ते तसेच आहे. पण मुळात लोकसभा वा राज्यसभाच्या निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत खूप अंतर आहे. लोकसभा वा राज्यसभेच्या मतदारसंघाची बांधणी करायला भरपूर वेळ व कष्ट लागतात.त्यामुळे तेथे जर अनिश्चितता असेल व सातत्य नसेल तर स्थानिक लीडरशीप विकसीत होणे कठीण होऊ शकते. तसेच आत्ताचा हा मतदारसंघ उद्या आपला राहणार किंवा नाही याची शाश्वती नसली तर तिथे फार कष्ट न घेण्याची व उलट संधी मिळाली आहे तर जमेल तेवढे लुटून घेण्याची मनोवृत्ती देखील बोकाळण्याची शक्यता नाकारता येत नाही.शिवाय यात एक धोका असाही आहे की,एकदा तो मतदारसंघ खुला झाला तर परत त्या ठिकाणी महिलांना जागा न देण्याची वृत्ती ही निर्माण होऊ शकते. १५ वर्षांसाठी आरक्षणासाठी घातली गेलेली मर्यादा देखील चुकीची आहे असे लोकांना वाटते.कारण तेवढी कालमर्यादा संपली कि पुन्हा महिलांचे प्रमाण खाली येण्याची शक्यता आहे.

या बरोबरच ओबीसी व अल्पसंख्य महिलांना आरक्षण नसणे,ही पण यातील दूसरी मोठी त्रुटी आहे.अनुसूचित जाती–जमाती यांचे प्रमाण निश्चित असल्याने त्यानुसार आरक्षण त्यांना कायम स्वरूपी दिले

गेले, परंतु ओबीसीत ज्या जातींचा समावेश आहे त्या काही राज्यात मागास आहेत तर काहीत त्या मागास वर्गात मोडत नाहीत किंवा अनुपस्थित आहेत. त्यामुळे सरसकट नियम करणे कठीण जाते. एक जात एका राज्यात ओबीसीत आहे, ती दुसऱ्यात असेल असे नाही. तसेच अल्पसंख्यकांचेही आहे. त्यामुळे विद्यमान ३३% आरक्षणात या सगळ्यांचा विचार व अंतर्भाव म्हणूनच कठीण आहे. या विधेयकाबाबत संयुक्त समितीने हे राज्यसभेला लागू करु नये असा प्रस्ताव दिलेला असताना याला विरोध होतो आहे याचे हेही कारण आहे की 'आम्ही लोकसभावाल्यांनीच का हे झेलायचे' असे त्यांना वाटते. म्हणूनच मूळ कारणे न सांगता समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातून हा विरोध होतो आहे, असे भासविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

या विधेयकाबाबत राजकीय पक्षांची पण आपली काही मतं व आक्षेप आहेत. हे विधेयक आल्यास या स्तरावर निवडणुकीत उभ्या करण्याकरिता एवढ्या मोठ्या संख्येत सक्षम महिला त्यांना शोधाव्या लागणार आहेत. सदर सत्तास्थानी महिलांच्या तुलनेत पुरुषच अधिक संख्येत असल्याच्या इतक्या दिवसाच्या सवयीमुळे या नवीन बदलाला सामोरे जाणेही त्यांना जड जाऊ शकते. राजकीय पक्षाप्रमाणे समाजातही विद्यमान विधेयकाबाबत मतमतांतरे आहेत. काहींच्या मते महिलांना आरक्षण देणेच चुकीचे आहे. यातून 'महिला सक्षम नाहीत' हेच आपण अधोरेखीत करतो.त्याच बरोबर अशा आरक्षणाने ज्या महिला सक्षम नाहीत, त्याही सत्तास्थानी जाऊन बसतील व त्यामुळे समाज आणि राष्ट्रकार्यात त्या योग्य योगदान देण्यास ही असमर्थ राहतील. उलट आरक्षण नसेल तर ज्या खऱ्या सक्षम असतील त्या पुढे जातील व त्यांचा खरा उपयोग समाजाला होईल. काहींची मते तर महिला आरक्षणा बाबत अगदी टोकाची आहेत. त्यांच्या मते ज्या महिला आज त्या ठिकाणी आहेत, त्या तरी काय दिवे लावताहेत,म्हणून आपण आणखी महिला आरक्षणामार्फत महिलांना तेथे पाठवित आहोत. अर्थात हा नियम पुरुषांनाही लागू आहेच. तेथे तरी अगदी सगळे पुरुष लोकप्रतिनिधी उत्तम काम करतात असे चित्र नाही. जे लोक महिलांनी अशा सत्तास्थानी जाण्याचे व त्यातून होणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणाचे समर्थन करतात, त्यांना काही जण 'महिला राजकारणात गेल्या म्हणजेच त्यांचे सक्षमीकरण होणार आहे काय',असाही प्रश्न करतात.

महिला आरक्षणाबाबत स्त्रीवादी संघटना किंवा महिला कार्यकर्त्यांची देखील आपली काही मतं आहेत. मुळात त्यापैकी काहींना इतर काही जणांप्रमाणेच 'महिला आरक्षण मागणे म्हणजेच महिला अबला आहेत हे सिद्ध करणे' वाटते. तसेच या आरक्षणातून खरे नेतृत्व पुढे न येता पुरुष डमी महिला किंवा कठपुतळ्यांनाच पुढे करतील व त्यांच्या आडून स्वतःच सत्तेचा लाभ घेतील; ही भीती वाटते. या सगळ्याचा परिणाम असा होतोय की,अनेक वेळा प्रयत्न करुन ही आरक्षणाचे हे घोंगडं भिजत पडलेले आहे.तसेच ज्यांच्यासाठी आरक्षण मागतोय, तो महिला समाजही हे आरक्षण आम्ही स्वीकारायला हवंय व यातून चांगलं काहीतरी होईल, हे मानायला तयार नाहीये.

या सगळ्यामागे मुख्यत्वे करून आपले समाजमानस कारणीभूत आहे. स्त्रियांनी कुठली कामे करावीत व करु नये याकडे पहाण्याचा एक पारंपरिक दृष्टिकोन आपल्याकडे आहे.तसाच तो पुरुषांसाठीही आहे.

आजही स्त्री–पुरुषांच्या कामाकडे व त्यांच्या घर वा समाजातील स्थानाकडे आपण पारंपरिक दृष्टिकोनातूनच पाहतो. खरे तर अगदी वेदकाळापासून स्त्रिया सत्तास्थानी असण्याची उदाहरणं आपल्याकडे आहेत. तरीही सत्तास्थानी त्या असण्याची समाजाला व त्यांना स्वत:लाही सवय नाही.अगदी आपातकालीन स्थिती असेल तरच महिलांनी सत्ता सांभाळावी, अन्यथा पुरुषच त्या ठिकाणी असणे योग्य असे आपल्याला वाटते. घर असो वा घराबाहेरील जग, पुरुष सत्ताकेंद्री व स्त्री त्याची अनुगामिनी असण्याची आपल्या सगळ्यांना सवय झाली आहे. परिणामत: स्त्रीला सत्ता गाजविणे किंवा सांभाळणे आणि पुरुषाला स्त्री नेतृत्वाखाली काम करणे कठिण जाते. कविता महाजनांनी आपल्या 'ब्र' या पुस्तकात याची अनेक उदाहरणं दिलेली आहेत.स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिला आरक्षणाच्या माध्यमातून सरपंच,जिल्हापरिषद अध्यक्ष या प्रकारच्या सत्तास्थानी असलेल्या महिलांना काय प्रकारचा त्रास होतो,हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. १९९८ साली 'भारतीय स्त्री शक्ति' या महिला संघटनेने महाराष्ट्रातील महानगरपालिकेतील निवडून आलेल्या विविध पदावरील महिलांचा अभ्यास केला होता.त्यातही अशाच प्रकारचे अनुभव त्या महिलांनी सांगितले होते. त्यामुळे विद्यमान महिला आरक्षण विधेयकाला जो विरोध होत आहे व त्या करीता जी निरनिराळी कारणं दिल्या जात आहेत, ती कमी अधिक प्रमाणात खरी जरी असली तरी मुळात 'या' विषयाकडे बघण्याचा समाजाचा 'पारंपरिक दृष्टिकोन' हे मुख्य कारण आहे, असे लक्षात येते.

समाजाने या विषयाकडे अधिक गांभीर्याने व जबाबदारीने पहाण्याची गरज आहे. भारतात अनेक वेळा स्त्रियांनी अशा प्रकारचे नेतृत्व दिल्याची परंपरा आहे. स्त्रियांनी विविध प्रसंगी आपली क्षमता सिद्ध केलेली आहे. अगदी अलीकडच्या काळातील उदाहरण द्यायचे तर स्वातंत्र्यपूर्व काळात मोठ्या प्रमाणात महिलांनी आंदोलनात सहभाग दिला, आंदोलनाचे यशस्वी नेतृत्व केले. एवढेच नव्हे तर त्या काळात राजकीय क्षेत्रातही त्या पुढे होत्या.पण स्वातंत्र्योत्तर काळात मात्र हे चित्र बदलत गेले व आज संसदेत १०% पेक्षा अधिक महिला दिसत नाहीत ही खरोखरच शरमेची गोष्ट आहे. महिला राजकारणात आल्याने,संसदेसारख्या ठिकाणी आल्यावर निर्णय प्रक्रियेत महिलांचा थेट सहभाग वाढतो. जो न्याय आपण 'वेगवेगळ्या क्षेत्रात महिला असायला हव्यात' असे म्हणतांना लावतो तोच याही क्षेत्राला लागू होतो. या ठिकाणी महिला योग्य प्रमाणात आल्या तर खऱ्या अर्थाने ते संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व असणार आहे. अन्यथा आजच्या संसदेत या ५०% स्त्री समाजाचे योग्य संख्यात्मक प्रतिनिधित्व नाही, ही वस्तुस्थिती आहे.

स्त्रियांच्या आजच्या सत्ता सहभागाचे अनेकविध सकारात्मक परिणाम आपल्याला दिसताहेत. हे प्रमाण वाढण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.आज विविध प्रकारच्या सत्तेपासून स्त्रिया वंचित राहिल्याचा परिणाम म्हणजे वाढलेला कौटुंबिक हिंसाचार, स्त्री भ्रूणहत्या, हुंडाबळी, बलात्कार, वेश्याव्यवसायात ढकलणे जाणे; यासारख्या अत्याचारांना स्त्रिया बळी पडत आहेत. जगभरातील अवघी १% संपत्ती स्त्रियांच्या मालकीची आहे तर गरीबांमध्ये ७५% स्त्रिया आहेत. सर्व क्षेत्रात सत्तास्थानांमध्ये स्त्री–पुरुषांची समान भागीदारी सुरु होणे समाजाच्या हिताचे आहे. सत्तावान, सामर्थ्यवान घटकांवर कोणीही अत्याचार, अन्याय करू धजत नाही तर उलट दुर्बल घटक अन्यायाला बळी पडतात, हे सर्व विदित आहे.

महिलांचे योग्य प्रतिनिधित्व संसदेत जर असेल, तर त्याचा एक थेट परिणाम असा होणार आहे की, यापुढे विविध विषयांकडे स्त्रियांच्या नजरेतून पाहीलं जाईल व त्यामुळे त्याचे नवीन आयामही लक्षात येतील. निर्णय घेतांना स्त्रियांचा दृष्टिकोन लक्षात घेतल्याने त्याला खऱ्या अर्थाने पूर्णता येईल. दूसरे म्हणजे समाजाच्या या ५०% भागाचा राष्ट्रीय विकासात थेट सहभाग यातून होणार आहे. याचा एक अप्रत्यक्ष पण दूरगामी परिणाम असाही होईल की, समाजात व पर्यायाने कुटुंबात स्त्रीला मानाचे स्थान मिळाल्याने एकूणच तिच्या वैयक्तिक व सामाजिक आयुष्यावर त्याचा सकारात्मक परिणाम होईल. आज स्त्री कडे 'बोजा' म्हणून जे पाहिले जाते व त्यामुळे स्त्री भ्रूणहत्येसारखे जे प्रकार घडतात त्यालाही बऱ्याच अंशी आळा बसेल. 'स्त्री' हे ओझे नसून कुटुंबासाठी सामर्थ्य व सत्तेचा एक स्त्रोत आहे असे समीकरण तयार होवून त्याचा दूरगामी परिणाम स्त्रियांविरुद्धचा सर्व स्तरावरचा व सर्वप्रकारचा भेदभाव संपण्यात देखील होईल. त्यामुळे सुबुद्ध समाजाने या विषयाचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

आज जगभरातील विविध देशांना स्त्री–पुरुष समानते संदर्भात स्त्रियांच्या राजकीय सत्ता सहभागाचे महत्व पटल्यामुळे जगातील सुमारे १०० देशांनी स्त्रियांसाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारे आरक्षण अंमलात आणले आहे. पाकिस्तानी संसदेत २२%, बांगला देशात १८% व तर नेपाळच्या घटना समितीत ३३% स्त्रियांचे प्रतिनिधित्व आहे. मात्र जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून मिरवणाऱ्या भारतात मात्र आरक्षण यायला प्रतीक्षा करावी लागते आहे. स्त्रियांना दिलेली आश्वासनं पाळली नाहीत तरी चालतात असा एक हानीकारक संदेश हे महिला आरक्षण विधेयक गेली कित्येक वर्ष भिजत पडल्यामुळे दिला गेला आहे. 'महिला आरक्षण विधेयक' आहे त्या स्थितीत तत्काळ पारित झाले तरी त्याचे स्वागतच आहे. मात्र ते जर उपरोल्लेखित कारणांमुळे पारित होत नसेल तर वर्तमान विधेयकातील त्रुटी दूर करून त्यातल्या त्यात योग्य पर्याय पुढे आणून हे विधेयक पारित करण्यास सर्व परीने प्रयत्न करण्याची आणि वेळ प्रसंगी त्या करीता दबावही आणण्याची गरज आहे.

**महिला उपराज्यपाल**

| | | | |
|---|---|---|---|
| चंद्रावती | १९/२/१९९० | १८/१२/१९९० | |
| राजेंद्र कुमारी वाजपेयी | २/५/१९९५ | २२/४/१९९८ | |
| रजनी राय | २३/४/१९९८ | २९/७/२००२ | |
| किरण बेदी | २९/५/२०१६ | १६/२/२०२१ | |
| तमिलसाई सुंदरराजन | १८/२/२०२१ | १८/३/२०२४ | (अतिरिक्त भार) |

स्त्रोत : कायदेनिर्मितीत स्त्रियांचे योगदान; डॉ. विद्या देवधर

# नारी शक्ति वंदन अधिनियम



**विभावरी बिडवे**
वकील, लेखिका, सामाजिक कार्यकर्ता

संविधानामध्ये नमूद असलेली स्वातंत्र्य, समता, न्याय ही मूल्ये आचरणात आणायला भारताला स्वातंत्र्यानंतर फार काळ घ्यावा लागला नाही. जगात अनेक देशांमध्ये स्त्रियांना त्यांच्या मतदानाच्या हक्कांसाठीसुद्धा लढा द्यावा लागला होता. मात्र स्वतंत्र भारतात मात्र स्त्रियांचा मतदानाच्या व्यतिरिक्तही राजकीय सहभाग ही अगदी सहज साध्य झालेली गोष्ट होती. संविधान सभेतही महिलांचे कमी असले तरी योगदान होते. आणि लवकरच देशाच्या सर्वोच्च पदावरही एक महिला विराजमान झाली. ह्याचे कारण म्हणजे भारताला प्राचीन काळापासून महिला राज्यकर्त्या, लढवैय्या, प्रशासक असण्याची सवय होती. अगदी रामायण महाभारतातही अशा कैकेयी, सत्यभामा, मंदोदरी, शिखंडीनी सारख्या वीरांगना, तारा, द्रौपदी, पद्मावती गुप्ता, रुद्रमा देवी, अहिल्यादेवी ह्यांच्यासारख्या कुशल प्रशासक भारताने पाहिल्या आहेत.

संविधानाने संधींची समानता देऊनही आणि इथल्या मातीतही गुणवत्तेपुढे लैंगिक भेदभाव मानला नाही असे असूनही, हेसुद्धा खरे आहे की स्वातंत्र्योत्तर महिलांचे राजकारणातील प्रतिनिधित्व अत्यंत कमी राहिले आहे. २०१९ मध्ये देखील संसदेत ५४२ जागांपैकी ७८ महिला होत्या. म्हणजेच त्यांचे प्रमाण केवळ १४.४% होते. तर राज्यसभेतही ११% महिला सदस्य आहेत. १९५७ साली निवडणुकीत उभ्या राहिलेल्या महिलांचे प्रमाण हे एकूण उमेदवारांच्या २.९% होते तर २०१९ मध्ये त्यात फार वाढ न होता ते ९% झाले. महिलांमध्ये शिक्षणाचा अभाव, राजकीय अज्ञान, परंपरागत लैंगिक भेदभाव आणि हिंसाचार, बालसंगोपन आणि कौटुंबिक जाबाबदाऱ्यांचे एकटीवर पडणारे ओझे, अशा अनेक समस्यांमुळे स्त्रीचा राजकीय सहभाग मर्यादित राहीला, ही वस्तुस्थिती आहे. पण लोकसंख्येचा निम्मा भाग असलेल्या गटाचे असे समाज आणि राजकारणा बाहेर राहणे हे समग्र सामाजिक विकासाच्या दृष्टीने अयोग्य आहे.

राजकारणात तेही केंद्र आणि राज्य पातळीवर प्रतिनिधित्वाचे समाजाला अनेक लाभ आहेत. स्वातंत्र्यपूर्व वंचित समाजाची अन्यायाविरुद्ध आणि आपल्या हक्कांसाठी एक खूप मोठी चळवळ उभी राहिली आणि तिला उत्तम नेतृत्व ही लाभले. स्त्रियांची अशी काही स्वतंत्र चळवळ उभी राहिली नाही, तर त्याही वेळेस मुख्यत्वे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, म. फुले असे पुरुषच त्याकरिता पुढे आले. मात्र स्वतःच्या हक्कांसाठी

एका उच्च पातळीवरून बदल घडवून आणण्यासाठी स्त्रियांचे प्रतिनिधित्व अत्यंत गरजेचे आहे कारण आज लोकसंख्येचा निम्मा भाग स्त्रियांनी व्यापलेला असूनही तिच्यासाठी निर्णय घेणारे, कायदे करणारे मुख्यत्वे पुरुषच आहेत. समाजामध्ये सर्व घटकांचे योगदान हे तत्त्व आपण मूलतः स्वीकारलेले आहे. तसे नसल्यास त्याला प्रातिनिधिक लोकशाही असे म्हणता येत नाही. त्यामुळेच लोकशाहीच्या शाश्वततेसाठी ते अत्यंत आवश्यक आहे. स्त्रीचा स्वतःचे प्रतिनिधित्व करण्याचा आणि स्वनिर्णयाचा अधिकार तिच्या कमी प्रतिनिधित्वामुळे लोप पावत आहे आणि एक समाज म्हणून संतुलित राहण्यासाठी ही अयोग्य गोष्ट आहे.

स्त्रियांचा राजकारणात वाढता सहभाग हा सर्वांनाच लाभदायक ठरू शकतो. स्त्रियांच्या उपजत गुणांमुळे त्या विविधांगी बाजूने सारासार विचार करणे, वाटाघाटी करणे, फलदायी चर्चा घडवून आणणे, उत्तम संघटन बांधणी करणे अशी कार्ये विशेष यशस्वीरित्या घडवून आणू शकतात. परस्पर सहकार्य, वेळ आणि पैसा बचत करण्याची प्रवृत्ती, स्त्रियांच्या आणि कुटुंबाच्या प्रश्नांची उत्तम जाण ह्या गोष्टी त्यामध्ये अधिक भर घालतात. त्यामुळेच स्त्रियांना राजकरणातून वगळणे हे कोणत्याच समाजाला फायदेशीर नाही. आणि तरीही अनेक गोष्टींमुळे तिचा सहभाग अजूनही वाढत नाहीये, ह्याच समस्येवर उपाय म्हणून तिचे प्रतिनिधित्व वाढावे ह्या हेतूने महिलांसाठी संसदेत, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विधीमंडळात ३३% जागा आरक्षित ठेवण्याचे 'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयक संसदेत सप्टेंबर २०२३ मध्ये पारित करण्यात आले, त्यावर राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू ह्यांनी २८ सप्टेंबर २०२३ रोजी सही केली आणि आज हा कायदा अंमलबजावणीयोग्य आहे. अनुसूचित जाती आणि जनजाती आरक्षणामध्येही हे आरक्षण लागू होणार आहे. सुरुवातीस १५ वर्षांपर्यंत हे लागू राहील, मात्र ते चालू ठेवण्याची उपाययोजनाही संसद करू शकेल. १९९६ सालापासून माहिला आरक्षण विधेयक संसदेत उपस्थित होत आहे, मात्र बहुमताअभावी ते पारित होऊ शकले नव्हते. अर्थातच जनगणना आणि मतदारसंघांचे भौगोलिक सीमांकन केल्याखेरीज ह्याची अंमलबजावणी होऊ शकणार नाही.

ह्या आरक्षणाला एक खूप मोठी पार्श्वभूमी आहे. १९८८ सालीच महिला राष्ट्रीय परिप्रेक्ष योजनेने पंचायत ते संसदेपर्यन्त महिलांसाठी आरक्षण असावे अशी सूचना केली होती. राष्ट्रीय महिला सबलीकरण नीती २००१ मध्येही महिला आरक्षणाबाबत विचार केला जाईल असे म्हटले. २०१३ मध्ये महिला व बालविकास मंत्रालयाने महिलांच्या स्थितीबाबत एक समिती स्थापन केली, जिने ५०% आरक्षण देण्याचे सुचवले. २०१५ मधील महिलांच्या स्थितीवरील अहवालामध्येही महिलांचे प्रतिनिधित्व निराशाजनक आहे असे म्हटले आणि ५०% जागा आरक्षित करण्याची सूचना केली.

महिलांचा स्थानिक शासनामध्ये सहभाग वाढावा ह्यासाठी १९९२ सालीच ७३ आणि ७४ अशा महत्त्वपूर्ण संविधान दुरूस्त्या करून स्थानिक स्वराज्य संस्थांना सांविधानिक दर्जा देण्यात आला आणि त्यामध्ये महिलांना एक तृतीयांश अर्थात ३३% आरक्षण दिले गेले होते. महाराष्ट्रात त्यानुसार महिलांना पंचायतीत आणि नगरपालिकांमध्ये ५०% आरक्षण देण्यात आले. तीन दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या ह्या आरक्षित जागांमुळे महिलांचा स्थानिक विषयांमध्ये निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला. त्यातून अनेक उत्तम नेतृत्व उभी राहिली.

वरिष्ठ स्तरावरील महिला आरक्षणाचे उत्तम परिणाम निश्चितच आगामी काळात दिसणार आहेत. महिलांचे प्रतिनिधित्व हे आता केवळ प्रतीकात्मक न राहता प्रत्यक्ष प्रमाण वाढेल आणि लोकशाही खऱ्या अर्थाने लिंग–समावेशक आणि अधिक प्रातिनिधिक होईल. आत्तापर्यंत स्त्रियांचे विषय हे मंत्रालयामार्फत किंवा महिला आयोगामार्फत उपस्थित केले जात होते. मात्र आता स्त्रियांच्या स्वनिर्णयाचा अधिकार जपला जाईल. निर्णय प्रक्रियेत सुरक्षा, शिक्षण, आरोग्य, बालिका कल्याण ह्यावर त्या थेट बोलू शकतील. प्रसूती, शिक्षण, पोषण, लिंग समानता, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या यांसारख्या मुद्द्यांना प्राधान्य दिलं जाईल. आगामी काळात अशी अनेक विधेयके प्रस्तुत होतील. प्रत्यक्ष बजेटमध्ये स्त्रिया स्त्रियांचा विचार करतील आणि धोरणनिर्मितीला एक स्त्रीवादी दृष्टिकोन लाभेल. समाजाच्या आत्तापर्यंत उपेक्षित आणि महत्त्वाच्या व्यापक मुद्द्यांना आवाज लाभेल, धोरणांमध्ये स्थान मिळेल आणि प्रत्यक्ष योजनांची तरतूद होईल. ह्यामुळे निर्णय अधिक सर्वसमावेशक आणि समतोल होतील. महिला निवडून येऊ शकतील का? अशी धाकधुक पक्षांना वाटण्याची संधी ह्या आरक्षणाने दूर होईल, तिकीट नाकारले जाणार नाही. पहिल्या फळीतील महिला उमेदवार आणि सदस्य तरुण मुलींना प्रेरणा देतील आणि हे क्षेत्र फक्त पुरूषांचे नाही हा संदेश समाजात लवकरच जाईल. ह्या आरक्षणाने एकूणच महिलांचा पारंपरिक जेंडर रोल दृश्य स्वरूपात बदलेल आणि पुढच्या पिढ्यांना योग्य तो संदेश आणि प्रेरणा मिळेल. समाजकारणात आणि राजकारणात तिचा प्रवेश अधिक सुकर आणि सुगम होईल. वरिष्ठ स्तरावरील नेतृत्व केवळ स्त्रियांना राजकरणांत येण्यासाठीच प्रेरणा देईल असे नाही तर एकूण समाजजीवनात, नोकरी व्यवसायात येण्यासाठी दृश्य स्वरूपातील प्रेरणा देईल.

आरक्षण विधेयक पारित होऊनही अजूनही अनेक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय अडथळे ह्यामध्ये आहेतच. मतदारसंघांचे सीमांकन हा एक प्रमुख अडथळा आज ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आहे. पण त्या व्यतिरिक्त सामाजिक प्रश्नांवरही खूप मोठे काम करावे लागेल. स्त्रियांच्या सामाजिक सहभागात येणारी आणखी एक गोष्ट म्हणजे बाल संगोपन आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या प्रामुख्याने तिच्यावर पडत असल्यामुळे येणाऱ्या व्यावहारिक अडचणी. कौटुंबिक स्तरावर त्या दूर कराव्या लागतील. आज प्रसूती रजा कायद्याने १२ आठवड्यांपासून २६ आठवडे केल्यामुळे अनेक गोष्टी सुकर होत आहेत. स्त्रीच्या समाजप्रक्रियेत भाग घेण्यामध्ये एक मोठा अडथळा हा तिला लैंगिक छळाचा, गुन्ह्यांचा सामना करावा लागतो हा सुद्धा आहे. कार्यालये, संघटना ह्यांच्यावर हया संदर्भात काळजी घेण्याचे नैतिक बंधन हे समाजाने आचरणात आणूनच निर्माण होईल आणि राजकीय सहभागाची पूर्वतयारी म्हणून तिचा लोकसहभाग वाढेल. तिला मुक्त आणि सुरक्षित वातावरणात काम करण्याची संधी उपलब्ध असणे गरजेचे आहे.

महिलांना आजही प्रामुख्याने गृहिणी, आई, पत्नी या भूमिकांमध्ये मर्यादित केलं जातं. राजकारण हे 'पुरुषांचं क्षेत्र' आहे, असा पूर्वग्रह असतो. स्त्री जर राजकारणात जायला उत्सुक असेल, तरीही हे तिचं पारंपरिक क्षेत्र नाही म्हणून कुटुंब, समाज तिच्या विरोधात उभा राहतो. राजकारणात महिला सुरक्षित नाहीत, असेही मानले जाते. प्रचार, प्रवास, पक्षांतर्गत गटबाजी यामध्ये तिला स्वतःला आणि कुटुंबलाही

असुरक्षितता वाटते. निवडणूक लढवण्यासाठी पैसा, प्रचारासाठी संसाधने, तंत्रज्ञान यांची गरज असते. बहुतेक महिलांकडे ही संसाधनांची कमतरता असते. पारंपरिक दुय्यम भूमिकेमुळे स्त्रियांना अनेकदा स्वतःच्या आर्थिक गोष्टींचा निर्णय घेता येत नाही. अनेक स्त्रियांना मतदान, उमेदवारी, राजकीय पक्ष संरचना याबद्दल संपूर्ण माहिती नसते. नेतृत्वगुण, वक्तृत्व, प्रचार कौशल्ये यासाठी आवश्यक प्रशिक्षण तिला नसतं, तितका अवधीही तिला मिळत नाही.

आज राजकीय पक्षही तिला किती सामावून घेतील ह्यावरही विचार करायला हवा. बहुतेक राजकीय पक्ष महिलांना निवडणूक लढवायला फारसे तिकीट देत नाहीत. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ही प्रॉक्सि महिला उमेदवार देऊन कारभार मात्र त्यांचे पती बघतात असेही दृश्य अनेक ठिकाणी आहे. पुरुषांना प्रबळ महिला नेतृत्व उभं करण्याची खरोखर इच्छाशक्ती आहे का हे सुद्धा बघायला हवे. काही अपवाद वगळता पक्ष महिलांना केवळ 'महिला मोर्चा'पुरतेच मर्यादित ठेवतात.

वैयक्तिक स्तरावर स्त्रीला आत्मविश्वासाचा अभाव असू शकतो. 'मी राजकारणासाठी पात्र आहे का?' असा गोंधळ अनेक महिलांमध्ये असतो. तसेच स्त्रीचे महत्त्वाकांक्षी असणेही आजपर्यंत समाजाने नाकारले आहे. तिने तिची महत्त्वाकांक्षा कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून मग पूर्ण करावी, घराला तिची अधिक गरज असते ह्या विचारांमध्ये तीही अडकली आहे आणि समाजानेही गोष्ट फायदेशीर असल्याने उचलून धरली आहे. ह्यावर तिचा तिलाच कौशल्यपूर्वक मार्ग काढावा लागेल. तसेच पाळणाघरांसारख्या सोई तसेच त्यासाठीची मानसिकताही निर्माण करावी लागेल. राजकारणातील गुन्हेगारीकरण आणि गटबाजी ह्यावर नियंत्रण ठेवणेही तितकेच गरजेचे आहे. हे वातावरण स्त्रियांसाठी अजूनच कठीण आहे आणि सर्वच स्त्रिया अशा वातावरणात मुक्तपणे काम करू शकणार नाहीत. संसदेतील आणि विधिमंडळातील मार्ग प्रशस्त होताना तिचा लोकसहभाग वाढवण्यासाठी अशा अनेक बाबींवर काम करावे लागेल.


महिलांविषयी बोलताना महिला हा समाजाचा गट एकजिनसी नाही. त्यामध्ये धार्मिक, जातीय, आर्थिक सामाजिक भिन्न स्तर असलेल्या महिला असणारे अंतर्गत कप्पे आहेत. ह्या सर्वांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल हे सुनिश्चित करावे लागेल आणि महिलांच्या विषयांना जर प्राधान्य आणि आवाज द्यायचा असेल तर त्यांनी एक होऊनही काम करावे लागेल. जातीय, धार्मिक अशा समुदायांचे प्रतिनिधि, संघटन आज देशात अनेक वर्षे उपस्थित आहे. मात्र महिलांना आपले लक्ष्य हे एकजुटीने 'महिला' विषय प्राधान्याने हाच ठेवावा लागेल.

त्यामुळे प्रत्यक्ष सहभाग आणि गुणवत्तापूर्ण योगदान वाढवायचे असल्यास राजकीय पक्षांनी महिलांना अधिक संधी द्याव्यात. प्रशिक्षण, नेतृत्व शिबिरे, संवाद वाढवावा, आर्थिक मदत योजना किंवा पक्षस्तरावर 'महिला बँक' संकल्पना राबवावी, सुरक्षितता, डिजिटल कौशल्य आणि स्वावलंबनावर भर द्यावा. जागृती कार्यक्रम, नेतृत्व, कौशल्य विकास अशा अनेक कार्यक्रमांनी नेतृत्व घडवावे लागेल. स्त्रीविरुद्धची हिंसा आणि लैंगिक अत्याचारांवर पायबंद घालून सुरक्षित वातावरण निर्माण करावे लागेल. पंतप्रधान इंदिरा गांधी, परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्यासारखी अनेक रोल मॉडेल्स समोर ठेवावी लागतील. आपल्या इतिहासातील

अनेक महाराण्या, कुशल महिला प्रशासक ह्यांच्या सक्सेस स्टोरीजवर चर्चा करता येईल. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर महिला ग्रामपंचायत, जिल्हा परिषदांमध्ये मोठ्या प्रमाणात निवडून आल्या. त्यांचं कामही प्रभावी ठरलं, अनेक ठिकाणी विकासकामांना गती मिळाली हा अनुभव संसद-विधानसभांमध्येही रोल मॉडेल म्हणून दर्शवून द्यावा लागेल.

एकंदर 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हे केवळ जागा आरक्षित करणं नव्हे, आणि केवळ सामाजिक क्रांति घडविण्याचेही नव्हे तर खऱ्या अर्थाने एक मानसिक क्रांती घडवण्याच्या दृष्टीने पाऊल आहे. ते महिलांना केवळ 'प्रतिनिधी' बनवणार नाही, तर 'निर्णयकर्त्या' म्हणून उभं करणार आहे आणि पारंपरिक जेंडर रोलमध्ये बदल घडवून आणणार आहे.

**Percentage of Women & Men Elected in various Lok Sabha Elections**




Source : https://mospi.gov.in/sites/default/files/reports_and_publication/statistical_publication/Women_Men/mw24/DecisionMaking.pdf

रजिस्ट्री सं॰ डी॰ एल॰—(एन)04/0007/2003—23 REGISTERED NO. DL—(N)04/0007/2003—23

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-20092023-248832
CG-DL-E-20092023-248832

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II — खण्ड 2
PART II — Section 2
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं॰ 24] नई दिल्ली, मंगलवार, सितम्बर 19, 2023/ भाद्रपद 28, 1945 (शक)
No. 24] NEW DELHI, TUESDAY, SEPTEMBER 19, 2023/BHADRA 28, 1945 (SAKA)

इस भाग में भिन्न पृष्ठ संख्या दी जाती है जिससे कि यह अलग संकलन के रूप में रखा जा सके।
Separate paging is given to this Part in order that it may be filed as a separate compilation.

## LOK SABHA

The following Bill was introduced in Lok Sabha on 19th September, 2023:—

### Bill No. 124 of 2023

*A Bill further to amend the Constitution of India.*

Be it enacted by Parliament in the Seventy-fourth Year of the Republic of India as follows:—

**1.** (*1*) This Act may be called the Constitution (One Hundred and Twenty-eighth Amendment) Act, 2023. **Short title and commencement.**

(*2*) It shall come into force on such date as the Central Government may, by notification in the Official Gazette, appoint.

**2.** In article 239AA of the Constitution, in clause (2), after sub-clause (*b*), the following clauses shall be inserted, namely:— **Amendment of article 239AA.**

"(*ba*) Seats shall be reserved for women in the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi.

(*bb*) As nearly as may be, one-third of the seats reserved for the Scheduled Castes in the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi shall be reserved for women.

(*bc*) As nearly as may be, one-third of the total number of seats to be filled by direct election in the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi (including the number of seats reserved for women belonging to the Scheduled Castes) shall be reserved for women in such manner as Parliament may by law determine.".

Insertion of new article 330A.

3. After article 330 of the Constitution, the following article shall be inserted, namely:—

Reservation of seats for women in the House of the People.

"330A. (*1*) Seats shall be reserved for women in the House of the People.

(*2*) As nearly as may be, one-third of the total number of seats reserved under clause (2) of article 330 shall be reserved for women belonging to the Scheduled Castes or the Scheduled Tribes.

(*3*) As nearly as may be, one-third (including the number of seats reserved for women belonging to the Scheduled Castes and the Scheduled Tribes) of the total number of seats to be filled by direct election to the House of the People shall be reserved for women.".

Insertion of new article 332A.

4. After article 332 of the Constitution, the following article shall be inserted, namely:—

Reservation of seats for women in the Legislative Assemblies of the States.

"332A. (*1*) Seats shall be reserved for women in the Legislative Assembly of every State.

(*2*) As nearly as may be, one-third of the total number of seats reserved under clause (3) of article 332 shall be reserved for women belonging to the Scheduled Castes or the Scheduled Tribes.

(*3*) As nearly as may be, one-third (including the number of seats reserved for women belonging to the Scheduled Castes and Scheduled Tribes) of the total number of seats to be filled by direct election in the Legislative Assembly of every State shall be reserved for women.".

Insertion of new article 334A.

5. After article 334 of the Constitution, the following article shall be inserted, namely:—

Reservation of seats for women take effect.

"334A. (*1*) Notwithstanding anything in the foregoing provision of this Part or Part VIII, the provisions of the Constitution relating to the reservation of seats for women in the House of the People, the Legislative Assembly of a State and the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi shall come into effect after an exercise of delimitation is undertaken for this purpose after the relevant figures for the first census taken after commencement of the Constitution (One Hundred and Twenty-eighth Amendment) Act, 2023 have been published and shall cease to have effect on the expiration of a period of fifteen years from such commencement.

(*2*) Subject to the provisions of articles 239AA, 330A and 332A, seats reserved for women in the House of the People, the Legislative Assembly of a State and the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi shall continue till such date as the Parliament may by law determine.

(*3*) Rotation of seats reserved for women in the House of the People, the Legislative Assembly of a State and the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi shall take effect after each subsequent exercise of delimitation as the Parliament may by law determine.

(*4*) Nothing in this article shall affect any representation in the House of the People, the Legislative Assembly of a State or the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi until the dissolution of the then existing House of the People, Legislative Assembly of a State or the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi.".

Amendment not to affect reservation in the House of the People, the Legislative Assembly of a State or the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi.

6. The amendments made to the Constitution by the Constitution (One Hundred and Twenty-eighth Amendment) Act, 2023 shall not affect any representation in the House of the People, the Legislative Assembly of a State or the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi until the dissolution of the House of the People, the Legislative Assembly of a State or the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi, as the case may be, in existence at the commencement of the said Act.

## STATEMENT OF OBJECTS AND REASONS

After completing 75 years of Independence, the nation has begun its journey into Amritkal with a goal of becoming 'Vikasit Bharat' by 2047. Realisation of this goal will require contribution of all sections of society in the spirit of 'Sabka Saath, Sabka Vikas, Sabka Vishwas, Sabka Prayas'. The role of women, constituting a half of the population, is extremely important in realisation of this goal.

2. Government has taken a number of steps to bring 'Nari Shakti' to the forefront through women's empowerment and women led development resulting in substantial improvement in financial independence of women and availability of equal access to education and health. Government has also emphasised 'Ease of Living', especially of women, through various initiatives including Ujjawala Yojana, access to toilets under Swachh Bharat Mission, financial inclusion through the Mudra Yojna, etc. However, true empowerment of women will require greater participation of women in the decision making process as they bring different perspectives and enrich the quality of legislative debates and decision-making.

3. While women participate substantively in the Panchayat Raj institutions and municipal bodies, their representation in the State Legislatures as well as in Parliament is still limited, Providing for higher representation of women at State and National level has also been a long pending demand. There have been several efforts to introduce women's reservation in the Lok Sabha and State Legislative Assemblies. The last such attempt was made in 2010, when the Rajya Sabha had passed a Bill for women's reservation, but the same could not be passed in the Lok Sabha.

4. In order to enable greater participation of women as public representative in policy making at State and National level, it is decided to introduce a fresh legislation for Constitutional amendment to provide for, as nearly as may be, one-third of total seats in the House of the People, the legislative assembly of every State and the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi to be reserved for women.

5. The Bill seeks to achieve the above objectives.

New Delhi; ARJUN RAM MEGHWAL.

*The* 18*th September,* 2023.

## FINANCIAL MEMORANDUM

The Bill, if enacted, is not likely to involve any expenditure, either recurring or non-recurring, from and out of the Consolidated Fund of India.

---

UTPAL KUMAR SINGH
*Secretary-General.*

UPLOADED BY THE MANAGER, GOVERNMENT OF INDIA PRESS, MINTO ROAD, NEW DELHI–110002
AND PUBLISHED BY THE CONTROLLER OF PUBLICATIONS, DELHI–110054.

Kshitiz Mohan

MGIPMRND—344GI(S3)—19-9-2023.

# आणखी किती-सरपंचपती?

**भीम रासकर**

संचालक,

रिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट

ईमेल : bhim.rscdgmail.com



आपल्या भारताच्या – पॉवर टू पिपल, अर्थात् स्वराज्य संकल्पनेला सत्तावीस वर्ष पूर्ण झाली आहेत! १९९३ च्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महाराष्ट्रात ५० टक्के आरक्षणाधारित, दीड लाख महिला लोकप्रतिनिधी दर पाच वर्षांनी निवडून येतात.

सरपंचपती हा राष्ट्रीय प्रश्न म्हणून गावा–गावात चर्चेला आला आहे. राजकारणातील निरिक्षणांतून हे अंतरंग मांडणारा हा लेख आहे.

सायगाटा अधिवेशनात स्थापना झालेल्या महिला राजसत्ता आंदोलनाने निवडक कारभारणींसाठी अनुभवलेखन कार्यशाळा घेतल्या.

'सत्ता चक्रव्यूह' भेदतांना आलेल्या त्यांच्या अस्सल अनुभवांचा एक पट येथे उलगडला आहे! महिला आरक्षणाच्या सत्ताविशीनंतर पुरुषी वर्चस्वातून म्हणजेच बाह्यसत्तेतून 'प्रजासत्ता व लोकशाही' मुक्त करण्यात कारभारणी कशा हळूहळू यशस्वी होत आहेत, तेही समजून घेऊ या–

''आरक्षणानं आम्ही सत्तेत आलो हे खरं, परंतु आमची द्रौपदी होत चाललीय. पक्ष पुढारी, ग्रामसेवक, पॅनल प्रमुख, जातीचा नेता व खरा घरचा धनी हे सगळेच आमच्यावर सत्ता गाजवतात''! कधीतरी आशेचा किरण म्हणून एखादा जोतिबाही नक्की दिसतो.

राजकारणातील कारभारणींचे पतीराज व परिवार जर समजून घेणारे असतील तर त्या महिलेला राजकीय प्रगती करण्यासाठी त्यांची सहज मदत होते, तसेच त्यामुळे सामाजिक व राजकीय विकासातील तिचे योगदानही वाढते. काही महिलांसाठी ही आदर्श परिस्थिती अस्तित्वात असली तरी बहुतांशी महिलांच्या संघर्षाची सुरूवात ही त्यांच्या परिवारसत्तेपासून होते. ज्यात भावनिक व शारिरिक दबावाबरोबरच राजकारणातील तिच्या अस्वीकाराची सुरुवात होते. पतीराज व परिवार हे कारभारणींच्या हालचालींवर सतत बंधने घालतात व तिच्यावतीने निर्णय घेतात. आर्थिक व्यवहारातही अविश्वास दाखविला जातो. शिवाय फोनमधील तपासणीत पंचायत सहकाऱ्यांचे फोन नंबर पाहून कारभारणींच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित केला जातो. महिलांना ग्रामपंचायतीमधील बैठकांना उपस्थित राहण्यासाठी आताही परवानगी काढावी लागते. काही

महिलांना निर्णय घेण्याचा आजही अधिकार नाही आणि एखादा निर्णय घ्यायचाच असेल तर तो निर्णय पतीशी सल्ला मसलत करूनच घ्यावा लागतो. एखाद्या महिलेला जर काही कामानिमित्ताने घराबाहेर जायचं असेल तर घरातील सर्व कामे करून जाणं, बंधनकारक असतं. राजकारणातील महिलांच्या सहभागाचा स्वीकार निवडणूकीनंतर लगेच पतीराजांकडून केला जात नाही, उलट राजकारण हे वेळखाऊ काम असल्याचं वेळोवेळी त्यांना सांगण्यात येतं हे असं असूनही महिलांनी राजकारणात आपला वेगळा ठसा नक्की उमटविला आहे!

आपल्या पतीशी व परिवाराशी पंचायतीत वागताना त्यांनी वेगवेगळ्या डावपेचांचा अवलंब केला उदा. घरातील व शेतीची सर्व कामे करणे, कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या गरजा व मागण्या पूर्ण करण्यासाठी स्वावलंबी बनविणे, पतीसोबतच सार्वजनिक स्थळी नम्र बोलणे, राजकीय काम हे वेळखाऊ नाही, हे त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे इत्यादी! जोडीदाराच्या दृष्टिकोनात बदल व्हावा यासाठी महिलांनी त्यांची समज वाढविण्यासाठी त्यांच्यासोबत लोकशाही मूल्य आणि समानता या विषयावरील चर्चा वाढविली. महिलांना प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून सामाजिक परिस्थिती समजते आणि समाजाचा पाठिंबा मिळविण्यासाठी सर्व परिवार सदस्यांची मानवी हक्कासंदर्भातील जाणिव वाढविणे गरजेचे असते. काही वेळा जोडीदारासोबत असणाऱ्या काही मतभेदांसाठी त्याला विरोध करण्याने काही साध्य होत नाही. त्यामुळे आपल्या जोडीदारासोबतचे काही मतभेद स्वीकारणे आणि वेळ आलीच तर त्यांच्या पाठिंब्याशिवाय पुढे जाणे योग्य ठरते. काही महिलांनी पतीकडून पाठिंबा मिळविण्यासाठी प्रसार मध्यमातील मुलाखतींमधून होणाऱ्या प्रसिध्दीचा चांगला वापर केला. महिलांना राजकारणामधून नाऊमेद करण्यासाठी त्यांच्या चारित्र्यावर प्रश्न निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. त्यांचा विरोध मोडण्यासाठी या पतींना विविध कार्यक्रम व प्रशिक्षणात सहभागी करून घेणे तसेच महिला राजसत्ता आंदोलनाच्या कामाची व कार्यकर्त्यांची ओळख करून देणे अशा स्वरूपाचे प्रयत्नही केले जातात. हा जोतिबा संवाद खूप उपयोगी ठरतो.

घरगुती हिंसाचार हा महिलांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. अशाच एका घटनेमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या एका सदस्येवर तिच्या नवऱ्याने शारीरिक अत्याचार केले. त्याच गावातील महिलांच्या गटाने अत्याचारी व हिंसक नवऱ्याला सामूहिकरित्या जाब विचारला. महिला प्रतिनिधीच्या कुटुंबात असा काही संघर्ष उद्भवला तर तो सोडविण्याचा प्रयत्न केला जातो, ज्यातून त्या कुटुंबाचा हळूहळू पाठिंबा त्यांना मिळतो व इतर निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनाही काम करण्याचे स्वातंत्र्य मिळतं. काही महिला प्रतिनिधींना काम करण्याचं स्वातंत्र्य मिळालं की मग, मलाही काम करण्याची मुभा का मिळू नये असा प्रश्न विचारून नवऱ्याची समजूतही काढली जाते. महिला राजकीय कामांमध्ये आपल्या पतीची मदत मागतात आणि जर पती पाठिंबा देणार नसेल तर त्याला समजविण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळा काम पूर्ण करण्यासाठी महिलांना आपल्या पतीशी खोटे बोलावे लागते. महिलांनी आपल्या पतीसोबत जुळवून घेण्याचे बरेच प्रयत्न केले मात्र प्रत्येक वेळी त्यात त्यांना यश आलेच असे नाही. अशावेळी संघटनेतील अनुभवी तज्ज्ञांची त्या मदत घेतात.

कौटुंबिक दबावामुळे महिलांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. बाईला काळजीवाहू भूमिका बजावणे, नात्यांची जपणूक करणे, घरातील तसेच शेतीची कामे बघणे ही कामे आहेतच. आरक्षणाने जरी महिलांना संधी उपलब्ध करून दिली असली तरी त्यांनी दैनंदिन राजकारणात सहभागी होऊ नये यासाठी त्यांच्या कुटुंबाकडून होणारा दबाव महिलांना सहन करावा लागतो. काही महिला त्यांच्यात राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी असल्यामुळे कुटुंबातच राजकारण  शिकतात. जातीव्यवस्था आणि समाजातून वगळणे असे  प्रकार अजूनही गावात अस्तित्वात आहेत. त्यामुळे गरीब आणि अनुसूचित जातीच्या महिलांना त्यांच्या कुटुंबाकडून विरोध सहन करावा लागतो. जरी महिलांनी आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण करून इतरांसाठी काम केलं तरी त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाकडून त्यांना पाठींबा आणि कौतुक सहसा मिळत नाही.

महिलांना आपल्या कुटुंबासोबत वागताना नेहमी नम्र व चतुरपणे वागावे लागते. कुटुंबाचे वेगवेगळे पैलू हाताळतांना महिलांनी विविध सोप्या अस्त्रांचा वापर केला, उदा. वेळेचे नियोजन, निर्णय प्रक्रियेत कुटुंबाचा सहभाग वाढविणे आणि आपल्या कामासंबंधीच्या संवादात स्पष्टता आणणे इत्यादी. काही घटनांमध्ये तणाव टाळण्यासाठी महिलांनी सहनशील राहाणेच पसंत केले. जर संघर्ष झालाच तर विरेचनाच्या पद्धतीप्रमाणे रडून आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली. ग्रामपंचायतीमध्ये काम करण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी महिलांनी कुटुंबातील मंडळींमध्ये कामाची विभागणी करून दिली तसेच काही जबाबदाऱ्या त्यांनी स्वतःहून घ्याव्यात यासाठी विचारणा केली. कुटुंबातील व्यक्तींकडून पाठिंबा आणि विश्वास मिळविण्यासाठी महिलांनी त्यांना विविध कार्यक्रमांमध्ये आणि निर्णयांमध्ये सहभागी करून घेतले. तसेच शक्य असेल तिथे आपल्या सोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ओळख करून दिली.

नवयुगातल्या या पारंपरिक जगात सासू आणि सून यांच्यातील संबंध हा वादाचा मुद्दा राहिला असला तरी, हा वाद टाळण्यासाठी महिलांनी सासूबरोबर बळकट संबंध निर्माण करून सासू सुनेचे नाते अधिक विश्वसनीय आणि आधार देणारे बनविले आहे. याचा फायदा महिलांना त्यांच्या कामातील सहभाग वाढविण्यासाठी झाला. आरक्षणामुळे महिलांना राजकीय कामात येण्याची संधी मिळाली आणि कुटुंबाला सोबत घेऊन केलेल्या नियोजनामुळे पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली. शेती हा अर्थव्यवस्थेचा भाग असल्यामुळे गावातील बहुतेक महिलांना शेती व मशागतीच्या कामांमध्ये सहभागी व्हावे लागते. शेतीमध्ये असणाऱ्या कामाच्या प्रचंड ताणामुळे महिलांना राजकीय कामात सहभागी होता येत नाही. त्यावर उपाय म्हणून शक्य असल्यास मनुष्यबळ बाहेरून घेऊन शेतीपासून उत्पन्न मिळवणे; जे त्यांच्यासाठी उपजिविकेचे एकमेव साधन आहे. हे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी विकसित व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला आहे. काही महिलांनी आठवड्यातील एक दिवस ग्रामपंचायतीच्या कामासाठी राखून ठेवला आहे. जेणे करून शेती आणि ग्रामपंचायत या दोघांवरही कामाचा परिणाम होणार नाही. तसेच काही महिला सामाजिक संस्थांत काम करून किंवा शिलाई काम करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असतात. स्वयंसहाय्यता गटात महिलांनी दैनंदिन खर्चाचा हिशोब ठेवल्यामुळे त्यांना आर्थिक बाबी कशा हाताळायच्या, हे शिकता आले; शिवाय त्यांना अनावश्यक व टाळता येण्याजोग्या खर्चाची माहिती ही मिळाली. कोणत्याही मालमत्तेचा

पाहिला हक्क हा नेहमी पुरूषांचा असतो मात्र काही महिलांनी मालमत्ता मालकी हक्कासाठी आपल्या कुटुंबासोबत संघर्षही केला.

कारभारणींनी सरकारी योजनांच्या योग्य अंमलबजावणीतून गावाचा विकास करून आपले नेतृत्व सिध्द केले आहे. गावातील विविध मुद्दे आणि समस्यांवरती काम करीत असतांना वर्षानुवर्ष सत्ता भोगणाऱ्या उच्चजातीय व उच्चवर्गीय समजल्या जाणाऱ्या, तसेच गावातील संसाधनांवर अधिकार गाजविणाऱ्या सत्ताधारी वर्गाकडून खूप विरोध सहन करावा लागला. अशा सत्ताधाऱ्यांना गावकऱ्यांकडून कधीही विरोध झाला नव्हता. त्यांना कोणत्याही पातळीवर कुणीही आव्हान केलं नव्हतं. मात्र आरक्षणामुळे महिला सत्तेत आल्या, आणि ही परिस्थिती बदलायला लागली. विरोधकांसाठी महिलांच्या नेतृत्वाचा नुसता विचारही करणं आणि ते स्वीकारणं खूप अवघड होतं. त्यामुळे त्यांनी साहजिकच महिलांच्या कामात अडथळे आणायला सुरूवात केली.

महिला आणि तिच्या घरातील मंडळींना असभ्य भाषा वापरून, मुद्दाम ग्रामसभेमध्ये आणण्याची रणनिती विरोधकांकडून नेहमी वापरली गेली. महिलांनी गावात काही भरीव कामे करून विरोधकांना एक प्रकारे आव्हानच दिलं. त्यामुळे विरोधकांच्या मनात भीती निर्माण झाली. निवडणूकी दरम्यान विरोधकांनी पैसे व दारूची लालूच दाखवून मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला. महिला लोकप्रतिनिधी बनल्या तरी विरोधकांच्या म्हणण्यानुसार ज्यांना काम करावे लागले त्या त्यांच्या हातातील बळीचा बकरा बनल्या. विरोधकांनी महिलांवर कलम १४ जी (१४ ग) च्या अंतर्गत भ्रष्टाचारासारख्या केसेस दाखल करून त्यांना नाउमेद करण्याचाही प्रयत्न केला.

दुसऱ्या बाजूला, निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना गावाच्या विकासाच्या संदर्भात होणाऱ्या निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविण्याची आवश्यकता वाटत होती. मात्र विरोधकांनी गाव समित्यांमधील महिलांच्या ५० टक्के आरक्षणाला विरोध केला. महिलांच्या या बौद्धिक बदलाला नियंत्रित करण्यासाठी विरोधकांनी त्यांच्यावर अविश्वासाचे ठराव आणले. त्यांनी महिलांच्या निर्णयाला विरोध केला, तसेच ग्रामसभेचे काही महत्त्वाचे आणि सुनियोजित कार्यक्रमही रद्द केले. त्यांनी ग्रामसभेत होणाऱ्या निर्णयांची तसेच आर्थिक बाबींची माहिती महिलांना दिली नाही अडथळ्यात भर म्हणून की काय, महिलांनी निवडणूका लढवू नये यासाठी दबावतंत्र आणि हिंसाचाराला साथ द्यावी यासाठी त्यांनी महिलांना लाचही देऊ केली,त्याचा काही उपयोग होत नाही हे लक्षात येताच महिलांच्या चारित्र्यहननाच्या माध्यमातून राजकारणापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्यावर जबरदस्तीही केली.

विरोधकांसाठी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधीकडे, एकच उत्तर होतं आणि ते म्हणजे ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या संमतीने सरकारी योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करून गावाचा विकास करणे. कोणत्याही विकासात्मक कामाची रूपरेषा ठरविताना लिंगभाव व संवेदनाशिलता हा निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचा महत्त्वाचा विषय राहिलेला आहे. गावातील विकासात्मक कामासंदर्भातील निर्णय प्रक्रियेत महिलांची भागीदारी टिकविण्यासाठी त्यांनी महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढविली. त्यामुळे विरोधकांचा विरोध कमी व्हायला मदत झाली. ज्या ठिकाणी विरोधक ग्रामपंचायतसंदर्भातील काही आर्थिक आणि इतर बाबींची माहिती

सांगायला कां कू करत होते, तीच माहिती सरकारी कार्यालये आणि माहितीचा अधिकार कायदा २००५ यांच्या माध्यमातून गोळा केली. गावसमितीतील सदस्य निवडीचा निर्णय ग्रामसभेतून घेतला गेल्यामुळे महिलांना ग्रामसभेचा पाठिंबा मिळाला. निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी गाव समित्यांमधील महिलांच्या ५० टक्के जागांसाठी संघर्ष केला.

विरोधकांनी वापरलेल्या विविध क्लृप्त्या आणि डावपेच शिकून घेऊन व त्याचा अवलंब करून त्यांना त्यांच्याच भाषेत कारभारणींनी उत्तरं दिली. काहींनी पुढाकार घेऊन विरोधकांशी संवाद सुरू केला आणि गावाच्या संपूर्ण विकासासाठी सहाय्य करण्याचे आवाहन केले. काहीजणींनी गावाच्या विकासाच्या मुद्यांसंदर्भात महिलांमध्ये जागृती केली, विकास कामांवर लक्ष केंद्रीत केले, महिलांचा पाठिंबा टिकवून ठेवला आणि विरोधकांकडे दुर्लक्ष केले. विरोधकांच्या विरोधाची तीव्रता कमी व्हावी यासाठी त्यांनी विरोधकांच्या घरातील मंडळीसोबत चांगले संबंध प्रस्थापित केले. महिलांचे नेतृत्व मान्य व्हावे यासाठी समान मुद्दे उपस्थित करणे, विरोधकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे प्रश्न सोडविणे या नेहमी कामी येणाऱ्या साध्या डावपेचांचा वापर केल. गावातील मुद्यांसंदर्भात विरोधकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी महिलांनी स्वत: पूर्ण केलेल्या कामाचे श्रेय विरोधकांना दिले. विविध सरकारी अध्यादेशांचा अभ्यास सुरू केला. शिवाय या अध्यादेशांच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये जाणिवजागृती करण्याचे कामही सुरू केले.

यासोबतच राजकारणातही जातीची भूमिका महत्त्वाची आहे. जाती आधारावर भेदभाव ही सगळीकडे आढळणारी अद्भूत गोष्ट आहे. भारतीय राजकारणात महिलांना मर्यादित प्रवेश आहे आणि जर ती महिला अनुसूचित जातीतील असेल तर तिला विविध प्रकारच्या जातीय भेदभावांना सामोरे जावे लागते ते मुख्यत: दोन कारणांसाठी एक म्हणजे ती महिला राजकारणात जाण्याचा विचार करते, त्याच क्षणी तिच्या संघर्षाला सुरूवात होते. महिलांना निवडणुकीसाठी अर्ज भरताना व निवडणूक प्रचारापासूनच विविध समस्यांचा सामना करावा लगतो. निवडणूक जिकल्यानंतरही उच्च जातीतील काही लोकांकडून होणाऱ्या असहयोगामुळे त्यांचा संघर्ष सुरूच रहातो. निवडणुकी दरम्यान उच्च जातीय समजल्या जाणाऱ्या लोकांकडून असा प्रचार केला जातो की खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील महिला उपजिविका आणि ग्रामपंचायतीमधील काम याचा समतोल राखू शकत नाही. वरच्या जातीतील महिलांनी जर खालच्या समजल्या जाणाऱ्या लोकांना सहाय्य केले अथवा त्यांच्यासाठी काम केले तर त्यांना त्यांच्याच जातीतील लोकांकडून विरोध केला जातो. सुशिक्षित लोकही दलित महिलांसमवेत असहकार्याची भूमिका घेतात ही खेदाची गोष्ट आहे. राजकारणात गावाच्या विकासापेक्षा जात हा महत्त्वपूर्ण घटक असतो.

गावातील जातीभेद कमी करण्यासाठी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी विविध डावपेचांचा वापर केला. उदा. उच्च समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांसमवेत संवाद साधणे, जाती निहाय स्वयंसहायता गटाची बांधणी करून त्यांच्याशी नातेसंबंध टिकविणे आणि गावाच्या विकासासाठी गावातच आधार तयार केला. काही प्रतिनिधींनी जाती– आधारित भेदभावांकडे दुर्लक्ष केले. त्यांचा विश्वास आहे की समाज हळूहळू बदलेल. विधवा महिलांचा समाजातील सन्मान व सामाजिक स्थान हे अत्यंत निराशाजनक आहे. सामाजिक

संकेतांनी नेहमीच विधवा महिलांच्या कौटुंबिक तसेच सार्वजनिक कार्यातील सहभागाला अटकाव केला आहे. मात्र महिलांनी धार्मिक आणि समाजिक कार्यक्रमांमध्ये भगिनींना शैक्षणिक भेटवस्तू देऊन परिस्थिती थोडी बदलली आहे.

गावाच्या विकासासाठी महिला लोकशाही मार्गाने निवडून आल्या. विविध योजना मांडून कारभारणी त्या मंजूर करून घेतात. मात्र त्यांच्या अंमलबजावणीचं काम सरकारी अधिकारी करतात. सरकारी अधिकाऱ्यांना अंमलबजावणीसाठीची योजना व तिच्यावर होणारा खर्च ठरविण्याचा अधिकार असतो. सरकारी कर्मचारी हे विविध संघटनांच्या माध्यमातून संघटित होतात. त्यांना लोकाभिमुख करणे हेच एक आव्हान असते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामध्ये ग्रामसभेला गावाच्या विकासाचे निर्णय घेण्याचे अधिकार असतात. ग्रामसभेत घेतलेले निर्णय अंमलात आणणे हे सरकारी कर्मचारी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या हातात असते. ते दोघेही एकमेकांवर अवलंबून असतात, खेड्याच्या विकासासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करतांना अधिकारी हे त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण न करण्याबाबत माहिती लपविण्यासाठी आणि निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींबरोबरच्या असहाकार्याबाबत प्रसिध्द आहेत.

काही ग्रामसेवक प्रभावी महिला प्रतिनिधींचे काम दुर्लक्षित करतात. शिवाय ते महिलांच्या बाबतीत असंवेदनशील असतात. या महिलांना आर्थिक बाबतीतील माहिती घेतांना संघर्ष करावा लागला. काही वेळा, स्वत:चा भ्रष्टाचार लपविण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी महिलांना लाचेचे आमिष दाखविलं. समाजाचा विकास साधण्यासाठी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा पाठिंबा असणे आवश्यक असते. जनतेचा त्यांच्या अधिकारांवर हक्क सांगून आणि हे काम करणे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे याची त्यांना आठवण करून देऊन गावाचे काम साध्य करता येऊ शकते. माहिला प्रतिनिधींनी सरकारी अध्यादेशांचा अभ्यास करून योजनांच्या अंमलबजावणीसाठी चांगला दबाव निर्माण केला. सरकारी सेवकांनी ग्राममपंचायतीच्या कार्यपध्दतीतील माहिती लपविण्याचा प्रयत्न केला, पण महिलांनी माहितीचा अधिकार वापरून ही माहिती मिळविली व महिलांनी सरकारी योजनांच्या बाबतीत ग्रामस्थांची मते आजमावून घेतली आणि ग्रामस्थांच्या परवानगीने त्यांची अंमलबजावणी केली. या योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामस्थांच्या गावसमित्यांचीही स्थापना केली.

सरकारी अधिकाऱ्यांना गावाच्या विकासात काही ठिकाणी लोकसहभाग नको होता आणि म्हणूनच त्यांनी ग्रामसभा बोलविण्यात टाळाटाळ केली. महिला प्रतिनिधींनी इतर सदस्यांमध्ये जागरूकता वाढवून ग्रामसभा घेण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणला. कारभारणींनी गावासाठी मंजूर झालेल्या आर्थिक तरतुदीची माहिती गावकऱ्यांना देण्याची पारदर्शकता दाखविली. तसेच ग्रामस्थांना योजना अंमलबजावणीच्या परिणामांवर लक्ष ठेवण्याचे आवाहनही केले. किचकट सरकारी पध्दती बदलण्यासाठी, ती लोकाभिमुख करण्यासाठी, तसेच शाळेच्या सुधारणांसाठी सह्यांची मोहिम राबविली. महिला राजसत्ता आंदोलनाने महाराष्ट्रात प्रशासनाच्या क्षेत्रात आपल्या मौल्यवान आणि स्तुत्य कामगिरीने स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. या स्थानाचा उपयोग महिला लोकशाहीबरोबर काम करतांना निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या भूमिकेला न्याय देण्यासाठी नेहमी प्रयत्नपूर्वक करतात.

ग्रामपंचायत निवडणुकांत राजकीय पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग जरी दिसत नसला तरी अप्रत्यक्षपणे हे पक्ष मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. राजकीय पक्ष आपल्या गटांमार्फत निवडणूक लढवितात व अशा गटांमार्फत उमेदवारी मिळविणे महिलांना अतिशय कठीण जाते. राजकीय पक्षात आपले स्थान निर्माण करणे हाच महिलांसाठी मोठा संघर्ष असतो. शिवाय राजकीय पक्ष, फक्त निवडणुकीच्या काळातच संपर्क करतात. कार्यशील महिलांना फक्त राजकीय पक्षांकडूनच नव्हे तर पक्षातील कार्यकर्त्यांकडूनही निवडणूक लढविण्यासाठी विरोध होतो. राजकीय पक्षांची, समाजातील प्रतिमा गोंधळाची असल्यामुळे महिलांसाठी राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणे कठीण असते. काही वेळा महिला, पक्षाची सभासद असली तरी वैयक्तिक मूल्ये आणि पक्षांची मूल्ये समान नसतात. जिथे निवडणुकीसाठी आणि ग्रामपंचायतस्तरावर पक्षांचा पाठिंबा मिळत नाही, तिथं निवडणूकीच्या माध्यमातून एखाद्या पक्षासोबत काम करण्याची महिलेची इच्छाही स्वीकारली जात नाही. त्यामुळेच राजकीय पक्षात स्वत:साठी, कायम स्वरूपी आणि टिकावू पर्याय निर्माण करणे महिलांसाठी कठीण काम बनलं आहे.

काही ठिकाणी, राजकीय पक्षांकडून उमेदवारी न मिळाल्याने महिलांनी स्वतंत्रपणे अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. महिलांना हा विश्वास होता की कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांना राजकीय पक्षात स्थान मिळेल. पक्षांची विचारसरणी समजून घेण्यासाठी महिलांनी पक्ष कार्यकर्तें आणि राजकीय अभ्यासकांशी संवाद साधला. विविध पक्षातील महिलांनी राजकीय समन्वयाच्या बांधणीसाठी समान मुद्यांच्या सोडवणूकीत एकमेकींना मदत केली. राजकारणाच्या पंचायतीत – पती, परिवार, विरोधक, अधिकारी व पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधतांना त्यांचे वादात रूपांतर होऊ नये, तो सुसंवाद व्हावा असा कारभारणी नेहमी प्रयत्न करतात.

परंतु, असभ्यता ओलांडली गेल्यास; त्या साम– दाम– दंड भेद याहून वेगळ्या रणनीतिही शोधतात हेच खरं! या महिलांनी सत्ता मंडळांना भेदायला आत्ता सुरूवात नक्की केली आहे!

## ● महिला भेदीले सत्तामंडळा, जिंकेल का ती नव्या आव्हानां?

हे आपण सारे त्यांची कशी साथ करणार या आधारेच ठरणार आहे! आपणच ठरवायचंय् या दीड लाख गावकारभारणींना पंचायतीच्या राजकारणात कसा सन्मान मिळवून द्यायचा ते? राजकारणाचा पोत बदलायचा... तर हे आव्हान आपण नक्की स्वीकारु या!

## ● आकडे बोलतात हो

१. **उच्चांक :** आज भारतात सुमारे ३१ लाख **स्थानिक स्वराज्य** संस्था प्रतिनिधी निवडून येतात. त्यापैकी **१४.५ लाख** या **महिला लोकप्रतिनिधी** आहेत. हा जागतिक उच्चांक आहे.

२. **मान्यता :** आज आपल्या **२० राज्यांनी** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, महिलांसाठी ५०%आरक्षण संवैधानिकरित्या मान्य केलं आहे.

३. **जास्त :** सर्वात जास्त महिला लोकप्रतिनिधींचं प्रमाण हे **उत्तराखंड** राज्यात ५६.०१% आहे.

४. **कमी :** आज सर्वात कमी महिला लोकप्रतिनिधी प्रमाण हे उत्तर प्रदेश राज्यात आहे, जे केवळ **३३.३४%** आहे.

५. **महाराष्ट्र :** महाराष्ट्रातील महिला लोकप्रतिनिधींचे हे प्रमाण आत्ता ५३.४७% झाले आहे.

६. **प्रमाण :** मात्र वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२५ अहवालावरून भारत देश हा १४८ देशांच्या यादीत लिंग गुणोत्तर प्रमाणात **१३१** क्रमांकावर जरा **घसरला** आहे.

७. **आव्हान:** या अहवालानुसार, आता आव्हान हे आहे की संसदेतील महिलांचे प्रमाणही **१४.७%** हून **१३.८%** वर घसरले आहे.

८. **घसरण:** तसेच, संसदेतील मंत्रीपदामध्येही महिलांचा वाटा **६.५%**हून **५.६%** पर्यंत घसरला आहे.

९. **मापदंड:** मात्र आत्ता महिलांचे त्या देशातील राजकीय सशक्तीकरण हा निकष वैश्विक मापदंडातही महत्त्वाचा घटक मानला जाऊ लागला आहे.

१०. **कसरत:** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सांख्यिकी उच्चांक व संसदेतील महिलांचा घसरता अंक – हे आज आपणासमोर मोठं आव्हान आहे. महिलांच्या राजकीय सहभागाला राजमान्यता मिळाली तरी समाजमान्यता मिळण्यासाठी आपणाला खूप मोठी कसरत करावी लागणार आहे.

- **स्रोत :** Articles of ORF- Observer Research Foundation.
- **राजकीय पार्श्वभूमी नसलेल्यांना फारसं यश मिळालं नाही.**
- चूल– मूल– शेती या टप्प्याकडून राजसत्ता व पांच वर्षांनी पुन्हा चूल मूल शेती–....असा यु– टर्न प्रभावी व सच्च्या महिलांचाही मोठ्या प्रमाणात होत आहे.
- आरक्षणानं राजमान्यता तर मिळाली परंतु समाजमान्यता अजुनही खूपच अपुरी आहे!
- **आज या कारभारणींनी कमाईही खूप केली आहे –**
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रश्नांचा क्रम बदलला आहे.
- सत्ता केंद्रातलं वातावरणही लोक केंद्री बनत आहे.
- सत्तेच्या अजेंड्यावर शेवटचा माणूस प्रथम असावा– याची सुरुवात झाली आहे.
- येथे सत्तेतील महिलांचं वय कमी होत चाललंय– युवती आनंदानं येत आहेत तसेच या युवतींचं शिक्षण व समज खूप वाढत चालली आहे.
- असोसिएशन म्हणून त्या संघटीतही होत आहेत व यशदाच्या प्रभावी प्रशिक्षकही बनत आहेत.

# महिला मतदानाचे वाढते प्रमाण, महिलांच्या नेतृत्वात विकासाची पहाट!



**विजया रहाटकर**

अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणांमधून गेल्या पाच – सात वर्षांमध्ये एक महत्त्वपूर्ण बदल समोर आलाय तो म्हणजे, मोदीजी म्हणतात, Not only women development, but women lead development!! हे एकच वाक्य भारतातल्या फार मोठ्या बदलाचे मर्मसूचक वक्तव्य आहे. पंतप्रधान मोदींच्या मुखातून हे वाक्य सहज बाहेर पडलेले नाही. त्यामागे भारतीय नारीशक्तीचा वाढता अविष्कार परिष्कृत होतो आहे. भारतीय नारीशक्ती नेहमीच silent, पण firm and consolidated राहिली. ज्यावेळी देशाला गरज लागली त्यावेळी नारीशक्तीने सर्व बाजूंनी तिचा अविष्कार प्रकट केला. भारतीय राजकारण देखील महिला शक्तीच्या सर्वगामी स्पर्शापासून अलिप्त राहू शकले नाही. अगदी ज्यावेळी सर्वांना मताधिकार मिळाल्यानंतर पहिल्या निवडणुकीपासून ते २०२४ च्या निवडणुकीपर्यंत. भारतीय नारीशक्तीचा देशाचा कारभारी निवडण्यात नेहमीच अग्रभाग राहिल्याचे आकडेवारी आणि अनुभव सांगतात.

अर्थात सुरुवातीच्या तीन निवडणुकांमध्ये महिला शक्तीचा अविष्कार मर्यादित राहिला. कारण एकूणच भारतीय समाज व्यवस्थेतील बंधने त्यावेळी अधिक जखडणारी होती, पण तरी देखील विशिष्ट मर्यादित महिलांनी आपला अधिकार बजावल्याचेच आकडेवारी सांगते. उदाहरणच द्यायचे झाले, तर १९६२ च्या लोकसभा निवडणुकीत पुरुष मतदानाचे प्रमाण होते ६३ %, तर महिला मतदानाचे प्रमाण होते, फक्त ४७%. पण त्यानंतर प्रत्येक निवडणुकांमध्ये महिला मतदानाचे प्रमाण वाढते राहिल्याचे आकडेवारीतून दिसते. १९९८ मध्ये ५७.७ % महिलांनी मतदान केले, पण त्यानंतरच्या दोन निवडणुकांमध्ये ते प्रमाण काहीसे घटले, पण १४ ते २४ या ३ निवडणुकांमध्ये मात्र महिलांच्या मतदानाचे प्रमाण ६५ % पेक्षा अधिक राहिले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तर भारतातल्या ३६ राज्यांपैकी १९ राज्यांमध्ये पुरुष मतदानाच्या टक्केवारीवर महिला मतदानाच्या टक्केवारीने मात केली. या निवडणुकीत महिला मतदानाची नोंद ६५.८ % राहिली, तर पुरुष मतदानाची नोंद ६५.६% राहिली.

निर्णय प्रक्रियेत वाढता सहभाग भारताच्या विविध निर्णय प्रक्रियांमध्ये महिलांचा वाढता सहभाग यातून समोर आला.१९९० च्या दशकात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला आरक्षण लागू झाल्यानंतर महिलांच्या नेतृत्वाखाली गाव आणि नगरांचा विकास सुरू झाला. पण त्याची सुरुवात घराणेशाहीच्या महिलांचे नेतृत्व पुढे येण्यात झाली. कालांतराने त्यात थोडा बदल झाला, पण गावे अथवा नगरांचा विकास

हा खऱ्या अर्थाने women led development असा झाला, असे अजूनही मानता येण्यासारखी स्थिती नाही. त्यामध्ये सुधारणेला बराच वाव आहे. राज्य आणि देशपातळीवर काही वर्षांपूर्वी पर्यंत महिलांना मिळणारी मंत्रिमंडळातली खाती महिला बालकल्याण, समाज कल्याण, नागरी पुरवठा अशीच असायची, तोच महिलांचा राजकारणातला संपूर्ण सहभाग मानला जायचा, पण मोदींच्या नेतृत्वाखाली देशाला महिला परराष्ट्र मंत्री, संरक्षण मंत्री आणि महिला अर्थमंत्री मिळाल्या, ज्या घराणेशाहीच्या वारशातून आल्या नव्हत्या आणि नाहीत. पण त्याही पलीकडे जाऊन महिलांचा एकूणच दैनंदिन निर्णय प्रक्रियेतला सहभाग वाढला हा महत्त्वाचा घटक इथे नोंदविला पाहिजे.

एका पुरुषाने आर्थिक कमाई करून घर पोसणे आणि एका महिलेने आर्थिक कमाई करून घर पोसणे यातला मूलभूत फरक सरकारने ओळखला. म्हणून महिलांच्या स्वतंत्र सक्षमीकरणाच्या योजना सरकारने प्रभावीपणे अंमलात आणल्या. महिलांच्या स्वयं सहाय्यता गटांना स्वतंत्रपणे आर्थिक तरतूद करून मदत केली. उज्ज्वला योजना, हर घर शौचालय मधून महिला सन्मानाबरोबरच महिला सुरक्षितता सुनिश्चित केली. ट्रिपल तलाक सारखी महिला स्वातंत्र्याच्या आड येणारी प्रथा कायदा करून बंद केली. महिला सक्षमीकरणाच्या या cosmetic उपाययोजना नव्हत्या, तर खऱ्या अर्थाने महिलांना सामाजिक बंधनातून मुक्त करणाऱ्या योजना सरकारने राबविल्या.

धर्मबंधनांच्या पलीकडची विचारक्षमता याचा परिणाम अर्थातच मतदानावर स्वतंत्रपणे दिसणे स्वाभाविक होते, तसा तो दिसला. पण महिला केवळ लाभार्थी योजनांच्या लाभ घेऊन मतदान करतात, असा समज तयार झाला, जो काही अंशी खरा मानला तरी तो सर्वस्वी खरा मानता येणार नाही. कारण महिला सक्षमीकरणातून महिलांची स्वतंत्र विचार प्रक्रिया देखील विकसित झाली. तिच्यावर वेगवेगळ्या घटकांचे परिणाम झाले, हे लक्षात घेतले पाहिजे. ट्रिपल तलाक विरोधी कायद्याला महिला वर्गाने दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे त्याचे उदाहरण ठरले. विशिष्ट धर्मबंधांच्या आधारे महिलांना तुम्ही जखडून ठेवू शकत नाही. भारत संविधानाप्रमाणे चालणारा देश आहे इथे संविधान चालेल हे ट्रिपल तलाक विरोधी कायद्यातून सरकारने दाखवून दिले आणि त्या कायद्याला पाठिंबा देऊन महिलांनी आपल्या विचारक्षमतेची जाणीव संपूर्ण देशाला करून दिली.

३३% आरक्षणाची नवी पहाट महिला सक्षमीकरण आणि महिलांच्या वाढत्या विचारक्षमतेचे पडसाद सरकारच्या राष्ट्रीय पातळीवरच्या निर्णय प्रक्रिया धोरणांमध्ये देखील उमटले. सरकारने लोकसभा आणि विधानसभा यांच्यात ३३ % महिला आरक्षणाचा कायदा संमत करून घेतला. महिला केवळ गावातल्या किंवा तालुक्यापुरत्या किंवा अगदी मोठ्या शहरांमधल्या कारभारी राहता कामा नयेत, तर त्यापलीकडे संपूर्ण राज्याचा किंबहुना देशाचा कारभार महिलांच्या हातात जावा, या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरले. हा कायदा जेव्हा प्रत्यक्षात लागू होईल, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उच्चारलेल्या women led development ची ही पहाट असेल.

# हे आव्हान स्वीकारूया...

**डॉ. मेधा कुलकर्णी**

खासदार, राज्यसभा, भारतीय जनता पार्टी

२०२५ मध्ये 'संसद रत्न' पुरस्काराने सन्मानित



**औरोनेही बोया मुझको, औरोनेही सिंचा मुझको ।**
**एक दफा तो मुझको अपना, जीवन खुदही बोने दो।**
**लिख लेने दो अपनी किस्मत, होता है सो होने दो।**

'तिची' ही आर्त हाक आहे की किती काळ 'मी' दुसऱ्यांच्या (पुरुषांच्या) छत्रछायेत परावलंबी जिणे जगू? मला घेऊ दे माझे निर्णय, धडपडीन सुरुवातीला, पण सावरु दे स्वत:च स्वत:ला.. मला माझे भविष्य लिहू दे, घडवू दे. कोणतीही महिला जगाच्या कानाकोपऱ्यातून हेच म्हणत होती. हा एक काळ होता. काही प्रमाणात तो आजही आहे. आज आपण म्हणतो की, अनेक क्षेत्रात महिला आपले सामर्थ्य सिद्ध करत स्वत:लाही सिद्ध करत आहेत. पण त्यांच्याच वाट्याला ही सिद्ध करण्याची, परीक्षा द्यायची वेळ का येते आहे हा एक मुद्दा आहे. पण तेही त्या करत आहेत. पुरुष व महिलांच्या असमानतेशी, अन्यायाशी निगडित अगणित प्रश्न आहेत व ते सोडवण्यासाठी महिलांना राजकारणात भक्कम उभे राहावे लागेल. प्रामुख्याने वरच्या स्तरावरील राजकारणात ही काळाची गरज आहे. ज्यात नेतृत्व व निर्णयाचे अधिकार हे महिलांचे असतील. हा विचार करूनच २५ वर्षे रखडलेले 'नारीशक्ती वंदन अधिनियम' हे विधेयक पारित करून केंद्रातील मोदीजींच्या नेतृत्वातील सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे.

- **पार्श्वभूमी व सद्यस्थिती :**

१९९२ साली तत्कालीन प्रधानमंत्री माननीय पी. व्ही. नरसिंहराव यांनी ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवर महिला आरक्षण लागू केले, ज्यायोगे ३३% महिला लोकप्रतिनिधी गाव, जिल्हा, व नगर स्तरावर ग्रामपंचायत जिल्हा परिषद, नगरपरिषदा, नगरपालिका इत्यादी ठिकाणी निवडून आल्या. ग्रामीण पातळीवर हुंडा, दारूविक्री, पाणी पुरवठा, मल निस्सारण, घरगुती गॅस इत्यादी अत्यंत महत्त्वाच्या परंतु त्यावेळी दुर्लक्षिल्या गेलेल्या अनेक महत्त्वाच्या विषयावर लोकप्रतिनिधी महिला बोलू लागल्या विषयाला वाचा फोडू लागल्या. ही परिणामकारकता बघून देशातील महाराष्ट्रासह इतर अनेक राज्यांनी हे प्रतिनिधित्व आरक्षण प्रमाण ५०% घोषित केले. देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील एकूण

३२ लाख लोकप्रतिनिधींपैकी १४ लाख लोकप्रतिनिधी महिला आहेत. फ्रान्समध्ये हे प्रमाण ४०%, युके मध्ये ३४%, जर्मनी मध्ये २७% तर भारतामध्ये सर्वात जास्त ४४% इतके प्रमाण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला प्रतिनिधित्वाचे आहे. परंतु वरच्या स्तरावर गेलात की महिला लोकप्रतिनिधी अदृश्य होतात. जिथे देशासाठी व राज्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले जातात, अशा लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधान परिषद या चार ठिकाणी महिला प्रतिनिधींचे प्रमाण हे कमी आहे असे लक्षात येते. आज लोकसभेमध्ये १५ टक्के पेक्षा कमी, राज्यसभेमध्ये १४ टक्के पेक्षा कमी महिला लोकप्रतिनिधी आहेत. जागतिक स्तरावर २६.२% इतके महिला लोकप्रतिनिधींचे प्रमाण आहे. त्यापेक्षा आपण बरेच मागे आहोत. राज्यस्तरावर विधानसभा व विधान परिषदांमध्ये देशातील १७ राज्यातील महिला लोकप्रतिनिधींचे प्रमाण दहा टक्के पेक्षा सुद्धा कमी आहे असे निदर्शनास येते.

- **'महिला लोकप्रतिनिधींचे प्रमाण कमी का?**

'महिला लोकप्रतिनिधींचे प्रमाण कमी का? असा प्रश्न या निमित्ताने पडतो. प्रामुख्याने पुरुषप्रधान क्षेत्र मानल्या गेलेल्या या क्षेत्राबद्दल अनेकांच्या मनामध्ये दडपण, भीती, तिरस्कार इत्यादी भावना सुद्धा आजपर्यंत असायच्या. काहींच्या मनात अजूनही आहेत. प्रामुख्याने हे क्षेत्र सत्ता आणि पैसा या दोघांच्या एकत्रिकरणामुळे अत्यंत उन्मत्त झालेल्या अशा पुरुषांनी व्यापलं आहे. अशाही प्रकारचा एक समज त्यामध्ये असू शकेल. आणि मग अशा 'डर्टी पॉलिटिक्स'मध्ये महिलांनी कशाला जायचं? अशा प्रकारची मानसिकता समाजातल्या प्रत्येक कुटुंबामध्ये असायची. तरीही अनेक सुशिक्षित व समाजभान असलेल्या स्त्रियांनी स्वातंत्र्यपूर्व काळातही व स्वातंत्र्यानंतरच्या काळातही आपले योगदान दिल्याचे आपल्या लक्षात येईल. परंतु तरीही एकंदरीत विचार करता महिलांचे प्रमाण हे राजकारणामध्ये कमीच राहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर हे प्रमाण वाढण्याचे कारण आरक्षण. पण सुरुवातीच्या काळातही या आरक्षणामुळे आलेल्या महिला या कोणाची बहीण, आई, पत्नी अशा होत्या. त्यामुळे या महिला या फक्त सह्यांच्या पुरत्याच असायच्या व प्रत्यक्षात कामगिरी व नेतृत्व हे त्या घरातील पुरुषच करत होते. आता परिस्थिती काही प्रमाणात आपल्याला बदललेली दिसते. ज्यामध्ये महिला स्वत: प्रभावशाली असे काम करत आहेत, निर्णय घेत आहेत. आपल्या वैशिष्टयपूर्ण अशा कार्यशैलीमुळे स्वत:चा ठसा राजकारणावर उमटवत आहेत. तरीही आजही पंचायत स्तरावर जे काम चालते, त्यात प्रामुख्याने निवडून आलेल्या महिला या पुरुषप्रधान संस्कृतीच्या पगड्याखाली काम करतात असे लक्षात येते. मागच्याच महिन्यात माझ्याकडे एका गावातून निधीच्या संदर्भात मागणी करणारे पत्र आले. पत्र गावच्या महिला सरपंचाच्या लेटरहेडवर आले होते. त्यावर त्यांचा फोन नंबर दिला होता. महिला सरपंचाचे निधी मागणारे पत्र पाहून मला हुरुप आला व तो मजकूर वाचून त्या संदर्भातली अधिक माहिती घ्यावी यासाठी सरपंच ताईंना फोन केला. सरपंच ताईंचा फोन एका पुरुषाने उचलला. ते म्हणाले,'मी त्यांचा मालक बोलत आहे.' (आता हा मालकी हक्क त्यांना कोणी दिला ही गोष्ट वेगळी) मी त्यांच्या पतीला म्हणाले, 'तुम्ही ताईंचा फोन उचलला आहे का? ताईंना त्यांचा फोन द्या. ते म्हणाले की,' हा माझाच फोन नंबर आहे.' मी तुमचा फोन नंबर तुम्ही सरपांचाचा नंबर म्हणून

लेटरहेडवर का टाकला आणि जर त्या सरपंच आहेत तर मला त्यांच्याशी बोलून निर्णय घ्यायला आवडेल आणि मी तुम्हाला निधी देऊ शकेन.’ त्यावर ते म्हणाले, ‘ती घरकामात आहे, मीच पाहतो सर्व.’ मी नाराज होऊन माझा निधी देण्याचा विचारच रद्द केला.

मी अनेक राज्यांमध्ये प्रवास करते. काही ठिकाणी मला स्वत:च्या निर्णयक्षमतेचा वापर करणाऱ्या उत्तम नेतृत्व करणाऱ्या अशाही महिला लोकप्रतिनिधी पाहायला मिळतात तर काही ठिकाणी त्यांचे पती अजूनही निर्णय घेताना दिसतात. ही एक फार मोठी अडचण आजही जाणवते. कायदा करूनही महिलांना त्यांचे न्याय हक्क मिळत नाहीत. कारण त्यांना न्याय मिळवून देणाऱ्या लोकप्रतिनिधी म्हणवल्या जाणाऱ्या महिलांनाच अजून त्यांचा हक्क मिळालेला नाही. काही ठिकाणी मात्र महिला अतिशय सक्षमतेने आपली बाजू मांडताना, आपल्या मतदारांची बाजू प्रशासनाकडे लावून धरताना व त्यासाठी झगडताना, नेतृत्व पणाला लावताना दिसतात. त्यांना बघून अभिमानही वाटतो. काम करण्याची एक वेगळीच शैली महिलांमध्ये आहे. प्रामुख्याने महिला अत्यंत उत्तमरीतीने कामाचे नियोजन करू शकतात.

परस्पर उत्तम संवाद साधून काम जमवून आणू शकतात. त्याचबरोबर आपल्या मतदारासंघासाठी जनतेसाठी दीर्घकालीन विकास योजनांसाठी त्या आग्रही राहताना दिसतात. शिक्षण, आरोग्य सुविधा अशासारख्या विषयांमध्ये महिला जास्तीत जास्त स्वत:ला प्राधान्य देताना दिसतात. अल्पकालीन मोहापेक्षा दीर्घ परिणामकारक अशा जनहिताच्या गोष्टींकडे महिलांचा कल असतो. ज्याची परिणामकारकता एक लोकप्रतिनिधी म्हणून कायम जास्त असते. या दृष्टिकोनातून समाज हितासाठी आणि देशाहितासाठी शहर गावांच्या विकासासाठी महिला लोकप्रतिनिधी असणे हे खूप फायदेशीर ठरते. राजकारणाचा स्तर हा महिला लोकप्रतिनिधींच्या बाबतीत खूप उंचावलेला दिसतो. व्यसने, अश्लीलता, भ्रष्टाचार या गोष्टी ज्या प्रामुख्याने पुरुषप्रधान राजकारणाचा अविभाज्य भाग राहिल्या त्याचा स्पर्शही न करता कित्येक महिला लोकप्रतिनिधी संपूर्ण आयुष्य राजकारण करताना दिसतात. त्यामुळे देशहिताच्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेले शुचिर्भुत राजकारण पाहायला मिळते.

- **अज्ञान, माहितीचा कौशल्यांचा अभाव :**

या मात्र खूप मोठ्या समस्या महिला लोकप्रतिनिधींमध्ये जाणवतात. प्रत्येक गावांमध्ये आणि अगदी शहरातही मुलींच्या शिक्षणाला नंतरचा प्राधान्यक्रम असल्यामुळे मुलीला अशिक्षित ठेवले असेल, तर तिची ज्ञानाची व्याप्ती अर्थातच कमी असते. त्यामुळे अशी स्त्री लोकप्रतिनिधीही फारसे परिणामकारक काम करेल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे शिक्षण व पूरक प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. विषयाची माहिती, प्रशासकीय तंत्राचे ज्ञान, राजकीय कामकाजातील आयुधे यांचे ज्ञान यांच्या एकत्रित परिणामातून लोकप्रतिनिधी प्रशासनाकडून कामे करून घेऊ शकतात. अन्यथा त्यांना टेकूची आवश्यकता भासते. अशावेळी निर्णयाचे अधिकार व नेतृत्व तिच्या हातून निसटलेले दिसते. त्यामुळे मुली/महिला शिकल्या आणि प्रशिक्षितही झाल्या तर उत्तम लोकप्रतिनिधी समाजाला उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त शक्यता निर्माण होतील.

- **स्त्री सुलभ अडचणी :**

गरोदरपण, बाळंतपण या सगळ्यातून पुरुषाला जावे लागत नाही. पण स्त्रीला एक मोठा कालावधी यासाठी राखून ठेवावा लागतो. मूल जन्मल्यानंतरही काही वर्ष ते पूर्णपणे आईवर अवलंबून असते.वडील एक वेळ घरी नसले तर चालेल, पण आई बाळाजवळ नसेल तर मात्र बाळाच्या निकोप वाढीत खूप अडचणी येतात. त्यामुळे नैसर्गिकरित्या स्त्री आणि पुरुष यांच्या कार्यपद्धतीत फरक पडलेला आपल्याला दिसतो. महिला आपली सर्वच कामे दुसऱ्यांवर सोपवू शकत नाहीत. नोकरी करणाऱ्या अनेक स्त्रिया मुलांना पाळणा घरात ठेवून जात असल्या तरी पुरुषाने नोकरी करणे व महिलेने नोकरी करणे यात मुले लहान असतील तर फरक पडतो. घराघरातील सण वार, इतर कर्तव्य पुरुषांपेक्षा महिलांकडून अपेक्षा जास्त आहेत, अशी आपल्या समाजाची स्थिती आहे. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर एक व्यापक पाठिंबा अशा सर्व अडचणींवर मात करण्यासाठी युक्त ठरेल.

- **संवाद कौशल्य व भाषण कौशल्य :**

बऱ्याच वेळा महिलांमध्ये वक्तृत्व कौशल्याचा अभाव असतो. आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे हे सांगता आले नाही तर समाजात त्याचा प्रभाव पडत नाही. त्यामुळे नेमके मुद्दे कसे मांडायचे याचे शास्त्र, तंत्र व कौशल्य आवश्यक आहे. जाहीर सभेत भाषण करण्याची पद्धत वेगळी, सभागृहात भाषण करण्याची पद्धत वेगळी, सांस्कृतिक कार्यक्रमात भाषण करण्याची पद्धत वेगळी, आंदोलनात भाषण करण्याची पद्धत वेगळी अशा विविध ठिकाणी आपले वक्तव्य कसे मांडावे हे प्रशिक्षण अनुभव आणि सरावामुळे जमू शकते. हा सराव नसेल तर मात्र व्यक्ती आपला ठसा समाजावर उमटवू शकत नाही. ज्या व्यक्तीला ज्या लोकप्रतिनिधीला संभाषण व भाषण कौशल्य जमत नाही अशी व्यक्ती कितीही हुशार असली तरी राजकारणामध्ये मागे पडते. महिलांच्या संदर्भात यातील मुख्य अडचण प्रामुख्याने ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवरील महिला लोकप्रतिनिधींमध्ये भाषण कौशल्याची आहे असे मला वाटते. त्यावर सराव, प्रशिक्षण हा उपाय वाटतो.

- **समाजातील मानसिकता :**

आम्ही एकदा एका महिला लोकप्रतिनिधींच्या कार्यक्रमाला गेलो होतो. त्या ठिकाणी असलेले एक वक्ता महिला लोकप्रतिनिधींना आपली वागणूक समाजात व घरात कशी असावी, याविषयी उद्बोधन करत होते. त्यांचे उद्बोधन खरोखरच चांगले होते. त्यांनी एक उदाहरण यावेळी महिलांना दिले. तुम्ही घरात गेल्यानंतर राजकारणाची झूल बाजूला ठेवून निव्वळ एक गृहिणी असणे आवश्यक आहे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रख्यात अभिनेत्री दीपिका पदुकोण यांचे वडील प्रकाश पदुकोण यांनी ज्यावेळी दीपिकाला घरी बोलावले, त्यावेळी त्यांनी आवर्जून तिला समज दिली की, तू घरात आल्यानंतर सेलिब्रेटी नाहीस, तर एक सर्वसामान्य मुलगी आहेस व तुझे कपडे, तुझी चादर तुलाच उचलावी लागेल, तुझे जेवणाचे ताट तुलाच उचलावे लागेल. हे उदाहरण देऊन वक्त्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की हाच नियम व हेच तत्व महिला लोकप्रतिनिधींनी घरात गेल्यानंतर वापरावे व आपले आचरण ठेवावे. ही अपेक्षा मला रास्त वाटली. एक व्यक्ती म्हणून मला हे म्हणणे पटले की कोणीही व्यक्ती बाहेर कितीही मोठा किंवा लहान असेल तरी घरातील कुटुंबीयांशी असलेले नाते हे निव्वळ आपुलकीचे व साधेपणाचे असले पाहिजे. बाहेरच्या पदांची झूल ही

बाहेरच उतरवून ठेवली पाहिजे. याच्याशी मी सहमत आहे व त्याचा अवलंब करत आले आहे. परंतु मला त्यांना एक प्रश्न विचारावासा वाटला की तुम्ही हा मुद्दा पुरुष लोकप्रतिनिधींच्या बैठकीत मांडता का? मला माहित आहे की त्याचे उत्तर नाही असे होते. पुरुष प्रतिनिधी ज्यावेळी घरी येतात तेव्हा ते त्यांचा लवाजमा घेऊन घरी येतात व घरात आल्यानंतरही त्यांची सरबराई व सेवा घरातील व्यक्ती आपल्याला करताना दिसतात. तिथे या गोष्टी सांगण्याची आवश्यकता समाजातील तज्ज्ञ मंडळींना वाटत नाही. परंतु लोकप्रतिनिधी महिला आहे, तिला आम्ही बाहेर जाऊ देतो म्हणजे आम्ही तिला काहीतरी सवलत दिली आहे आणि त्याचा तिने गैरफायदा घेऊ नये व या उपकारांची जाणीव ठेवावी हे सांगण्यास पुरुषी मानसिकतेचा समाज हा कधीही विसरत नाही. दुसरे एक उदाहरण, ज्यावेळी एखादी सभा असते त्यावेळी महिलांना सुंदर साड्या नेसून आवरून पारंपरिक वेशभूषेमध्ये स्वागत कक्ष सांभाळायला दिलेला असतो. रजिस्ट्रेशन करणे, आलेल्या पाहुण्यांना औक्षण करणे वगैरे कामे ही या कक्षाला सोपवलेली असतात. महिलाही अशी कामे करून स्वतःला कृतकृत्य मानतात. प्रत्यक्ष सभेच्या  ठिकाणी एखाद्या महिलेमध्ये भाषण करण्याची क्षमता आहे का? व तिच्या प्रेरणादायी, धारदार वक्तृत्वाची संधी तिला देता येईल का? हा विचार पुढे आला पाहिजे जो हल्ली होऊ लागला आहे असे मला वाटते. निव्वळ रजिस्ट्रेशन करणे वगैरे सारखी कारकूनी करण्यासाठी ती महिला राजकारणात आली नाही व जसे पुरुष राजकारणी इतर जबाबदाऱ्या सांभाळतात, त्या जबाबदाऱ्या सांभाळण्याची ताकदही तिच्यात आहे हे विसरून चालणार नाही व महिलांनीही स्वतःला सुरक्षित, सोप्या मार्गावरून बाहेर काढून अवघड चॅलेंजिंग अशा कामांमध्ये स्वतःला झोकून देऊन आपली तयारी सिद्ध करावी लागेल. तरच पक्ष व समाज तुमचे महत्त्व जाणेल असे वाटते.

अशा सगळ्या गोष्टींसाठी प्रशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामध्ये विविध प्रशासनिक बाबी, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, रस्ते बांधणी इत्यादी सर्व विषयांचे व्यवस्थापन हे त्या पातळीवर कसे होते? याची माहिती देणे वक्तृत्वशैली, वेळेचे नियोजन, पेहराव, संभाषण कौशल्य, पत्र लेखन, निवेदन देणे, कायद्याचा अभ्यास, विविध आस्थापनांच्या शैली, आताच्या काळात सोशल मीडियाचा वापर, इत्यादी सर्व गोष्टी प्रशिक्षणाने शिकवल्या जाऊ शकतात. ज्याचा आम्हीही कधीकाळी लाभ घेतला आहे. भारतीय जनता पक्षाच्या एकंदरीतच यंत्रणेत अभ्यास वर्ग व कार्यशाळा यांचा अंतर्भाव असतो. ठाणे जिल्ह्यातील उत्तन येथे स्वर्गीय रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथेही अनेक अभ्यास वर्ग हे लोकप्रतिनिधी व संघटनात्मक पदाधिकारी महिला व पुरुष सर्वांसाठीच घेतले जातात.

- **राजकारणाविषयी चे मत व टिकेचा सामना :**

विविध क्षेत्रात आजही महिला उत्तम काम करत असल्या तरीही त्या त्या ठिकाणी घडणारे महिला अत्याचारांचे प्रमाणही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. त्यात राजकारण या क्षेत्रामध्ये तर खूप गैरकारभार व गैरव्यवहार असू शकतो. अशा ठिकाणी या गलिच्छ राजकारणाचा भाग होऊन एखादी महिला, मुलगी

कितपत काम करू शकेल? तिला काम करण्यासाठी कितपत वाव मिळेल? तिला त्रास होईल का? ती या गलिच्छ राजकारणाचा बळी ठरेल का? तिचा अपमान केला जाईल का? तिचा गैरफायदा घेतला जाईल का? अशी एका अर्थाने म्हटले तर रास्त भीती कुटुंबांमध्ये असते आणि म्हणून बायकांनी त्या गलिच्छ राजकारणापासून बाजूला राहावे किंवा विमेन शुड स्टे अवे फ्रॉम डर्टी पॉलिटिक्स असे म्हणून तो विचारच मनातून झटकून टाकला जातो.

एका अभ्यासावरून असे लक्षात येते की, राजकारणात असलेल्या महिलांना अनेक अपमानास्पद टिप्पणी किंवा सेक्शुअल रिमार्क्स ऐकावे लागतात. दर सात ट्वीट पैकी एक ट्विट हे महिलांसाठी लांछन लावणाऱ्या प्रकारचे (abusive) प्रकारचे ट्विट आहे असे या अभ्यासातून लक्षात आले आहे. त्यामुळे अशा प्रकारची टीकाटिप्पणी ऐकून घेण्यापेक्षा त्यात पडायलाच नको, असा विचार करून महिला राजकारणापासून मागे राहतात किंवा कुटुंबे आणि समाजही मुलींना, स्त्रियांना राजकारणापासून दूर राहण्याविषयी, राजकारणापासून परावृत्त करत असतो. परंतु असे करून कसे चालेल? सुरुवातीच्या काळात जेव्हा इतर अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी प्रवेश केला, शिकून मोठ्या झाल्या, नोकरी करू लागल्या, तेव्हा त्याही ठिकाणी टीका झाली, काल्पनिक आरोप लावले गेले. 'स्त्री बाहेर पडली की बिघडली, हाताबाहेर गेली', अशा प्रकारच्या टीकेला तिला तोंड द्यावे लागत होते. तशाच प्रकारची परिस्थिती आज समाजात राजकारणी महिलांविषयी कमी जास्त प्रमाणात दिसून येते. विशेष करून ज्या वेळेला एखादी कर्तृत्ववान निग्रही महिला प्रतिनिधी, ज्यावेळी समाजहितासाठी भूमिका घेते व पुरुष नेत्यांचा विरोध पत्करून रोषाला बळी पडते, त्यावेळी अशा प्रकारच्या अश्लाघ्य टीकांना सामोरे जावे लागते. ज्या सवंग स्पर्धेचे प्रतीक ठरतात. किंबहुना निरोगी स्पर्धा पेलण्यास व निरोगी स्पर्धेला सामोरे जाण्यास पुरुष लोकप्रतिनिधी कमी पडले की ते महिलांच्या चारित्र्यावर अनाकलनीय असा हल्ला चढवतात. ज्यामुळे प्रसंगी महिला लोकप्रतिनिधी बावचळून जाते व अगतिक होते. हेच त्यांच्या प्रतिस्पर्ध्याच्या युद्धनीतीचे यश ठरते. अशाच पद्धतीने महिला लोकप्रतिनिधींवर शिंतोडे उडवून चुकीच्या टीकाटिपण्या करून तिची पीछेहाट करून स्वतःची मनमानी करण्यात ते यशस्वी होतात. मनी, मसल, थ्रेट, अब्युज, अँड पर्सनल अटॅक यांची भीती पुरुष लोकप्रतिनिधींपेक्षा, महिला लोकप्रतिनिधींना असते असे एका अभ्यासाद्वारे निदर्शनास आले आहे.

या सगळ्या स्थितीवर नक्कीच इलाज शोधला जायला हवा. स्त्रियांनी आपली मानसिकता बदलणे व समाजानेही तिला प्रोत्साहन देणे गरजेचे असते. अशावेळी पक्षांतर्गत व अंतरपक्षीय विरोधावर योग्य वेळी समाधानकारक तोडगे आवश्यक ठरतात.

- **सोयीस्कर तिकिटांच्या बळी :**

बऱ्याच वेळा स्पर्धेत तोडीस तोड ठरणाऱ्या महिलेपेक्षा एखादी कठपुतली महिला त्या ठिकाणी बसवण्यात स्वारस्य असते. जी विना तक्रार सांगितलेले आदेश पाळेल, जी कायम अंकित राहील, अशा महिलेला तिकीट देण्याकडे कल असतो. किंवा एखाद्या राजकीय घराण्यातीलच स्त्रीला सोय म्हणून तिकीट

दिले जाते. मागील निवडणुकीत ४१ टक्के महिला उमेदवार राजकीय घराण्यातील होत्या यातील ३०% निवडून आल्या परंतु मग त्या ठिकाणची खरी तळमळीची कार्यकर्ती, अनेक वर्ष पक्षासाठी, समाजासाठी, खडतर मेहनत केलेली, समाजसेवेची आवड असलेली खरी कार्यकर्ती डावलली जाते. असे होता कामा नये. निवडून येण्याचा निकष हा एक महत्त्वाचा मुद्दाही इथे उपस्थित होतो. पुरुषांची निवडून येण्याची शक्यता महिलांच्या तुलनेत जास्त असल्याचे गृहीतक मांडले जात असल्यानेही महिलांची उमेदवारी कमी प्रमाणात दिसते.

एक तर महिलांचे पक्षांतर्गत कामात सहभागी होण्याचे प्रमाण कमी, त्यात त्यांना तिकीट देण्याचे प्रमाण कमी आणि तिकीट दिल्यानंतर एकत्रित प्रयत्नातून निवडून येण्याचे प्रमाण कमी, यामुळे महिला लोकप्रतिनिधींची संख्या कमीच दिसते.

- **पक्षातील संघटनात्मक नेमणुका :**

कित्येक वेळा विविध पक्षात संघटनात्मक पदांमध्ये महिला नेतृत्वाला गौण स्थान दिलेले दिसते. प्रामुख्याने आत्ताच्या परिस्थितीत हळूहळू संघटनात्मक पदांमध्ये सुद्धा विशिष्ट संख्येने महिलांनाही पदे दिली जावीत यासाठीचा आग्रह सुरू झाला आहे. फक्त महिला मोर्चामध्येच महिला न राहता, पक्षाच्या मुख्य संघटनेत (पेरेंट बॉडीमध्ये) सुद्धा महिलांचे प्रतिनिधित्व असावे व त्यांनाही निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे, यासाठी अनेक पक्ष पुढाकार घेताना दिसत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या नुकत्याच झालेल्या संघटनात्मक नेमणुकांमध्ये आवर्जून हा विचार पुढे आला. विविध मंडल अध्यक्षांच्या घोषणा होत असताना मतदारसंघातील चार मंडळांपैकी किमान एक महिला व एक एस्. सी. एस्. टी. प्रकारचे मंडलाध्यक्ष नेमण्याविषयी आग्रह धरला गेला. सर्व ठिकाणी नैसर्गिकरित्या अशा नेतृत्व करणाऱ्या महिला मिळाल्या नसल्या तरी सुद्धा अशा प्रकारचा शोध घेतला गेला ही जमेची बाजू आहे. प्रामुख्याने संघटनात्मक वरिष्ठ नेतृत्वाने आवर्जून हा उल्लेख केला की' त्यांना (महिलांना) संधी दिल्याशिवाय त्या स्वतःची क्षमता कशी सिद्ध करू शकतील?' त्यामुळे स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी सुद्धा संधीच्या आवश्यकता आहे याची जाण हळूहळू सर्व पक्षांमध्ये व प्रामुख्याने भारतीय जनता पक्षामध्ये आल्याचे सकारात्मक चित्र दिसत आहे ही जमेची बाजू नक्कीच म्हणता येईल. मोजक्याच महिला पक्षात कार्य करतात त्यातील काहींनाच उमेदवारी मिळते व त्यातील काहीच निवडून येतात असे होत असल्यामुळे हे प्रमाण रोडावत जाते.

- **आरक्षणाबाबत पुरुषांची मानसिकता :**

महिलांनाही ही सर्व पदे घेऊन काय करायचे आहे? त्यांना फक्त महिला वर्गासाठीच काम करायचे आहे का? त्यांना मिरवायचे आहे का? असे प्रश्न समोर येतात. पुरुषांना ही सर्व पदे घेऊन काय करायचे आहे? असा प्रश्न कधीच विचारला जात नाही. 'आम्ही आहोत ना महिलांचे प्रश्न सोडवायला', असे उलट बोलले जाते. महिला रिझर्वेशन पडल्यानंतर अनेक पुरुषांचे चेहरे हे पडलेले असतात. 'आता या आणखीन राजकारणात येऊन काय करणार आहेत' ' काय साध्य करायचे आहे?' 'आतापर्यंत राजकारणात येऊन त्यांनी काय मिळवले?' अशा प्रकारचे उपहासात्मक टिप्पणी केली जाते. परंतु आजपर्यंत पुरुषांनी राजकारणात येऊन काय मिळवले? असे विचारले जात नाही. मी सर्वांविषयी बोलत नाही पण अनेक

पुरुषही असे आहेत की ज्यांना विषयाची जाण, कौशल्य, वक्तृत्व, समाजसेवेची आवड नसते. पण त्यांनी राजकारणात येऊन काय मिळवले असा प्रश्न विचारला जात नाही. परंतु महिला धडपडून का होईना स्वतःला घडवताना दिसत असताना त्यांनी मात्र 'राजकारणात येऊन असे काय दिवे लावले?' असा प्रश्न विचारला जातो. त्यांचे काम फक्त औक्षण करणे, आलेल्या नेत्यांचे स्वागत करणे, रजिस्ट्रेशन करणे, फारच फार मोठ्या समारंभांमध्ये स्वागत कक्ष व भोजन कक्ष सांभाळणे, इतपतच मर्यादित आहे का असा प्रश्न मला पडतो. स्टेजवर बसणाऱ्या नेत्यांमध्ये महिला नेत्यांचे प्रमाण क्वचितच दिसून येते आणि बसलेल्या महिला नेत्यांपैकी भाषण करणाऱ्या महिलांचे प्रमाण किती ? तर नगण्य. त्यांना त्यांचे विचार जोपर्यंत आपण बोलू देणार नाही तोपर्यंत समाज घडवण्यामध्ये त्यांचे योगदान कसे मोजले जाईल? असा मला प्रश्न पडतो.

- **महिला लोकप्रतिनिधींची आवश्यकता:**

गावागावांमध्ये आजही हुंडाबळी, दारू पिऊन हाताबाहेर गेलेला नाकर्ता नवरा, संपूर्ण कुटुंब एकट्याच्या जीवावर सांभाळणाऱ्या महिलांचे प्रमाण खूप आहे. आर्थिक आणि शैक्षणिक असमानता आहे. मुलाला व मुलीला शिकवताना शैक्षणिक असमानता आहे. स्त्री आणि पुरुष दोघेही कमवत असतानाही आर्थिक असमानता आहे. हे सर्व सामाजिक असमतोल आजही दिसत असताना यावर त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला लोकप्रतिनिधी जर पुरेशा प्रमाणात असतील तर हुंडाबंदी, दारूबंदी, आर्थिक व शैक्षणिक समानता, कुटुंबामध्ये महिलांना समान स्थान, बुरसटलेल्या चालीरीतींना हटवून भारताची ५०% लोकसंख्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने आणण्यासाठी महिला लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात पुरेशा प्रमाणात असण्याची आवश्यकता आहे.

तसेच व्यापक समाजकार्याची उभारणी करण्यासाठी ही महिला लोकप्रतिनिधींची आवश्यकता आहे. एका अहवालानुसार उच्च स्तरावर काम करणाऱ्या महिला लोकप्रतिनिधी पुरुषांच्या तुलनेत चांगले व वेगळेपणाने काम करतात. अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी, भ्रष्टाचार कमी करण्यासाठी, दूरगामी परिणामकारक अशा सुधारणांसाठी महिला लोकप्रतिनिधी चांगले काम करताना दिसत आहेत. त्या राजकीय संधीसाधूपणाला कमी बळी पडणाऱ्या असतात असेही निदर्शनास आले आहे.

- **तात्पर्य:**

अनेक महिलांनी पक्षांतर्गत संघटनात्मक कार्यात, सामाजिक कार्यात सहभागी होऊन, स्वतःच्या गुणांची जोपासना करावी, पक्षानेही त्यांना प्रोत्साहन द्यावे, मार्गदर्शन करावे, संरक्षण द्यावे, उमेदवारीही द्यावी. त्यांच्या अंगभूत वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीमुळे फक्त स्त्रियांपुरतेच त्यांचे काम मर्यादित न राहता व्यापक समाजासाठी सुद्धा त्या काम करतील व आपल्या कमिटमेंटमुळे राजकीय पटलावर आपला ठसा उमटवून देशाच्या प्रगतीत हातभारच लावतील, असा मला विश्वास वाटतो.

# राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व : एक तुलनात्मक जागतिक आढावा



**डॉ. वरदा संभूस**

सहायक प्राध्यापक, विधी आणि सुशासन विशेष केंद्र

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली

- **प्रस्तावना :**

१९७५ हे संयुक्त राष्ट्रांनी महिलांचे आंतरराष्ट्रीय वर्ष (IYW) म्हणून घोषित केले. तेव्हापासून, सार्वजनिक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी जगभर विविध देशांमध्ये महत्त्वपूर्ण संस्थात्मक सुधारणा घडत आहेत. मतदानाचा अधिकार, काम करण्याचा अधिकार, समान वेतनाचा अधिकार अशी मागणी करणारी महिलांची चळवळ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुरू असली तरी, या चळवळींना संस्थात्मक बांधणीमध्ये रूपांतरित करण्यासाठी किमान एक शतक लागले. IYW ने या संस्थात्मक सुधारणांची गती वाढवली. तथापि, जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये आणि विशेषतः राजकीय प्रतिनिधित्वात बराच मोठा लिंगभेद आहे. लिंग समानतेमध्ये जागतिक प्रगती असूनही, राजकारणात महिलांचे कमी प्रतिनिधित्व हा एक व्यापक मुद्दा आहे. शिवाय, महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व केवळ राष्ट्रीय संसदेतील किंवा महानगरपालिका प्रशासकीय संस्थांमध्ये त्यांच्या उपस्थितीशी जोडले जाऊ नये. सर्वोच्च सार्वजनिक पदावर महिलांची संख्यात्मक वाढ, कायदे आणि धोरणे तयार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देण्याची त्यांची क्षमता आणि समान प्रतिनिधित्वाच्या संधींची उपलब्धता या आधारे त्यांचे मूल्यांकन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्या लेखामध्ये विविध देश आणि प्रदेशांमधील राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व तपासण्यासाठी एक व्यापक तुलनात्मक विश्लेषण केले आहे.

- **ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि जागतिक कल :**

इतिहासाचा मागोवा घेतला तर महिलांना राजकीय क्षेत्रात समाविष्ट करून घेण्यासाठी, समानता आणि मान्यता मिळविण्यासाठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागला. ऐतिहासिकदृष्ट्या, जगभरातील बहुतेक राजकीय व्यवस्थांमध्ये महिलांना औपचारिक राजकीय सहभागापासून वगळण्यात आले. प्राचीन समाजांमध्ये, शासन पुरुषप्रधान होते आणि महिलांच्या भूमिका मोठ्या प्रमाणात घरगुती क्षेत्रापुरत्या मर्यादित होत्या. १८ व्या आणि १९ व्या शतकात, विशेषतः पश्चिमेकडील देशांमध्ये, लोकशाही विचारांच्या उदयामुळे महिलांच्या

मताधिकारासाठी चळवळी सुरू झाल्या. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला युनायटेड किंग्डम (UK) आणि युनायटेड स्टेट्समध्ये (USA) मताधिकार चळवळी महिलांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या. १८९३ मध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देणारा न्यूझीलंड हा पहिला देश होता (पॅक्सटन आणि इतर, २००७). हळूहळू महिला, संसदेत आणि राजकीय कार्यालयांमध्ये प्रवेश करू लागल्या, पण त्यांची संख्या अनेक दशकांपर्यंत कमी राहिली. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात, विशेषतः समाजवादी आणि वसाहतवादी देशांमध्ये त्यांचा सहभाग वाढला. १९६० आणि १९७० च्या दशकात स्त्रीवादी चळवळींच्या उदयामुळे समान राजकीय प्रतिनिधित्वासाठी आणखी जोरात चळवळ सुरु झाली. कालांतराने, महिलांच्या जागतिक स्तरावर मताधिकाराची चळवळ पसरली, ज्यामुळे राजकीय सहभागात हळूहळू वाढ झाली. तरीही, राजकीय पदांमधील प्रतिनिधित्व निवडणूक मतदानाच्या तुलनेत मागे पडले आहे.

अलिकडच्या दशकांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढावे ह्या विषयाचा आग्रह धरणाऱ्यांमध्ये आणि धोरणांमध्येही बदल करण्याकडे कल दिसून येतो आहे. चौथ्या जागतिक महिला परिषदेत 'बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन (१९९५)' हा लिंग समानता साध्य करण्यासाठीचा एक महत्त्वाचा जागतिक अजेंडा स्वीकारला गेला. यामध्ये १८९ देशांनी भाग घेतला असून, त्यात शिक्षण, आरोग्य, हिंसाचार, आर्थिक सहभाग आणि राजकीय प्रतिनिधित्व यासह १२ महत्त्वाच्या क्षेत्रांसंबंधी धोरणात्मक उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. हे व्यासपीठ महिलांच्या पूर्ण सक्षमीकरणावर आणि सर्व प्रकारच्या भेदभावाच्या उच्चाटनावर भर देते. तसेच जागतिक पातळीवर धोरणांचे लिंग समानतेच्या नियमितपणे त्याचे पुनरावलोकन केले जाते. जगभरातील महिलांचे हक्क आणि लिंग समानता वाढवण्यासाठी सरकारे आणि नागरी समाज यांना हे व्यासपीठ मार्गदर्शन करते आणि एक प्रमुख संदर्भ बिंदू म्हणूनही त्याकडे बघितले जाते.

त्याचप्रमाणे, संयुक्त राष्ट्रांच्या 'शाश्वत विकास ध्येय ५' (SDG 5) चे उद्दिष्ट लिंग समानता साध्य करणे आणि सर्व महिला आणि मुलींना सक्षम करणे हे आहे. भेदभाव, हिंसाचार आणि बालविवाहासारख्या हानिकारक प्रथा दूर व्हाव्यात असे त्यात म्हटले आहे. तसेच राजकीय, आर्थिक आणि सार्वजनिक जीवनात समान सहभागाला प्रोत्साहन दिले आहे. SDG 5 मध्ये महिलांच्या जननक्षमता विषयक आरोग्याची काळजी, घरातील सर्वांची आणि सर्व बाबींची विनामोबदला काळजी घेण्याच्या कामाला मान्यता आणि आर्थिक संसाधनांच्या समान अधिकारांवर देखील भर दिला आहे. लिंग समानता सुनिश्चित करणे ही केवळ मानवी हक्कांची बाब नाही तर शाश्वत आणि समावेशक भविष्याचा पाया देखील आहे. विकास आणि जागतिक कल्याणाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रगतीसाठी महिला आणि मुलींना सक्षम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. राजकीय आणि सार्वजनिक जीवनात समान सहभागाचे महत्त्व त्यात अधोरेखित केले आहे (UN Women, २०१९). समावेशक धोरणे, लोकशाही वैधता आणि सामाजिक न्यायाच्या विकासासाठी प्रशासनात महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे (फिलिप्स, १९९५). तथापि, २०२४ पर्यंत, जगभरातील राष्ट्रीय संसद सदस्यांमध्ये महिलांचे प्रमाण फक्त २६.५% आहे (IPU, २०२४).

## ● प्रादेशिक तुलना

### युरोप

युरोपने महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वात लक्षणीय प्रगती दर्शविली आहे; तरीही, वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये आणि राजकीय व्यवस्थांमध्ये तफावत कायम आहे. २०२४ मध्ये, संपूर्ण युरोपमधील राष्ट्रीय संसदेत महिलांनी सरासरी ३३.९% जागा व्यापल्या आहेत, ज्या जागतिक सरासरी २६.५% पेक्षा जास्त आहेत (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४). या प्रगतीला महिला कोटा, प्रमाणशीर प्रतिनिधित्व प्रणाली आणि मजबूत स्त्रीवादी समर्थन या बाबींचा पाठिंबा आहे. तरीही, पश्चिम आणि पूर्व युरोपीय राष्ट्रांमध्ये लक्षणीय तफावत दिसून येते.

स्वीडन, नॉर्वे, फिनलंड, डेन्मार्क आणि आइसलँड ही सर्व राष्ट्रे महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाला प्रोत्साहन देण्यात जागतिक आघाडीवर असलेले नॉर्डिक राष्ट्रे मानली जातात. २०२४ मध्ये, या प्रदेशातील राष्ट्रीय खासदारांपैकी सरासरी ४५.७% महिला आहेत, जे जागतिक स्तरावर सर्वात मोठे प्रमाण आहे (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४). हे यश प्रमाणशीर प्रतिनिधित्व निवडणूक प्रणाली, पक्ष–विशिष्ट आरक्षण आणि लिंग समानतेला प्रोत्साहन देणाऱ्या मजबूत कल्याणकारी राज्ये यांच्या एकत्रित परिणामामुळे आहे (फ्रेडेनव्हल, २०२०). स्वीडनमध्ये रिक्सडॅगमध्ये ४६.४% महिला आहेत, ज्या या क्षेत्राचे नेतृत्व करतात (IPU, २०२४). सोशल डेमोक्रॅट्स आणि डाव्या पक्षासारख्या प्रमुख राजकीय पक्षांनी लिंग समानता साध्य करण्यासाठी जाणीवपूर्वक झिपर प्रणाली – पक्षांच्या यादीतील पुरुष आणि महिला उमेदवारांना पर्याप्त उमेदवारी मिळावी यासाठी – लागू केल्या आहेत (क्रूक, २००९). नॉर्वेमध्ये स्टोर्टिंगमध्ये ४५% महिला प्रतिनिधित्व आहे, जे पक्ष कोट्यामुळे आणि १९७० पासून स्थापित लिंग समानतेसाठी दीर्घकालीन सामाजिक वचनबद्धतेमुळे बळकट झाले आहे (टेगेन, २०१२). फिनलंड आणि डेन्मार्क, संसदेत अनुक्रमे ४६% आणि ४४% महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व असल्याचा दावा करतात. मंत्रीपदांवर मोठ्या संख्येने महिला असणे यासाठी डेन्मार्क ओळखले जाते (नॉर्डिक मंत्री परिषद, २०२३). आइसलँडच्या संसदेत स्त्री पुरुष संख्या जवळपास समान आहे, महिलांचे प्रतिनिधित्व ४७.६% आहे.

संस्थात्मक सुधारणा, पक्षीय राजकारणांत स्त्री–पुरुष समानतेविषयी जागरूकता आणि समावेशक नागरी संस्कृतींद्वारे महिला प्रतिनिधित्वाचे हे उच्च स्तर दशकांपासून या देशांमध्ये राखले गेले आहेत. शिवाय, नॉर्डिक प्रदेशात महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वामुळे अधिक समावेशक धोरणे तयार झाली आहेत, विशेषतः पुढील संदर्भात बालसंगोपन, प्रसूती रजा आणि लिंग–आधारित हिंसाचार (वांगनेरुड, २००९). राजकीय व्यवस्था, संस्थात्मक चौकटी आणि सामाजिक निकष या बाबी लिंग–समान राजकीय प्रतिनिधित्वाला प्रोत्साहन देण्यासाठी कशा सहाय्यक होऊ शकतात याचे नॉर्डीक मॉडेल हे एक प्रेरक उदाहरण आहे.

नॉर्डिक प्रदेशाच्या तुलनेत, युरोपमधील इतर राज्यांचे महिलांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण तुलनेने कमी दिसते. युनायटेड किंग्डममध्ये महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व लक्षणीयरीत्या सुधारले आहे, परंतु त्यात सातत्य दिसत नाही. २०२४ मध्ये, महिलांनी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये ३५% जागा व्यापल्या आहेत, २०१० मध्ये महिलांच्या जागा २८% होत्या (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४). नॉर्डिक देशांनी महिलांचे ४५% प्रतिनिधित्व ही पातळी ओलांडली आहे, यामुळे युकेची तुलनात्मक कमतरता अधोरेखित होते. जरी मार्गारेट थॅचर आणि थेरेसा मे यांनी पंतप्रधान म्हणून काम केल्यामुळे प्रतिकात्मक टप्पे प्रगती दर्शवितात, तरीही रुजलेली असमानता आणि पक्षांतर्गत विरोध यामुळे व्यापक लिंग समानता मर्यादित असल्याचे दिसते. (लोव्हेंडुस्की, २००५).

२००० च्या समानतेच्या नियमामुळे फ्रान्समध्ये महिला प्रतिनिधींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. या नियमानुसार पक्षांच्या यादीत पुरुष आणि महिला उमेदवारांचे समान प्रतिनिधित्व आवश्यक आहे. परिणामी फ्रान्समध्ये३९.५% महिला प्रतिनिधित्व आहे (मरे, २०१०). याउलट, दक्षिण आणि पूर्व युरोपमध्ये या संदर्भातील प्रगती कमी दिसते. अलिकडच्या काळात सुधारणा होऊनही, इटलीमध्ये संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व ३४% आहे, तर पोलंड आणि हंगेरीमध्ये अनुक्रमे २८% आणि १३% आहे (IPU, २०२४). महिलांसाठी प्रभावी कोटा (विशिष्ट हिस्सा) याची मर्यादित अंमलबजावणी आणि पितृसत्ताक राजकीय संस्कृतींचे कायमस्वरूपी अस्तित्व या बाबी या राष्ट्रांमध्ये महिलांच्या सत्तेतील प्रवेशात अडथळा ठरतात. (व्हर्ज आणि दे ला फुएंटे, २०१४).

युरोपियन युनियन (EU) ने त्यांच्या संस्थात्मक संरचना आणि प्रोत्साहनपर धोरणांमुळे लिंग समानता वाढविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २०२४ पर्यंत, युरोपियन संसदेत ३९.३% महिला सदस्य आहेत (युरोपियन संसद, २०२४). तरीही, संपूर्ण खंडात वरिष्ठ कार्यकारी पदांवर कुशल आणि प्रभावी महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे, युरोपचा अनुभव दर्शवितो की प्रशासनात लक्षणीय लिंग समानता प्राप्त करण्यासाठी सांस्कृतिक परिवर्तन आणि राजकीय वचनबद्धतेसह कायदेशीर सुधारणा आवश्यक आहेत.

- **सब –सहारन आफ्रिका :**

अनेक सब –सहारन आफ्रिकन देशांनी राजकीय लिंग समानतेमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. त्यांनी महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढविण्यात लक्षणीय प्रगती केली आहे, अनेकदा आर्थिकदृष्ट्या प्रगत प्रदेशांना मागे टाकले आहे. २०२४ मध्ये, या प्रदेशातील राष्ट्रीय संसदेत महिलांच्या जागा सरासरी २७.३% आहेत, जे जागतिक सरासरी २६.५% पेक्षा जास्त आहे (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४). ही प्रगती प्रामुख्याने संवैधानिक तरतूदी आणि कायद्यानुसार निश्चित केलेला कोटा आणि समावेशकतेला प्राधान्य देणाऱ्या संघर्षोत्तर पुनर्बांधणी उपक्रमांच्या प्रभावामुळे आहे (बाउर आणि ब्रिटन, २००६).

२०२४ पर्यंत, रवांडा हा देश  महिलांच्या संसदीय प्रतिनिधित्वात जगात आघाडीवर आहे, कनिष्ठ सभागृहात महिलांच्या ६१.३% जागा आहेत (IPU, २०२४). ही कामगिरी संवैधानिक तरतूदी, प्रमाणशीर

प्रतिनिधित्व प्रणाली आणि राष्ट्रातील नरसंहारानंतर सर्वसमावेशक प्रशासनामुळे साध्य झाली आहे. सेनेगलने लक्षणीय प्रगती दर्शविली आहे, कारण २०१० मध्ये लागू केलेल्या लिंग समानता कायद्यामुळे महिलांनी संसदीय जागांपैकी ४३% जागा मिळविल्या आहेत (फॉल, २०१५).

दक्षिण आफ्रिकेने आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस (एएनसी) ने लिंग समानतेला औपचारिक मान्यता दिली आहे, त्यामुळे त्यांच्या राष्ट्रीय सभेत महिलांचे प्रमाण ४६% झाले आहे (गीस्लर, २०००). याउलट, नायजेरिया आणि कॉंगोचे लोकशाही प्रजासत्ताक देशांमध्ये महिला संसद सदस्यांची लक्षणीय कमतरता आहेत, संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व १०% पेक्षा कमी झाले आहे. महिला संसद सदस्यांची ही असमानता विशिष्ट कोट्याचा अभाव, पितृसत्ताक वृत्ती आणि वाढत्या निवडणूक खर्चाशी संबंधित आहेत (ट्रिप, २०१५).

सब –सहारन आफ्रिकेतील महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाची तुलनेने वाढलेली पातळी प्रामुख्याने लोकशाही संक्रमणे किंवा संघर्षोत्तर पुनर्बांधणी अनुभवणाऱ्या राष्ट्रांशी जोडली जाते, जिथे नवीन संविधानांनी लिंग समानता निश्चित केली आहे. तरीही, महिलांच्या अल्प प्रतिनिधित्वामुळे राजकीय प्रभाव सातत्याने वाढलेला नाही, कारण संस्थात्मक आणि सांस्कृतिक अडथळे महिलांना महत्त्वाच्या नेतृत्व भूमिका आणि निर्णय घेण्याच्या अधिकारापर्यंत पोहोचण्यास प्रतिबंधित करत आहेत (तमाले, २०२०). केवळ औपचारिक प्रतिनिधित्वाऐवजी भरीव प्रतिनिधित्वाची हमी देण्यासाठी सुधारणा आणि सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे.

- **मेना देश (MENA) :**

मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका (मेना) हे प्रदेश पारंपरिकपणे खोलवर रुजलेल्या पितृसत्ताक पद्धतीमुळे, प्रतिबंधात्मक कायदेशीर चौकटी आणि हुकूमशाही राजवटींमुळे महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वात जागतिक मानकांपेक्षा कमी पडले आहेत. २०२४ मध्ये, मेना देशांमध्ये महिला संसद एकूण सदस्यांपैकी फक्त १९.४% प्रतिनिधित्व करतात, जे जागतिक सरासरी २६.५% पेक्षा खूपच कमी आहे (आंतर–संसदीय संघ IPU २०२४). तरीही, या प्रदेशात लक्षणीय असमानता आहे, अनेक देशांनी उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

ट्युनिशिया देश स्वतःला प्रादेशिक नेता म्हणून ओळखतो, २०१४ च्या संविधानानंतर आणि राजकीय पक्षांच्या यादीत वरून खाली (पदांच्या दृष्टीने) आणि स्त्री पुरुष संदर्भात लिंग संतुलनाच्या अंमलबजावणीनंतर संसदीय जागांमध्ये महिलांनी ४७.७% जागा जिंकल्या आहेत (क्रॉस, २०२०). आंतरराष्ट्रीय दबाव आणि देशांतर्गत सक्रियतेला प्रतिसाद म्हणून मोरोक्को आणि अल्जेरियाने महिला प्रतिनिधित्वासाठी अनुक्रमे १७% आणि २६% असा कायदेविषयक कोटा तयार केला आहे; तथापि, अंमलबजावणीत सातत्य नाही (बाउर आणि ब्रिटन, २००६)

याउलट, सौदी अरेबियात महिलांचा सहभाग मर्यादित आहे. सुरुवातीला २०१३ मध्ये शूरा कौन्सिलमध्ये महिलांची नियुक्ती करण्यात आली होती आणि २०१५ च्या नगरपालिका निवडणुकीत त्यांना मतदान करण्याची आणि उमेदवार म्हणून उभे राहण्याची परवानगी देण्यात आली होती. तथापि, महिला प्रतिनिधित्व २०% पेक्षा कमी आहे, प्रामुख्याने प्रतिकात्मक आहे (डौमाटो, २०१३). प्रतिनिधीगृहात महिलांसाठी २५% कोटा असूनही, निवडणूक व्यवस्थेतील बदल आणि पुरुष–प्रधान पक्ष अधिक प्रचलित असल्यामुळे इजिप्तला सातत्यपूर्ण परिणाम मिळाले नाहीत.

राजकीय उदारीकरण आणि संघर्षोत्तर पुनर्बांधणीने कधीकधी संधी निर्माण केल्या आहेत. इराक आणि लिबियाने संक्रमणकालीन टप्प्यात महिलांसाठी राखीव जागा ठेवल्या, इराकने २५% राखीव जागा ठेवल्या, त्यामुळे संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व कायम राहिले (अल–अली आणि प्रॅट, २०११). तरीही, रूढीवादी विरोध, अपुरी अंमलबजावणी आणि राजकीय अस्थिरतेमुळे संपूर्ण देशात महिलांची महत्त्वपूर्ण राजकीय शक्ती कमकुवत होते आहे.

- **लॅटिन अमेरिका :**

कायदेशीर कोटा आणि राजकीय सुधारणांमुळे महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढविण्यात लॅटिन अमेरिका जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. २०२४ मध्ये, या प्रदेशातील राष्ट्रीय संसदेत महिलांनी सरासरी ३५.४% जागा मिळविल्या आहेत, जे जागतिक सरासरी २६.५% पेक्षा लक्षणीयरित्या जास्त आहे (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४). अनेक लॅटिन अमेरिकन राष्ट्रे महिलांसाठी राखीव जागा लागू करण्यात आघाडीवर होती आणि अनेकांनी समानता कायद्याच्या दिशेने प्रगती केली आहे, ज्यामध्ये मतदार यादीत महिला आणि पुरुषांचे समान प्रतिनिधित्व अपेक्षित आहे.

मेक्सिको या बदलाचे उदाहरण आहे, कारण २०२४ मध्ये काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांमध्ये महिलांचा समावेश ५०% होता, त्यानंतर कायदेविषयक आणि कार्यकारी पदांसाठी उमेदवारींमध्ये लिंग समानता आवश्यक असलेल्या घटनात्मक सुधारणा करण्यात आल्या (पिस्कोपो, २०२०). १९९१ मध्ये महिला आरक्षण लागू करणारा पहिला देश असलेल्या अर्जेंटिनामध्ये सध्या त्यांच्या कनिष्ठ सभागृहात ४४% पेक्षा जास्त महिला प्रतिनिधित्व आहे, सतत कायदेशीर आणि पक्ष–स्तरीय अंमलबजावणीमुळे हे शक्य झाले आहे (मार्क्स, बोर्नर आणि कॅमिनोटी, २००७). कोस्टा रिकाने झिपर प्रणाली लागू केली आहे, मतदार यादीत पुरुष आणि महिला उमेदवारांना आलटून पालटून स्थान दिले जाते,त्यामुळे त्यांच्या संसदेत ४७% महिला प्रतिनिधित्व झाले आहे (हटून आणि पिस्कोपो, २०१४).

तरीही, ब्राझीलसारख्या देशांमध्ये कमतरता आहे, ३०% जनादेश असूनही, कनिष्ठ सभागृहात महिलांचे प्रतिनिधित्व फक्त १७.७% आहे. अंमलबजावणी यंत्रणेची अकार्यक्षमता आणि मजबूत पितृसत्ताक राजकीय संस्कृती खऱ्या प्रगतीला अडथळा आणते (सॅचेट, २००८). चिलीने ४०/६० लिंग समानता

निवडणूक कायदा लागू करून लक्षणीय प्रगती केली आहे, ज्यामुळे २०२४ मध्ये ३५% महिला सहभागी झाल्या.

महिलांच्या संदर्भातील हिंसाचार प्रतिबंध, हिंसाचाराला शिक्षा आणि त्याचे निर्मूलन या विषयांवरील इंटर–अमेरिकन कन्व्हेन्शन (बेलेम दो पारा) सारख्या प्रादेशिक चौकटी, मजबूत महिला चळवळी, न्यायालयीन कारवाई यांमुळे जेंडर सुधारणांना चालना मिळाली आहे. लॅटिन अमेरिका हे दर्शवते की सातत्यपूर्ण विकास नसतानाही, कायदेशीर आदेश योग्यरित्या अंमलात आणल्यास, महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व लक्षणीयरित्या वाढू शकते.

- **उत्तर अमेरिका :**

अलिकडच्या दशकात उत्तर अमेरिकेत, विशेषतः कॅनडा आणि युनायटेड स्टेट्समध्ये राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व सुधारत आहे; तथापि, दोन्ही राष्ट्रांमध्ये त्यांच्या राष्ट्रीय कायदेमंडळांमध्ये अजूनही लिंग समानतेचा अभाव आहे. २०२४ मध्ये, कॅनडाच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये महिलांचे प्रतिनिधित्व ३०.५% आहे, तर युनायटेड स्टेट्समध्ये प्रतिनिधीगृहात २८.९% आणि सिनेटमध्ये २५% आहे (इंटर–पार्लियामेंटरी युनियन IPU, २०२४). हे निकाल इतर लॅटिन अमेरिकन आणि युरोपियन राष्ट्रांपेक्षा कमी आहेत, महिलांसाठी आरक्षण आणि समानता कायद्यांचा अधिक प्रभाव असून सुध्दा महिलांचे प्रतिनिधित्त्व कमी आहे.

कॅनडाने अनिवार्य लक्ष्यांपेक्षा पक्ष–चालित प्रयत्नांद्वारे मध्यम प्रगती साधली आहे. न्यू डेमोक्रॅटिक पार्टी (एनडीपी) आणि लिबरल पार्टीने अनौपचारिक महिला आरक्षण आणि उमेदवार भरतीसाठी वेगवेगळ्या योजनांचा, युक्त्यांचा वापर केला आहे, त्यामुळे महिलांच्या सहभागात चांगली वाढ झाली आहे (थॉमस आणि बोडेट, २०१३). पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी २०१५ मध्ये स्त्री– पुरुष प्रमाण संतुलित असेल अशा मंत्रिमंडळाची घोषणा केली – 'कारण हे २०१५ आहे' – ही घोषणा प्रतिकात्मकदृष्ट्या अर्थपूर्ण होती परंतु संसदेत याचा व्यापक प्रभाव दिसला नाही. (बाशेव्हकिन, २०१९).

अमेरिकेत २०१८ आणि २०२० च्या निवडणुकांमुळे महिलांसाठी, विशेषतः कृष्णवर्णीय महिलांसाठी अभूतपूर्व प्रगती झाली. तरीही, एकल–सदस्यीय जिल्हे, सत्ताधारी असण्याचे फायदे आणि पक्षाचे गेटकीपिंग यासारख्या संरचनात्मक अडचणी सुरूच आहेत (लॉलेस आणि फॉक्स, २०१०). कॅनडाच्या उलट, अमेरिकेकडे राजकारणात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी राष्ट्रीय योजना किंवा आरक्षण पद्धत नाही.

रवांडा किंवा स्वीडनसारख्या जागतिक नेत्यांच्या तुलनेत, उत्तर अमेरिकन राष्ट्रांची प्रगती सावकाश आणि सातत्याचा अभाव असलेली आहे. समानतेबद्दलच्या कल्पना तसेच सांस्कृतिक कल्पना विकसित होत आहेत, तथापि संस्थात्मक सुधारणा हळूहळू प्रगती पथावर आहेत. संपूर्ण निवडणूक सुधारणा किंवा कायदेशीर बंधनांच्या अभावामुळे, उत्तर अमेरिकेने राजकीय प्रतिनिधित्वात प्रक्रियात्मक आणि वास्तविक लिंग समानता या दोन्ही गोष्टी खूपच कमी प्रमाणात साध्य केल्या आहेत.

- **पॅसिफिक प्रदेश :**

पॅसिफिक प्रदेशात, लिंग समानता आणि लोकशाही सरकारसाठी आंतरराष्ट्रीय कायदे असूनही, महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व जगभरात सर्वात कमी आहे. पितृसत्ताक परंपरा, कुळ–केंद्रित राजकीय चौकटी आणि आरक्षणाचा अभाव यासह संरचनात्मक अडथळे यामुळे हे प्रतिनिधित्व सतत कमी होत आहे. २०२४ मध्ये, जागतिक सरासरी २६.५% (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४) च्या विपरीत, पॅसिफिक बेटे राष्ट्रीय संसदांमध्ये सरासरी फक्त १०.५% महिला प्रतिनिधित्व दर्शवितात.

२०२३ पर्यंत, न्यूझीलंड हा या क्षेत्रात एक वेगळा प्रदेश आहे, जिथे महिलांनी संसदीय जागांपैकी ५०% पेक्षा जास्त जागा मिळविल्या आहेत, याचे कारण कायमस्वरूपी राजकीय बदल, मिश्र–सदस्यीय प्रमाण (MMP) प्रणाली आणि लिंग समानता आणणे हे पक्षाचे उद्दिष्ट आहे. (कर्टिन, २०२२). ऑस्ट्रेलियाच्या, प्रतिनिधी सभागृहात महिलांचे प्रतिनिधित्व ३८.४% आहे, हे लेबर पार्टीने केलेल्या स्वेच्छा कोटा आणि लिंग समानता उपायांच्या अंमलबजावणीमुळे सुलभ झाले आहे (सॉवर, २०१२).

याउलट, वानुआटु, सोलोमन आयलंड आणि पापुआ न्यू गिनी सारख्या पॅसिफिक बेट राष्ट्रांमध्ये जागतिक स्तरावर महिला संसदीय प्रतिनिधित्व सर्वात कमी आहे. २०१७ च्या निवडणुकीनंतर, पापुआ न्यू गिनीच्या संसदेत एकही महिला नव्हती; तरीही, २०२२ मध्ये दोन महिला निवडून आल्या, ही एक किरकोळ प्रगती आहे (स्पार्क आणि कॉक्स, २०२३). राजकीय विरोध आणि सांस्कृतिक प्रतिबंधामुळे महिलांसाठी राखीव जागा लागू करण्याचे प्रयत्न प्रामुख्याने अपयशी ठरले आहेत.

- **आशिया :**

आशियातील महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व असमान राहिले आहे. सामाजिक–सांस्कृतिक निकष, निवडणूक प्रणाली आणि राज्य–नेतृत्व सुधारणांच्या जटिल परस्परसंवादाचे हे प्रतिबिंब आहे. २०२४ च्या सुरुवातीपर्यंत, आशियातील संसदीय जागांपैकी महिलांनी अंदाजे २०% जागा जिंकल्या होत्या. हे प्रमाण जागतिक सरासरी २७.२% पेक्षा खूपच कमी होते (आंतर–संसदीय संघ IPU, २०२४). तथापि, ही प्रादेशिक सरासरी देशांमधील स्पष्ट विरोधाभास लपवते.

नेपाळ आणि फिलीपिन्ससारखे देश प्रगतीशील ट्रेंड दाखवतात. २०१५ च्या संविधानाचे पालन करून नेपाळने संघीय संसदेत किमान ३३% महिलांचा समावेश करणे अनिवार्य केले आहे, त्यामुळे जवळजवळ ३२.७% प्रतिनिधित्व होते (UN Women, २०२३). औपचारिक कोटा नसतानाही, फिलीपिन्सने अलिकडच्या वर्षांत २८% पेक्षा जास्त महिला प्रतिनिधित्व राखले आहे, ज्याला मजबूत नागरी समाज आणि महिला राजकीय राजवंशांनी मदत केली आहे (जलाल, २०२०).

याउलट, आशियातील दोन सर्वात प्रगत अर्थव्यवस्था असलेले दक्षिण कोरिया आणि जपान अजूनही मागे आहेत. २०२४ पर्यंत, जपानच्या कनिष्ठ सभागृहात महिलांच्या जागा फक्त १९.५% आणि दक्षिण कोरियाच्या राष्ट्रीय असेंब्लीमध्ये (IPU, २०२४) १९% आहेत. सांस्कृतिक रूढीवाद, पुरुषप्रधान पक्ष

संरचना आणि आरक्षणाचा अभाव या कमी संख्येला कारणीभूत ठरतो (डाल्टन आणि जंग, २०२१).

दक्षिण आशियाई देशांमध्ये मिश्र परिणाम दिसून येतात. स्थानिक प्रशासनात ३३% आरक्षण असलेल्या भारताने पंचायती राज संस्थांमध्ये १.४ दशलक्षाहून अधिक महिलांना स्थान दिले आहे (राय, २०१७). बांगलादेशने संसदेत महिलांसाठी ५० जागा राखीव ठेवल्या आहेत, ज्यामुळे महिलांचा सहभाग सुमारे २१% झाला आहे (UNDP, २०२३). एकूणच, काही आशियाई देशांनी प्रशंसनीय प्रगती केली असली तरी, संपूर्ण प्रदेश, राजकारणात लिंग समानता प्राप्त करण्यापासून खूप दूर आहे.

- **राजकारणात महिलांच्या प्रतिनिधित्वावर परिणाम करणारे घटक :**

२१ वे शतक बहुतेकदा आकांक्षांचे शतक म्हणून ओळखले जात असल्याने, महिलांनादेखील जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये कायदेशीर आणि समान प्रतिनिधित्व आणि संधी मिळविण्याची इच्छा आहे. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व हा लिंग समानता आणि लोकशाही समावेशकतेचा एक महत्त्वाचा मापदंड आहे. अनेकांची इच्छाशक्ती, कायदेशीर आणि धोरणात्मक योजना असूनही राजकीय क्षेत्र पुरुषप्रधान राहिले आहे. राजकीय क्षेत्रात महिलांना लक्षणीयरीत्या कमी प्रतिनिधित्वाचा सामना करावा लागत आहे. सामाजिक–सांस्कृतिक निकष, आर्थिक अडथळे, राजकीय संरचना आणि संस्थात्मक भेदभाव यासह अनेक परस्परसंबंधित घटकांचा महिलांच्या राजकीय सहभागावर परिणाम होताना दिसतो.

- **सामाजिक–सांस्कृतिक निकष, लिंग भूमिका आणि पितृसत्ताक संरचना :**

पारंपरिक लिंग भूमिका आणि सामाजिक अपेक्षा महिलांच्या राजकीय संधींचा लाभ मिळवण्यासाठी मध्यवर्ती भूमिका बजावतात. अनेक समाजांमध्ये, राजकारण अजूनही पुरुषांचे क्षेत्र मानले जाते आणि महिलांनी सार्वजनिक सहभागापेक्षा कौटुंबिक जबाबदाऱ्यांना प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा असते (इंगलहार्ट आणि नॉरिस, २००३). पितृसत्ताक वृत्तीमुळे अनेकदा महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळत नाही. त्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि सार्वजनिक कामातील सहभागावर मर्यादा येतात. ह्या सांस्कृतिक रूढी, शिक्षण, माध्यमे आणि धार्मिक शिकवणींद्वारे महिलांमध्ये रुजविल्या जातात. हे सारे एकत्रितपणे महिलांच्या क्षमतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार करतात. (पॅक्सटन आणि ह्यूजेस, २०१४). आणि जरी महिला राजकीय क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावू इच्छितात, तरीही त्यांना अनेकदा राजकीय प्रतिनिधित्वासाठी आणि पुढे जाऊन सर्वोच्च सार्वजनिक पदे भूषविण्यासाठी संधी आणि संसाधनांचा अभाव असतो.

- **आर्थिक अडचणी :**

आर्थिक अवलंबित्वामुळे महिलांच्या राजकारणात सहभागी होण्याच्या क्षमतेवर लक्षणीय परिणाम होतो. राजकीय पदासाठी प्रचार करण्यासाठी आर्थिक संसाधनांची आवश्यकता असते आणि महिलांना पुरुषांच्या तुलनेत आवश्यक निधी आणि नेटवर्कची उपलब्धता नसते. स्त्री– पुरुष वेतनातील तफावत, असमान मालमत्तेची मालकी आणि कर्जाची मर्यादित उपलब्धता या सर्व गोष्टी या असमानतेला कारणीभूत ठरतात (बॅलिंग्टन आणि करम, २००५). याव्यतिरिक्त, घरगुती आणि नियमित कामांचा भार यामुळे त्यांच्या

राजकीय क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठीचा वेळ आणि क्षमता यावर मर्यादा येतात. त्यामुळे पुरुष आणि महिलांच्या सहभागात खूप फरक पडतो.

- **राजकीय आणि निवडणूक व्यवस्था :**

राजकीय व्यवस्था आणि निवडणूक नियमांची रचना यांचा महिलांच्या प्रतिनिधित्वावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडतो. बहुसंख्य प्रणालींच्या तुलनेत प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व प्रणालींमध्ये निवडून आलेल्या पदांवर महिलांची संख्या जास्त असते कारण त्यामध्ये बहुतेकदा स्त्री– पुरुष प्रमाण समान आहे ना? हे सुनिश्चित करण्यासाठी तयार केलेल्या पक्षांच्या याद्यांचा समावेश असतो (मॅटलँड, १९९८). राजकीय पक्ष उमेदवारीसाठी प्रवेश देणारे निरीक्षक म्हणून देखील काम करतात; जेव्हा पक्षांमध्ये अंतर्गत आरक्षण किंवा सकारात्मक कृती धोरणांचा अभाव असतो, तेव्हा महिलांना नामांकन आणि निवडणुकीमध्ये मोठ्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागते (क्रूक, २००९). या व्यतिरिक्त, पक्ष नेतृत्वाच्या भूमिकेमुळे महिला प्रतिनिधित्वाचा अभाव स्त्री– पुरुष समानतेच्या धोरणांच्या प्रगतीत अडथळा आणू शकतो. काही विशिष्ट राजकारणांमध्ये, जिथे पैसा आणि ताकद निवडणूक राजकारणात मोठी भूमिका बजावतात, तेथे महिला राजकीय क्रियाकलापांपासून दूर राहतात.

- **संस्थागत आणि कायदेशीर अडथळे :**

अनेक देशांमध्ये, भेदभाव करणारे कायदे आणि पद्धती महिलांच्या राजकीय सहभागावर मर्यादा घालत राहतात. उदाहरणार्थ, प्रतिबंधात्मक नागरिकत्व किंवा निवडणूक कायदे महिलांना मतदान करण्यापासून किंवा पदासाठी उभे राहण्यापासून रोखू शकतात. कायदेशीर अधिकार असले तरीही, कमकुवत अंमलबजावणी आणि स्त्री– पुरुष असमानतेची धोरणे लिंगभेद या अधिकारांना प्रभावहीन बनवू शकतात. या अडथळ्यांना तोंड देण्यासाठी आरक्षण पद्धत एक धोरण म्हणून उदयास आली आहे, परंतु तिचा प्रभाव संरचना आणि अंमलबजावणीवर अवलंबून असतो (डहलेरप आणि फ्रीडेनव्हल, २००५).

- **राजकारणात हिंसाचार आणि छळ**


राजकीय हिंसाचार आणि लिंग–आधारित छळ ही वाढती चिंता आहे. राजकारणातील महिलांना अनेकदा ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही ठिकाणी शाब्दिक शिवीगाळ, धमक्या आणि अगदी शारीरिक हल्ल्यांना तोंड द्यावे लागते. या बाबी अनेकांना राजकीय जीवनात सहभागी होण्यापासून रोखतात (क्रूक, २०२०). हे प्रतिकूल वातावरण राजकारण महिलांसाठी असुरक्षित बनवते आणि भविष्यातील सहभागापासून परावृत्त करते.

- **निष्कर्ष**

वर नमूद केलेले अडथळे महिलांचा राजकारणातला सहभाग वाढवण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यासाठी अनेक उपायांची आवश्यकता प्रतिपादित करतात. यामध्ये निवडणूक प्रणालींमध्ये सुधारणा करणे, आर्थिक आणि संस्थात्मक समर्थन प्रदान करणे आणि खोलवर रुजलेल्या लिंग भेदाच्या मानदंडांना

आणि पितृसत्ताक संरचनांना आव्हान देणे आवश्यक आहे. आरक्षण अनिवार्य करणाऱ्या कायदेशीर आणि संस्थात्मक सुधारणा, भेदभाव विरोधी कायदे लागू करणे आणि राजकीय वित्त नियमांमध्ये सुधारणा करणे या गोष्टी महिलांच्या  राजकारणातील प्रवेशाच्या समान संधी निर्माण करू शकतात. महिला उमेदवारांसाठी क्षमता निर्माण प्रशिक्षण कार्यक्रम, नेतृत्व विकास आणि मार्गदर्शन महिलांची राजकीय तयारी वाढवू शकतात. लिंग-संवेदनशील शिक्षण, माध्यमांचा पाठिंबा आणि समुदाय एकत्रीकरण सांस्कृतिक दृष्टिकोन बदलण्यासाठी खूप पूरक ठरू शकते. जागतिक संस्थांनी लिंग समानतेला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना पाठिंबा देत राहावे, जसे की संयुक्त राष्ट्राचे महिलाविषयक कार्यक्रम. केवळ बहुआयामी आणि समावेशक दृष्टिकोनातूनच राजकीय प्रतिनिधित्वात खरी लिंग समानता साध्य करता येते. महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढविण्यात लक्षणीय प्रगती झाली असली तरी, बरीच आव्हाने कायम आहेत. आंतरराष्ट्रीय तुलनेवरून असे दिसून येते की संदर्भ-विशिष्ट धोरणे, विशेषतः आरक्षण आणि समावेशक निवडणूक प्रणालींचा वापर, हे महत्त्वाचे आहे. राजकारणात लिंग समानता साध्य करणे ही केवळ निष्पक्षतेची बाब नाही तर शाश्वत विकास आणि लोकशाही वैधतेसाठी एक महत्त्वाची बाब आहे.

**Percentage of Women MLAs in State Assemblies**




Note: This does not include data for Puducherry and Sikkim.
Sources: Websites of State Assemblies; PRS.

No state has more than 20% women representation in its Assembly. Chhattisgarh has the highest representation with 18% women MLAs, while Himachal Pradesh has just one woman MLA and Mizoram has none.

# राज्यकर्ती अहिल्याबाई

**डॉ. नयना कासखेडीकर**

मुक्त पत्रकार, स्तंभलेखिका, ब्लॉगर



राजकारणात  फक्त पुरुषांचीच मक्तेदारी आहे. महिलांना त्यातले काय कळते? असा दृष्टिकोन नेहमी दिसतो. एकोणिसाव्या शतकाच्या सामाजिक सुधारणेच्या काळापर्यंत स्त्रीचे विश्व म्हणजे चूल आणि मूल एव्हढेच मर्यादित होते. एव्हढेच नव्हे तर तिने त्या पलीकडे जाऊच नये. शिकू नये नाहीतर ती बिघडेल अशी भीती काही जणांना होती. पण इतिहासात डोकावले तर अशी अनेक उदाहरणे दिसतात की स्त्रिया राजकारभारात प्रत्यक्ष कामात नसल्या तरी अप्रत्यक्षपणे सल्ला देण्याचे काम उत्तम करत होत्या. प्रत्यक्ष कामात त्यांना संधी नसेच. पण संधी मिळाली तर त्या उत्तम राज्य कारभार चालवू शकतात. चांगले कौशल्य साधू शकतात. शिक्षण मिळाले तर चांगले संधीचे सोने करू शकतात. हे अनुभवाने सिद्ध होत गेले आहे. या स्त्रिया प्रजेचे हित लक्षात घेतात. राज्याचे चांगले रक्षण करतात.

अहिल्याबाई होळकर या त्यातल्याच एक राज्यकारभार चालवणाऱ्या उत्तम राजकारणी होत्या. वेगवेगळ्या कालखंडात स्त्रियांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला तर ,अनेक धुरंधर स्त्रिया दिसतात. ‘हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा’ असे म्हणणारे छत्रपती शिवाजी महाराज, यांच्या मातोश्री जिजाबाई होत. ही इच्छा शिवाजींच्या मनात बीजरूपाने रोवणाऱ्या मातोश्रीच  होत्या. असे संस्कार बालपणापासूनच शिवाजी महाराजांवर आई जिजाबाई यांनी केले होते. राज्य कारभारातील अनेक कौशल्ये त्यांनी बाल शिवाजींना शिकवली होती.

पेशवाईच्या कालखंडात पण कर्तृत्ववान स्त्रिया होत्या. अहिल्याबाई होळकर त्या पैकीच एक. रणांगणावरसुद्धा जीवाची बाजी लावणाऱ्या स्त्रिया भारतातीलच. राणी लक्ष्मीबाई यांचेही कर्तृत्व आपल्याला माहिती आहे. स्वातंत्र्य लढ्यात अनेक महिलांचा सहभाग होता. त्यानंतरच्या काळात सुद्धा अनेकींनी राजकारणात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.

कुटुंबात स्त्री ही मुख्य घटक असते. लोकशाहीमध्ये तिचा वाटा निम्मा आहेच. तशी ती समाजात, चळवळीत, सार्वजनिक जीवनात, आता तर राजकीय जीवनातसुद्धा ती महत्त्वाची भूमिका बजावत आहे. स्त्री जात्याच संवेदनशील असल्याने कुटुंब सांभाळतांना ती चोख जबाबदारी बजावते त्याप्रमाणेच इतर क्षेत्रात सुद्धा तशीच कर्तव्य बजावत असते.

फक्त तिला जाणणारा. तिची हुशारी, कौशल्य याची पारख करणारा समाज अथवा कुटुंब हवे. ज्याला ते कळेल तोच स्त्रियांना संधी देईल. कारण अजूनही बऱ्याच अंशी पुरुषी वर्चस्व असलेल्या समाजात स्त्रियांना महत्त्वाची संधी मिळेलच असे नाही. अगदी हेच अहिल्याबाई यांच्याबाबत घडले असे म्हणता येईल.

पूर्वी लहान वयात लग्न  होत असत. त्यामुळे सासरी घरात सून म्हणून जरी प्रवेश झाला असला तरी लहान वयातल्या या सुनेवर घरातले वडीलधारे संस्कार करत असत. अहिल्येचे खंडेरावांशी लग्न वयाच्या आठव्या वर्षीच झाले. होळकरांचे तर सुभेदार घराणे होते. त्यामुळे घरातले वातावरण, कामाचा प्रकार, हे सगळंच अहिल्याबाईंना लहानपणापासून परिचयाचे झाले होते. लहान अहिल्येची चुणूक बघून मल्हारराव तिलाच महत्त्वाची कामे सांगत असत. याच वातावरणात तिची जडणघडण होत होती. तिची बुद्धिमत्ता, अंगभूत कौशल्ये, हजरजबाबीपणा, निर्णयक्षमता हे सासरे मल्हाररावांनी ओळखले होते. तिला लहान वयातच सांगितलेली कामे ती चोखपणे करत असे. हे ओळखूनच मल्हररावांनी मुलगा खंडेराव याच्या निधनांनंतर अहिल्येला सती जाऊ न देता तिच्यावर विश्वास दाखवला होता. खंडेरावच्या मृत्यूनंतर मल्हाररावांना काहीही सल्ला मसलत किंवा हितगुज करायचे असल्यास अहिल्याबाईंनाच ते विषय सांगत असत. इतकी अहिल्याबाई बद्दल मल्हाररावांना खात्री वाटत असे.

खंडेराव आणि पुढे मुलगा मालेराव हेच वारस म्हणून सत्तेत होते, परंतु मुलगा खंडेरावच्या मृत्युनंतर मल्हारराव अहिल्येकडेच खरा वारस म्हणून बघत होते. ते अहिल्येमध्येच खंडेराव बघत होते. मुलाचे दुःख तर मल्हाररावांना होतेच. तेव्हापासून ते अहिल्येची सतत मदत घेऊ लागले, त्यामुळे अहिल्येचा राज्यकारभारातील कामाचा आलेख दिवसेंदिवस चढताच राहिला. सुभेदारांच्या सर्व सूचना व त्यांनी दिलेली उद्दिष्ट्ये व्यवस्थितपणे पूर्ण करणे/सर्व परगण्यातील व्यवहार त्या चोख बघत असल्याने आता माळवा/इंदूर प्रांतांची मल्हाररावांना काळजी नव्हती राहिली. राजकीय परिस्थितीवरसुद्धा अहिल्येचे बारकाईने लक्ष होते हेही त्यांना दिसले.

मल्हारराव मोहिमेवर गेले की सर्व कारभार अहिल्या बघत असे. मल्हाररावांच्या सूचनेनुसार सर्व व्यवस्था करीत असत. हिंदुस्थानात अब्दालीच्या करामतींच्या बातम्या कानवर येत होत्या. त्याने मथुरा वृंदावनात मुंडक्यांच्या राशी घातल्या, हे कळल्यावर त्यांनी ठरविले की, हिंदूंना आता चिरेबंद आश्रयस्थाने हवीत. त्यांनी ठिकठिकाणी धर्मशाळा बांधून घेतल्या.

राजकारण करता करता एकाच वेळी ब्रिटिश चोहोबाजूंनी वाढत असता, आपल्या समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्या प्रयत्न करत होत्या. संस्कृती टिकवण्याचा प्रयत्न करत होत्या. त्यांनी राज्यात पाणी पुरवठा सुधारणा घडवल्या. त्यांनी अन्नछत्रे उघडली, धर्मशाळा बांधल्या, चिरेबंदी विहिरी खोदल्या, राज्यातून उन्हाळ्यात प्रवास करणाऱ्या लोकांसाठी पाणपोया बांधल्या, पांथशाळा, आश्रयशाळा बांधल्या, मंदिरे बांधली, नद्यांवर घाट बांधले, स्त्रियांसाठी कपडे बदलण्यासाठी व सुरक्षित स्नानासाठी बंदिस्त ओवऱ्या बांधल्या, वेळोवेळी आक्रमणात उध्वस्त झालेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

पुलांचे बांधकाम, रस्ते निर्मिती, रस्ते दुरूस्ती, डाक व्यवस्था, रयतेसाठी शिक्षणाची व्यवस्था, ग्रंथ संग्रह व ग्रंथ निर्मिती, आरोग्यासाठी दवाखाने, औषधी बागा, शेतीसाठी सिंचन सोयी, जमिनीसाठी ९/११ चा कायदा, माळरानावर वृक्षलागवड, आरक्षित गायरान, करप्रणाली, विद्वान आणि कलाकार यांना राजाश्रय अशा अनेक गोष्टी केल्या.

मालेरावच्या निधनापर्यंत हातात सत्ता नसताना अहिल्याबाई राज्यकारभारात लक्ष देत होत्याच पण खऱ्या अर्थाने त्या मालेरावच्या मृत्यूनंतरच राज्यकर्त्या झाल्या. म्हणूनच हातात राज्याचा कारभार प्रत्यक्षपणे नसतांना सुद्धा अनेक विषय हाताळण्याचा अनुभव अहिल्याबाईंना आतापर्यंत काम केल्यामुळे होता. तसंच स्वतंत्रपणे राज्यकारभार हातात येईपर्यंतच्या काळात अहिल्याबाई अनेक बऱ्या–वाईट प्रसंगांना सामोऱ्या गेल्या होत्या. एक स्त्री म्हणून सामाजिक, कौटुंबिक स्तरावर अनेक रूढी परंपरांचे मणामणांचे ओझे त्यांनी सांभाळले होते. सती सारख्या प्रथांना बळी पडलेल्या स्त्रिया त्यांच्या कुटुंबातच त्यांनी पाहिल्या होत्या. सती जाणं, वारसा हक्क, हुंडा पद्धती, विधवांचे अधिकार, अशा अनेक प्रथांचा स्त्रियांना काय त्रास भोगाव लागतो ते अहिल्याबाईंनी स्वतः अनुभवले होते. एक स्त्री म्हणून सर्व जाणीव आणि संवेदनशीलता त्यांच्यात होती. म्हणून त्यांच्या राज्यात समाजातील स्त्रियांना अहिल्याबाई एक हक्काचा आधार वाटत होत्या. अहिल्याबाईंनी अनेक स्त्रियांना परंपरेच्या जोखडातून मुक्त करून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला वाट करुन दिल्याचे दिसते. स्वातंत्र्य दिल्याचे दिसते. त्यांचे सुधारणावादी विचार यातून लक्षात येतात.

राज्य कारभारातील सर्व समस्या अहिल्याबाई सहजपणे सोडवत असत. मग आर्थिक व्यवस्था, सामाजिक प्रश्न, लोकांचे हिताचे निर्णय, न्याय व्यवस्था, अगदी रणांगण अथवा युद्ध विषय, त्या संबधीचे निर्णय घेणं, हिशोब हे सर्व अहिल्याबाई कौशल्याने हाताळत असत. कुटुंबातील अनुभव प्रत्यक्ष घेतले होतेच पण आपल्या राज्यावर झालेले आक्रमण हेही त्यांनी पाहिले. पानिपतच्या युद्धात पराभव झालेला व त्याचे दुःख आणि परिणाम त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. यावेळी अहिल्येची सासरेबुवांना खूप मदत झाली. सुभेदाराची कर्तव्ये ही आपलीही  जबाबदारी समजून सून अहिल्या पुढे सरसावली. पानिपतानंतर सासूबाई गौतमाबाई यांचे निधन झाले त्यामुळे संसारात तत्वज्ञान सांगणाऱ्या, मैत्रीपूर्ण वागणाऱ्या, धीर देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या सासूबाई पण गेल्या. जाताना अहिल्येला सांगून गेल्या की तुला इथून पुढे कुटुंबाबरोबर राज्य कारभार आणि म्हातारे होत चालेलेले सुभेदार सासरे, मल्हारराव यांना तुलाच सांभाळावे लागणार आहे. असा सगळ्यांचाच आधारवड म्हणजे अहिल्याबाई होत्या. प्रजेच्या कल्याणाबरोबरच त्या इतरांचीही काळजी घेत असत.

प्रजेबरोबरच प्राणी, पक्षी यांच्या आयुष्याचा विचार सुद्धा राज्यकर्ती  म्हणून अहिल्याबाई करत असत. त्यांचे कार्य इंदूर, उज्जैन पर्यंतच मर्यादित नव्हते. केदारनाथ, रामेश्वर, जगन्नाथपुरी ते द्वारका असे चारही दिशांना होते. विशेष म्हणजे सर्व प्रांतातील माणसे जोडण्याची कला त्यांच्याकडे होती. त्यांनी गंगेचे पाणी महाशिवरात्रीला प्रांताप्रांतात कावडीने नेण्याची पद्धत सुरू केली. त्यामुळे प्रांतीय भारत जोडला गेला. ते कुठलीही सक्ती न करता, सात्विकता या त्यांच्या गुणामुळेच. माणसांबरोबरच पशू, पक्षी, प्राणी यांचाही

विचार त्या करत. त्यांच्यासाठी डोण्या, वैद्यकीय उपचाराची सोय केली होती. सर्पदंशावर उपचार करण्यासाठी हकीम व वैद्य नेमले, एव्हढेच काय मुंग्या व जलचर प्राण्यांसाठी सुद्धा साखर, कणकेच्या गोळ्या असे अन्नदान करीत. गोरगरिबांना सणासुदीला अन्नदान, कपडे, थंडीपासून संरक्षण म्हणून घोंगड्या वाटप करीत.

त्यांच्याकडे दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथसंग्रह होता. विद्वान आणि कलावंत यांची त्या कदर करीत, योग्य तो मानसन्मान देत. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी इतर प्रांतातील शास्त्री, पंडित, वैद्य व वैदिक यांना आणून,राहण्याची सोय करून त्यांनी एक प्रकारे ज्ञान संवर्धन व संरक्षण केले. उदा. काशी येथील ब्रह्मपुरी, कायदा आणि न्यायदानात सुद्धा योग्य दिशेने काम करत असत. त्या इतक्या चाणाक्ष होत्या की त्या काळात कायद्यात आवश्यक ते बदल  (सुधारणा) त्यांनी करवून घेतले होते. जे समाजाच्या हिताचेच होते. राज्याचे आर्थिक धोरणसुद्धा त्या कौशल्याने हाताळत असत. जगाच्या इतिहासात उत्कृष्ट प्रशासिका म्हणून अहिल्याबाई होळकर यांची नोंद आहे .

अठराव्या शतकातील, २८वर्षे यशस्वीपणे राज्य सांभाळणाऱ्या मुत्सद्दी, धैर्यवान, शूर, चतुर, धर्मनिष्ठ, दूरदर्शी अशा बहुपेडी स्त्री राज्यकर्ती म्हणजे अहिल्यादेवी. अहिल्यादेवी यांचा राज्याचा काळ (१७६७ – गादीवर बसून ते १७९५– निधन होईपर्यंत) म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातले सोनेरी पान.

लोकांसाठी रोजगार निर्माण व्हावेत म्हणून योग्य ते धोरण त्यांनी आखले होते. राज्यकारभार चालवताना त्यांनी जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टींबरोबरच, समता, शांतता, बंधुता, न्याय, विचार स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान या मूल्यांची जपणूक त्यांच्या काळात झालेली दिसते.

अहिल्याबाईंच्या बुद्धीचातुर्य, मुत्सदीपणा, प्रजाहित दक्ष आणि धर्मपरायणतेमुळे धर्म टिकला, संस्कृती संवर्धन झाले. कलेला प्रोत्साहन मिळाले. चरितार्थाची साधने उपलब्ध झाली. त्यांनी आपल्या सासऱ्यांचे, होळकर घराण्याचे नाव स्व–कर्तृत्वाने इतिहासात अजरामर केले.

अठराव्या शतकातील, २८ वर्षे यशस्वीपणे राज्य सांभाळणाऱ्या मुत्सद्दी, धैर्यवान, शूर, चतुर, धर्मनिष्ठ, दूरदर्शी अशा बहुपेडी स्त्री राज्यकर्तीची ओळख तुम्हा आम्हाला झाली ती गुणांची जाण असणाऱ्या केवळ आणि केवळ मल्हारराव होळकर यांच्यामुळेच. नाहीतर सर्वसामान्यपणे अहिल्या खंडेरावांच्या मृत्यनंतर सती गेली असती तर एक कर्तृत्ववान राज्यकर्ती महिला म्हणून अहिल्याबाई कुणालाच समजल्या नसत्या. त्यांच्या राज्यकारभाराने अनेक मापदंड आजच्या राज्यकर्त्यांना घालून दिले आहेत, अनेक आदर्श उदाहरणे समोर ठेवली आहेत.

राज्यकर्त्यांची कर्तव्ये काय असली पाहिजेत हे दाखवून दिले आहे. एक सामान्य स्त्री बुद्धीचातुर्य, मुत्सदीपणा, प्रजाहित दक्ष आणि धर्मपरायणतेमुळे धर्म आणि संस्कृती टिकून ठेऊ शकते याचे पुढच्या पिढीला धडे देऊन गेली आहे. या राज्यकर्तीला शतशः प्रणाम!

# भारतातील राज्यकर्त्या स्त्रिया

**डॉ. मनीषा दीपक पुराणिक**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठात श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्रात सहायक प्राध्यापक, लेखिका, प्राचीन इतिहास, भारतीय संस्कृती विषयक संशोधिका



भारतात प्राचीन काळापासून राज्यकर्त्या स्त्रियांचे संदर्भ दिसून येतात. अगदी प्राचीन संदर्भ हे ग्रंथांमधून मिळतात. नंतरच्या काळातील संदर्भ हे शिलालेख आणि ताम्रपटामधून मिळतात. हे उल्लेख अधिक विश्वसनीय मानले जातात. शिलालेख आणि ताम्रपटातून बऱ्याच राण्यांनी किंवा अधिकाऱ्यांच्या पत्नींनी दाने दिल्याचे उल्लेख सापडतात, तसेच राज्यकारभार केल्याचेही उल्लेख मिळतात. इतिहासाच्या पानांवर नोंद न झालेल्या अनेक राज्यकर्त्या स्त्रिया नक्कीच असणार आहेत, पण पुरेश्या माहितीअभावी या लेखात त्या सर्वांचा उल्लेख करणे शक्य झाले नाही. खालील लेखात अशाच काही कर्तृत्ववान राज्यकर्त्या स्त्रियांची थोडक्यात माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

- **नागनिका (इ.स.पू. २ रे शतक) –** महाराष्ट्रातील प्रसिद्ध सातवाहन घराण्यातील राजा सिरी सातकर्णी याच्या मृत्युनंतर मुले मोठी होईपर्यंत त्याची राणी नागनिका हिने राज्य सांभाळले. अनेक यज्ञ केले, दानधर्म केला. तिच्या नावाची नाणी सापडली आहेत. स्वत:ची नाणी असणारी भारतीय उपखंडातील ती पहिलीच राज्यकर्ती आहे. नाणेघाट येथील शिलालेखात तिच्या राज्यकारभाराची आणि दानधर्माची माहिती कोरलेली आहे.
- **प्रभावती गुप्त (इ.स. ४ थे शतक) –** गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा (विक्रमादित्य) याची कन्या प्रभावती गुप्त हिचा विवाह विदर्भातील वाकाटक राजा रुद्रसेन याच्या बरोबर झाला. मुलं लहान असतानाच रुद्रसेन राजाचे निधन झाले. त्यानंतर प्रभावती गुप्त हिने मुलं मोठी होईपर्यंत १३ वर्षे राज्य सांभाळले. पुण्यात तिचा एक ताम्रपट सापडला आहे तसेच वाकाटकांच्या शिलालेखातून तिची माहिती मिळते.
- **राणी मृगवती (इ.स.पू.६ वे शतक) –** राणी मृगवती ही वैशालीचा राजा चेतक याची मुलगी होती आणि कौशाम्बीचा राजा शातनिक याची पत्नी होती. भगवान महावीर यांच्याशी तिचे नाते होते असे जैन परंपरा सांगते. इतर शिक्षणाबरोबर तिला राज्यकारभाराचे शिक्षण मिळाले होते. युद्धात पतीचा मृत्यू झाल्यानंतर तिने काही काळ राज्य सांभाळले होते.


- **विजयभट्टारिका (इ.स. ७ वे शतक) –** चालुक्य राजा चंद्रादित्य याची राणी विजयभट्टारिका ही मुंबई जवळच्या दक्षिण महाराष्ट्राच्या काही भागावर राज्य करत होती. ती विजया–महादेवी या नावानेही ओळखली जात होती. शिलालेखामधून तिने तिच्या राज्याच्या पाचव्या वर्षी दिलेल्या दानाची माहिती मिळते.
- **शीलमहादेवी (इ.स. ८ वे शतक)–** राष्ट्रकुट राजा ध्रुव याची पट्टराणी शीलमहादेवी. हिने इ.स.७८६ मध्ये, तिच्या अधिकाराखाली दिलेल्या जमीनीच्या दानाची माहिती शिलालेखातून मिळते. या लेखात तिच्या पतीचे नाव नाही. त्यामुळे तिच्याकडे राज्य करण्याचे आणि दान देण्याचे महत्त्वाचे अधिकार निश्चितच असणार.
- **राणी त्रिभुवनदेवी (इ.स. ९ वे शतक) –** ओरिसामधील राजा ललिताभरणदेव याच्या मृत्युनंतर राणी त्रिभुवनदेवी हिला राज्यावर बसण्याची विनंती सरदार आणि मंत्र्यांनी केली. ती ओरिसामधील भौमकर घराण्यातील पहिली राज्यकर्ती स्त्री होती. देवी कात्यायनीप्रमाणे ती सिंहासनावर बसली असा उल्लेख मिळतो. तिने अतिशय उत्तमरित्या राज्यकारभार केला आणि शत्रूंचा नाश केला असा उल्लेख ताम्रपटात मिळतो.
- **राणी सुगंधा (इ.स. ९–१० वे शतक)** – काश्मीरमधील राजा शंकरवर्मन याच्या मृत्यूनंतर राणी सुगंधाने राज्य केले. त्यावेळी तिचा मुलगा गोपालवर्मन लहान होता. तिने इ.स. ९०४ मध्ये तिच्या स्वत:चे 'श्री सुगंधा देव–काश्मीरची राणी' या नावाने राज्य घोषित केले.
- **राणी सेम्बिअन महादेवी (इ.स. १० वे शतक)–** तमिळनाडूमधील प्रसिद्ध चोळ घराण्यातील राजा गंडरादित्य याची पत्नी सेम्बिअन महादेवी ही त्या काळातील सर्वात प्रभावशाली राणी होती. तिने साठ वर्षांच्या काळात अनेक मंदिरांची निर्मिती केली, दाने दिली. पतीच्या मृत्युनंतर तिने काही काळ तामिळनाडूमधील तंजावर येथे राज्यही केले.
- **कुंडवई नाचीयार (इ.स. १० वे शतक)** – चोळ घराण्यातील दुसरी महत्त्वाची स्त्री म्हणजे कुंडवई नाचीयार. चोळ राजा परांतक दुसरा याची ही मुलगी आणि प्रसिद्ध चोळ राजा राजराज चोळ (अरुमोळीवर्मन) याची बहिण होती. तिचा विवाह बाण राजकुळातील वल्लवरैयन वंदीरदेवन याच्याशी झाला होता. चोळ घराण्यावर आणि त्या काळातील दक्षिण भारतातील राज्यकारभारावर हिचा खूप प्रभाव होता.
- **राणी दिद्दा (इ.स. १०–११ वे शतक) –** राजा सिंहराजची राजकन्या दिद्दा हिचा विवाह काश्मीरचा राजा क्षेमगुप्त याच्याशी झाला. तिने ९८० ते १००३ इतकी वर्षे राज्य केले. तिच्या नावाची नाणी सापडली आहेत. 'राजतरंगिणी' या काश्मीरवरील ग्रंथात तिच्या विषयीची माहिती मिळते. रशियातील प्रसिद्ध कॅथरीन राणीच्या नावावरुन तिला 'काश्मीरची कॅथरीन' म्हणूनही उल्लेखले जाते.

- **अत्तिमब्बे (इ.स. १०-११वे शतक)-** पश्चिमी चालुक्य राजाच्या दरबारातील मुख्य सरदार आणि मंत्री नागदेव याची पत्नी अत्तिमब्बे होती. पतीच्या मृत्युनंतर तिने कारभार सांभाळला. भरपूर दाने दिली. कर्नाटकामध्ये अनेक जैन मंदिरे बांधली. 'दान चिंतामणी' म्हणून तिला ओळखले जाते.
- **मैलादेवी (इ.स. ११ वे शतक) -** कर्नाटक, द. महाराष्ट्रातील चालुक्य राजा सोमेश्वर याची राणी मैलादेवी ही बनवासी इथल्या मोठ्या भागावर राज्य करत होती.
- **केतलादेवी (इ.स. ११ वे शतक) -** कर्नाटकातील चालुक्य राजा सोमेश्वर या राजाची दुसरी राणी केतलादेवी हिच्या अधिपत्याखाली पोनवड येथील अग्रहार होता. तेथील सर्व कारभार ती बघत होती.
- **कुमकुमादेवी (इ.स. ११ वे शतक)** - शिलाहार राजा विजयादित्य याची बहिण कुमकुमादेवी ही कर्नाटकमधील धारवाड भागात राज्य करत होती.
- **लक्ष्मीदेवी (इ.स. १२ वे शतक)-** कल्याणी चालुक्य घराण्यातील राजा विक्रमादित्य-४ याची पट्टराणी लक्ष्मीदेवी तिच्या अधिपत्याखाली अठरा धार्मिक ठिकाणे होती. ज्यावेळी मार्कोपोलो हा इटलीचा प्रवासी भारतात आला त्यावेळी गुंटूर जिल्ह्याच्या काही भागावर राणी राज्य करत होती, अशी नोंद मार्कोपोलो याने करुन ठेवली आहे.
- **कुमरादेवी (इ.स. १२ वे शतक)-** ११९३ मध्ये पृथ्वीराज चौहान बरोबर त्याचा सरदार सामरसी याचा मृत्यू झाला. त्याची पत्नी कुमरादेवी हिने मेवाडचे राज्य ताब्यात घेतले आणि कुतुबद्दीन याला विरोध केला.
- **रझिया सुलतान (इ.स.१३ वे शतक)-** दिल्ली येथे मुस्लीम सुलतानांचे राज्य होते. त्यावेळी सुलतान शमसुद्दीन इल्तुतमिश याची मुलगी रझिया सुलतान हिने काही काळ दिल्लीवर राज्य केले. तिचे वर्चस्व सहन न होऊन दरबारातील सरदारांनी उठाव केला आणि त्यात ती मारली गेली. ही एकमेव मुस्लीम राज्यकर्ती स्त्री म्हणून ओळखली जाते.
- **राणी दुर्गावती (१५५० ते १५६४) उ. प्रदेश बुंदेलखंड -** गढमंडला, गोंडवन (मध्य प्रदेश) राज्याची राणी दुर्गावती महापराक्रमी होती. आपले पती दलपतराय यांच्या मृत्यूनंतर अल्पवयीन मुलांच्या वतीने तिने राज्यकारभार पाहिला. आपल्या आयुष्यात तिने ५१ लढाया लढल्या त्या सर्व लढाया तिने जिंकल्या. शेवटची ५२वी लढाई मुघलांशी लढताना फितुरीमुळे राणीला वीरमरण आले. कुशल प्रशासक, प्रजाहित दक्ष म्हणून राणी प्रसिद्ध होती.
- **राणी कर्णावती (इ.स. १६ वे शतक)-** राजस्थानमधील मेवाड येथील राजा राणा संग याची कर्णावती ही पत्नी होती. राणाच्या मृत्युनंतर तिने इ.स. १५२७ ते १५३३ राज्य केले. ती महाराणा प्रताप यांची आजी होती. सुलतान बहादूर शाह याने चितोडवर आक्रमण केले, त्यावेळी राणी कर्णावती हिने प्रतिकार केला. राणा संग याची दुसरी पत्नी जवाहीरबाई, ही पण युद्धात प्रतिकार करताना युद्धभूमीवर मरण पावली.

- **राणी अबाक्का चौटा (इ.स.१६ वे शतक) –** कर्नाटकातील तुळू प्रांतात उल्लाळ येथे जैन संप्रदायाची राणी अबाक्का चौटा ही राज्य करत होती. हिने पोर्तुगिजांविरुद्ध वारंवार लढा देऊन आपले राज्य सांभाळले. हिच्या काळात मलाबार किनारपट्टीवरून मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत होता.
- **केळदीची राणी चिन्नम्मा (इ.स.१७ वे शतक) –** १६६७ साली चिन्नम्मा हिचा विवाह कर्नाटकमधील शिमोगा जिल्ह्यातील केळदीचा राजा सोमेश्वर नायक याच्याशी झाला. पतीच्या मृत्युनंतर सुमारे २६ वर्षे तिने राज्यकारभार सांभाळला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर छत्रपती राजाराम महाराज जिंजीकडे जाताना चिन्नम्मा राणीने त्यांना आश्रय दिला. त्यावेळी चालून आलेल्या मुघल फौजेचा पराभव केला.
- **महाराणी येसूबाई (इ.स.१६५८ ते १७३०)–** महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांची सून आणि छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई एक अलौकिक व्यक्तिमत्व होते. त्या स्वराज्याच्या पहिल्या कुलमुखत्यार होत्या. राज्यकारभारासाठी प्रत्यक्ष संभाजी महाराजांनी त्यांना 'सखी राज्ञी जयति' असा शिक्का बनवून दिला होता. संभाजी महाराजांच्या निधनानंतर मराठी साम्राज्य वाचवण्यासाठी अतिशय धाडसाचे निर्णय येसूबाईंनी घेतले. तीस वर्षे मुघलांच्या कैदेत राहूनही शाहू महाराजांचे शिक्षण आणि संस्कार यावर लक्ष दिले. मराठा साम्राज्य राखून ठेवण्यामध्ये त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.
- **महाराणी ताराबाई भोसले (इ.स.१६७५ – १७६१) –** महाराष्ट्रातील छत्रपती राजाराम महाराज यांच्या पत्नी होत्या. छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनानंतर मराठा साम्राज्याची धुरा ताराबाई यांनी सांभाळली. वयाच्या अवघ्या २५–२६ व्या वर्षी मुघल फौजेशी राजा नसताना सैनिकांना हाताशी धरुन तब्बल ७ ते ८ वर्षे लढा दिला.
- **अनुबाई घोरपडे (इ.स. १७४५–१७७५) –** पेशवा बाळाजी विश्वनाथ यांची कन्या आणि थोरले बाजीराव यांच्या भगिनी. श्रीमंत नानासाहेब पेशव्यांबरोबर मोहिमा केल्या आणि नंतर बऱ्याच स्वतंत्र मोहिमा केल्या. त्यांचे पती व्यंकटराव घोरपडे यांच्या मृत्यूनंतर इचलकरंजी येथे तीस वर्षे अनुबाई यांनी आपले राज्य सांभाळले.
- **पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर (इ.स.१७२५ ते १७९५)–** (मध्य प्रदेश) पतीच्या निधनानंतर सासरे मल्हारराव होळकर यांनी माळवा प्रांताचे राज्य सांभाळायला दिले. त्यावेळी त्या २४ वर्षांच्या होत्या. पुढे मल्हाररावांच्या निधनानंतर त्यांनी १७६६ ते १७९५ या काळात राज्य केले. अतिशय न्यायाने राज्य करुन सुबत्ता आणली. भारतभर अनेक मंदिरांचे जीर्णोद्धार केले, नद्यांना घाट बांधले. एक कल्याणकारी राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई ओळखल्या जातात.

- **कित्तूरची राणी चिन्नम्मा (इ.स. १७७८ ते १८२९)–** कर्नाटकमधील कित्तूर या ठिकाणचा राजा मल्लसारजा याचा विवाह चिन्नम्मा हिच्याशी झाला. इ.स. १८१६ मध्ये पतीच्या आणि नंतर मुलाच्या निधनामुळे तिने दत्तक मुलगा घेऊन राज्य करायला सुरूवात केली. भारताचा तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड डलहौसी याने हे अमान्य केले. इंग्रज फौजेशी राणीने मोठ्या पराक्रमाने लढा दिला. पण पुढे ती कैदेत असताना तिचा मृत्यू झाला.
- **राणी लक्ष्मीबाई (इ.स. १८२८ ते १८५८)–** उत्तर प्रदेशातील झाशीचे राजे गंगाधरराव यांची पत्नी लक्ष्मीबाई यांनी, पती निधनानंतर दत्तक पुत्राला घेऊन राज्य केले. पण इंग्रजांनी दत्तक विधान रद्द करुन राज्य ताब्यात घ्यायचा प्रयत्न केला. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात त्यांनी शौर्याची परिसीमा गाठून राज्य वाचवायचा प्रयत्न केला पण युद्धात जखमी होऊन ग्वाल्हेर येथे त्यांचे निधन झाले. पराक्रमाचे प्रतिक म्हणून त्यांना ओळखले जाते.

### Party wise representation of women in Lok Sabha & Rajya Sabha



# भारतीय महिला व राजकारण

**अचला शर्मा**

सामाजिक कार्यकर्ता



''स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर पहिल्या लोकसभेपर्यंत महिलांची राजकारणातील स्थिती काय होती?'' या विषयावर विचार करता, असे वाटते की स्त्रीच्या स्वरूपाशिवाय भारतीय राजकारणाची कल्पनाही करता येणार नाही. आपले राष्ट्रगीत आहे ते 'वंदे मातरम'; ही भारताची वंदना नाही, कोणत्याही देशाची वंदना नाही, ते राजा किंवा स्त्रिया यांची वंदना नाही, तर मातेसाठीची वंदना आहे. राजकारण आणि राज्यव्यवस्थेवर स्त्रीचा प्रभाव असतोच. भारत हे राजकीय विचारांचे जन्मस्थान असून महिलांचे त्यात मोठे योगदान आहे. राजकारणात निवडणुका, लोकप्रतिनिधी, सरकार, मतदार हे सर्व महत्त्वाचे असतात. इंग्रज भारतात आले आणि त्यांच्या काळात महिलांनी राजकारणात प्रवेश केला, असे नाही. आपल्या येथे राज्यव्यवस्था होती, संस्थाने व संस्थानिक होते, ज्यात अनेक महिला शासक म्हणून होत्या. इंग्रजांनी भारतीयांवर गुलामगिरी लादली. नंतर प्रजासत्ताक आणण्याचा प्रयत्न केला. १९१७ मध्ये 'मोंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा' कायदा पारित झाला, पण त्या वेळी महिलांना पूर्ण मताधिकार मिळाला नाही. ही एक मोठी विडंबना आहे. भारतात सुरुवातीपासूनच समानतेची भावना होती. परदेशात, विशेषतः पाश्चात्त्य देशांमध्ये, स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. सुरुवातीच्या काळात महिलांना मताधिकार नव्हता, आणि त्यामुळे भारतीय महिलांना मताधिकारासाठी मोठा संघर्ष करावा लागला. १९३५ मध्ये भारत सरकार अधिनियम झाला आणि विधानसभांच्या निवडणुका पार पडल्या. १९३७ मध्ये विधानसभांच्या निवडणुका झाल्या त्यात फक्त १४% म्हणजे ३ कोटी लोकांनी मतदान केले. त्यापैकी महिला मतदार फक्त ४.२५% होत्या. महिलांना मतदानाचा अधिकार दिला गेला, पण सामान्य महिलांना हा अधिकार नव्हता. ज्यांच्याकडे मालमत्ता होती आणि ज्या महिलांनी राजकीय पात्रता पूर्ण केली होती, त्यांनाच मतदानाचा अधिकार मिळाला. येथे इंग्रजांचा द्वेष आणि दुटप्पीपणा दिसून येतो. भारतीयांनी कधीही महिलांमध्ये भेदभाव केला नाही; त्या मालमत्तेच्या मालक असू शकत होत्या. मात्र त्यातही सुधारणा झाली. १९३९ पर्यंत आणि त्यानंतर, ज्या पुरुष मतदारांना मतदानाचा अधिकार मिळाला होता. त्यांच्या पत्नींनाही मतदानाचा अधिकार दिला गेला. जर त्या पुरुषाचा मृत्यू झाला असेल, तर त्यांची विधवा पत्नी देखील मतदानाचा अधिकार बजावू शकत होती.

१९१७ मध्ये जेव्हा लॉर्ड चेम्सफोर्ड भारतात आले तेव्हा सरोजिनी नायडू, मुथुलक्ष्मी रेड्डी यांसारख्या शिक्षित महिलांनी त्यांच्या समोर महिला मताधिकाराचा संपूर्ण अजेंडा मांडला. त्याच वर्षी मुंबईत काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन झाले तेव्हा सरोजिनी देवींनी महिला मतदान हक्काबाबत प्रभावी भाषण केले. पुढील वर्षी १९१८ मध्ये सरला देवी चौधरींनी महिला मताधिकारासाठी पूर्ण प्रस्ताव सादर केला. इंग्रजांच्या काळात मताधिकार फक्त १४% लोकांना होता. सार्वभौमिक मताधिकार म्हणजे सर्व स्त्री–पुरुषांना मतदानाचा अधिकार हवा, अशीच मागणी सरोजिनी देवी आणि सरला देवी यांनी मांडली. नंतर राजकुमारी अमृतकौर यांनीही या मुद्द्यावर व्यापक आंदोलन केले. मार्गरिट कझिन्स आणि डॉरोथी जिनाराजादासा यांनी 'अखिल भारतीय महिला सभेची' स्थापना करण्यास पुढाकार घेतला. सरोजिनी नायडू यांनीही एकत्र येऊन १९१९ मध्ये ब्रिटनमधील 'हाऊस ऑफ कॉमन्स'समोर महिला मताधिकाराचा प्रस्ताव मांडला आणि ब्रिटिश संसदेबरोबर बैठक घेतली. येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की १९१९ पर्यंत ब्रिटनमध्येही महिलांना मतदानाचा अधिकार मिळालेला नव्हता. संपूर्ण जगभर महिलांच्या मताधिकारासाठी संघर्ष सुरू होता. त्या काळात 'हाऊस ऑफ कॉमन्स' ठरवायचा की मताधिकार किती असेल, पुरुषांचा आणि महिलांचा दोघांचाही. १९१९ मध्ये डॉरोथी जिनाराजादासा, मार्गरिट कझिन्स आणि इतर महिलांनी एकत्र येऊन 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये ही मागणी मांडली. त्याचा परिणाम असा झाला की 'लॉर्ड चेम्सफोर्ड' समितीने ठरवले की काही व्यवस्था भारतीय लोकांच्या हाती दिल्या जातील. १९१८ मध्ये त्यांनी 'साउथ बारो कमिटी' नावाची एक समिती स्थापन केली. त्यांनी भारतातील प्रतिष्ठित लोकांशी चर्चा करून ठरवले की महिलांना मताधिकार असावा, पण ठोस निर्णय घेतला गेला नाही. १९१८ पासून या महिलांनी भारतभर या विषयावर जनजागृती सुरू केली. १९१९–२० मध्ये ब्रिटिशांनी विधान परिषदांना अधिकार दिला की त्यांनी ठरवावे की महिलांना मताधिकार असावा की नाही. १९२० मध्ये अनुसूया काळे यांनी नागपूरमध्ये भगिनी मंडळाची स्थापना केली, ज्याने महिलांच्या मताधिकारासाठी जागरूकता वाढवली.

१९२१ मध्ये मद्रास विधानसभेने सर्वाधिक बहुमताने महिला मताधिकाराचा प्रस्ताव मंजूर केला. त्यानंतर मद्रास रेसिडेंसीमध्ये प्रथम कमलादेवी चट्टोपाध्याय आणि रुक्मणी लक्ष्मीपती या दोन्ही स्त्रिया निवडून आल्या. रुक्मणीजी विधानसभेची उपाध्यक्ष आणि महिला मंत्री देखील होत्या. १९२३ मध्ये पहिल्यांदाच महिलांनी विधानपरिषद आणि संसद या दोन्हीसाठी मतदान केले होते.

१९२० मध्ये झालावाड आणि राजकोटमध्येही महिलांना मताधिकार मिळाला. त्याच काळात अनेक महिला युनायटेड किंगडम (ब्रिटन)मध्ये संघर्ष करत होत्या. Lady constance महिला मताधिकारासाठी, एक लेख २ जुलै १९२१ रोजी 'द हिंदू' मध्ये प्रसिद्ध झाला, ज्यात त्यांनी लिहिले होते की, 'भारताच्या महिलांना या अभूतपूर्व विजयाबद्दल अभिनंदन! तुमच्या संघर्षातून संपूर्ण जग प्रेरणा घेत आहे.' भारतीय महिला, त्यांची राजकीय क्षमता आणि त्यांची स्थिती जगात सर्वोत्तम आहे.

१९३७ मध्ये ११ प्रांतांमध्ये निवडणुका झाल्या होत्या. उत्तर प्रदेशमध्ये महिलांना ३% आरक्षण देण्यात आले होते. त्या काळी तिथे सुमारे २०१ विधानसभा जागा होत्या. त्यापैकी सहा जागा महिलांसाठी राखीव

ठेवल्या होत्या. तिथे विजयलक्ष्मी पंडित, बेगम हबीबउल्ला यांनी विजय मिळवला होता. आश्चर्याची बाब अशी की ज्या जागा महिलांसाठी राखीव नव्हत्या, तिथूनही ८ महिला निवडून आल्या होत्या.

१९३५ मध्ये लोथियन समिती स्थापन झाली होती. या समितीत रॅमसन मॅक्डोनाल्ड नावाचे अधिकारी होते. त्यांनी सर्वप्रथम अनुसूचित जाति–समाज, मुस्लिम, शीख, अँग्लो–इंडियन, भारतीय ख्रिश्चन आणि महिला यांच्यासाठी स्वतंत्र क्षेत्र राखण्याची मागणी केली होती आणि इंग्रज शासनाने ती मान्यदेखील केली. कारण इंग्रजांचे दीर्घकालीन धोरण होते 'विभाजन करा आणि राज्य करा'. देशाला विभाजित करणे त्यांचा उद्देश होता. पण त्या धोरणाचा राजकुमारी अमृत कौरसह अनेक प्रबुद्ध महिला नेत्यांनी जबरदस्त विरोध केला. त्या काळातील महिला नेत्यांनी स्पष्टपणे म्हटले की, 'आज जे आरक्षण अनुसूचित जाती, मुस्लिमांसाठी दिले जात आहे, ते पुढे जाऊन मोठ्या विखंडनाचे कारण बनेल, आम्हाला महिलांसाठीही आरक्षण नको आहे.' दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश सरकारने भारतीय सरकारांना बर्खास्त केले, ज्यामुळे महिलांची राजकीय सहभागिता मर्यादित झाली.

यातून हे स्पष्ट होते की आपली राजकीय जागरूकता फक्त कोणत्यातरी सत्ता किंवा शक्ती मिळविण्यापुरतीच मर्यादित नव्हती किंवा फक्त आपण प्रभावशाली होऊ सशक्त होऊ, एवढ्यापुरती मर्यादित नव्हती. परंतु देशहितात, राष्ट्रहितात आणि समाज नैतिकतेच्या हितासाठी काय आवश्यक आहे हे विचार भारतीय स्त्री नेहमीच करत आली आहे. 'लेथियन समिती' समोर जो विरोध झाला तो या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की त्या काळी मुस्लिम, अनुसूचित जाती आणि महिलांसाठी विशेष आरक्षणाच्या मागणीला त्यांनी विरोध केला होता. जरी तो विरोध मान्य झाला नसला तरी.

स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये राष्ट्रीय निवडणुका झाल्या. पहिल्या लोकसभेत २२ महिला सदस्य निवडून आल्या होत्या. १९५२ मध्ये जेव्हा सर्व निवडणुका झाल्या, तेव्हा बंगालच्या सांसद रेणू रे यांनी सर्वप्रथम महिला आरक्षणासाठी प्रश्न उपस्थित केला होता. आपल्याला मिळालेले ३३% महिला आरक्षणाचे बीज, रेणू रे यांनी १९५२ मध्ये रोवलेले आहे.

राज्यसभेची पहिली बैठक १३ जुलै १९५२ रोजी झाली आणि त्यात सहा महिला उपस्थित होत्या. राजकुमारी अमृत कौर या एम्स मेडिकल रुग्णालय सुरु करणाऱ्या पहिल्या मंत्री होत्या. अमृत कौर यांच्यासह आणखी १५ महिला आपल्या संविधान सभेत होत्या.

आरक्षणाचा हा प्रवास दीर्घकाळापासूनचा असून २०२४ साली लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३% आरक्षण मिळाले आहे. अनेक राज्यांमध्ये शहरी संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण आहे. जेव्हा जेव्हा भारतीय महिला आणि राजकारणाची चर्चा होईल, तेव्हा हे निश्चितपणे सिद्ध होईल की महिलांशिवाय राजकारण शक्य नाही, पूर्ण नाही.

# १९४७ पासून आजपर्यंत राजकारणात महिलांचा सहभाग



**डॉ. स्नेहा भगत**

सेंटर फॉर कॅनडा व लॅटीन अमेरीकन स्टडीज इंटरनॅशनल स्कूलमध्ये सहायक प्राध्यापक म्हणून काम करतात. 'कम्युनिकेशन' मधून डिप्लोमा पूर्ण केला असून दिल्लीच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजच्या राज्यशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक म्हणून काम करतात.

जेव्हा आपण महिलांबद्दल आणि राजकारणातील त्यांच्या सहभागाबद्दल बोलतो, तेव्हा हा विषय अनेक दृष्टिकोनातून पाहिला जाऊ शकतो. १९५२ पासून राजकारणात महिलांचा सहभाग, मग तो मतदार म्हणून असो किंवा राजकारणी म्हणून, वाढत आहे. राजकारणात आल्यावर महिलांची वैयक्तिक प्रेरणा काय आहे, त्यांच्या सहभागावर परिणाम करणारे वेगवेगळे घटक कोणते आहेत हे देखील पाहण्याची गरज आहे. घरातील वातावरण कसे आहे? त्यांनी आपली सामाजिक कौशल्ये कशी विकसित केली? त्यांचा राजकीय प्रवास कसा होता? अशा मुद्द्यांच्या आधारे त्यांच्या सहभागाचा विचार करावा लागेल.

राजकारणात महिलांचा सहभाग वाढत आहे. प्रत्येक निवडणुकीत त्यांची टक्केवारी वाढत आहे. २०२४ च्या निवडणुकीत पुरुष आणि महिला मतदारांमध्ये फारसा फरक दिसत नाही. महिला मतदारांची टक्केवारी वाढत आहे. एका अभ्यासानुसार, आगामी २०२९ च्या निवडणुकीत महिलांचा सहभाग पुरुषांपेक्षा खूप जास्त असेल.

राजकारणात महिलांचा सहभाग वाढणे म्हणजे केवळ निवडणुकांमध्ये सहभाग घेणे नव्हे तर मतदानात सक्रिय सहभाग, घरोघरी प्रचार करणे, उमेदवारांसाठी प्रचार करणे, या कामासाठी निधी गोळा करणे. राजकीय बातम्या ऐकणे, राजकीय मुद्यांवर चर्चा करणे, रॅलीमध्ये भाग घेणे, हे प्रकारही महिलांमध्ये वाढत आहेत. विशेषतः महिला मोठ्या संख्येने रॅलीमध्ये सहभागी होत आहेत, सार्वजनिक संस्थांशी संपर्क साधत आहेत, म्हणजे जेव्हा महिला विविध राजकीय किंवा गैर-राजकीय संघटनांमध्ये सामील होऊन राजकीय प्रक्रियेत भाग घेतात, तेव्हा तो एक सकारात्मक पैलू आहे.

जेव्हा आपण भारतीय राजकारणात महिला मतदारांविषयी समजून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा लक्षात येते की महिला आणि पुरुष मतदारांच्या संख्येतला फरक लक्षणीयरित्या कमी झाला आहे. स्वातंत्र्यानंतर महिलांशी संबंधित अनेक कायद्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. उदा. पितृसत्तात्मक संपत्तीमध्ये महिलांना हक्क, सैन्यदलात महिलांना कायमस्वरूपी कमिशन (Permanent Commission), महिला

आरोग्याचा विचार करून विवाहाची किमान वयोमर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव सरकारने मांडला आहे. यामुळे महिलांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महिलांची राजकारणात आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढावा म्हणून सरकारने नारीशक्ती वंदन अधिनियम बील पारित केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, म्हणजे ग्रामपंचायतीत, आधीपासूनच महिलांसाठी आरक्षण आहे आणि त्यामुळे त्यांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे.

१९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पुरुष मतदारांची संख्या महिला मतदारांच्या संख्येपेक्षा १२% अधिक होती. मात्र २०१९ मध्ये महिला–पुरुष मतदारांच्या संख्येत महत्त्वाचा फरक दिसत नाही; पुरुषांचे प्रमाण सुमारे ६६.७% आणि महिलांचे ६६.६% होते.

राजकीय गतिविधींमध्ये महिलांच्या सहभागाचा अभ्यास करताना सर्वप्रथम हा पैलू लक्षात येतो की महिला उमेदवार म्हणून किती यशस्वी आहेत, त्या कितपत सहभाग घेत आहेत? उमेदवार म्हणून त्यांच्यातील फरकही पाहायला मिळतो. १९५२ ते २०१९ पर्यंत महिला उमेदवारांची संख्या आणि निवडून आलेल्या महिला सदस्यांची संख्या सतत वाढत आहे. १९९० नंतर महिलांचा मतदार म्हणून नोंदणीमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. सर्वात मोठा बदल २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत दिसून आला, महिलांचा सहभाग ८% वाढला होता. २०१९ मध्ये लिंगानुसार मतदारांमध्ये अंतर खूप कमी झाले आहे. आजच्या काळात जर आपण राज्यांच्या निवडणुका पाहिल्या, तर राष्ट्रीय निवडणुकीच्या तुलनेत राज्यांच्या निवडणुकांमध्ये लिंगानुसार अंतर अधिक स्पष्ट दिसते. उदा. बिहार, केरळ, मिजोरम, ओडिशा, पंजाब, पश्चिम बंगाल, झारखंड या सर्व राज्यांमध्ये महिलांचा सहभाग जास्त दिसून येतो. बिहार किंवा मिजोराममधील विधानसभा निवडणुकीची चर्चा केली, तर या दोन्ही ठिकाणी स्त्री–पुरुषांमधील अंतर जवळपास कमी झाले आहे.

१९९६ मध्ये लोकसभा निवडणुकीत ७% पेक्षा अधिक महिलांचा सहभाग निवडणुकीच्या बैठकां (मीटिंग्स) मध्ये होता. २०१९ मध्ये ही सहभागिता १८% पेक्षा जास्त झालेली दिसते. जर महिलांच्या सहभागात १०% पेक्षा जास्त वाढ दिसली, तर ती यशस्वी मानली जाते. महिलांना राजकीय दृष्टिकोनातून सक्रिय बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे, पण हे एक आव्हानात्मक काम आहे. ज्या महिला मतदार म्हणून सहभागी झाल्या आहेत, त्यांची वाढती संख्या सकारात्मक बदलांची सुरुवात आहे. जर आपण याला तीन भागांमध्ये वर्गीकृत केले १) अत्यंत सक्रिय २) मध्यम सक्रिय ३) कमी सक्रिय, तर यात महिलांचा सहभाग वाढताना दिसत आहे. राष्ट्रीय निवडणूक अभ्यास सर्वेक्षणाद्वारे २०१९ मध्ये महिला अभ्यासाच्या माध्यमातून गोळा केलेल्या आकडेवारीनुसार गुजरात, पंजाब, दिल्ली सारख्या राज्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महिला मतदार कमी सक्रिय होत्या. विधानसभेच्या निवडणुकीत या राज्यांमध्ये स्त्री–पुरुष मतदारांमध्ये असमानता दिसून आली. केरल, तेलंगणा, झारखंड या राज्यांच्या आकडेवारीनुसार निवडणुकांच्या राजकारणात महिला अधिक सक्रिय होत्या. केरळ आणि झारखंडसारख्या राज्यांमध्ये महिलांची पुरुषांपेक्षा जास्त सहभागिता दिसली ही एक विशेष बाब आहे.

जेव्हा आपण राज्यांची तुलना करतो तेव्हा असे दिसून येते की ग्रामीण आणि शहरी महिलांमध्ये मतदार म्हणून फरक असतो. प्रत्येक राज्याच्या पातळीवर, स्थानिक पातळीवर हा फरक स्पष्ट दिसून येतो. सामाजिक–जनसांख्यिकीय घटकांच्या संदर्भात बोलायचे झाले तर सहभागाच्या पातळीमध्येही फरक असतो. ग्रामीण भारतातील महिलांच्या तुलनेत शहरी महिला सामाजिक जनसांख्यिकीय घटकांवर आधारित अधिक सक्रिय सहभागी दिसतात. मात्र, ग्रामीण पातळीवरील महिलांचा राजकारणात उमेदवार म्हणून अधिक सहभाग दिसून येतो, कारण पंचायतीतून महिलांना मिळालेले अधिकार त्यांना राजकीय दृष्टिकोनातून सशक्त करत आहेत. त्यामुळे ग्रामसभेमध्ये त्यांचा सहभाग वाढतो आहे, तसेच सरपंच पदावरही मोठ्या संख्येने त्यांची निवड होत आहे. ग्रामसभेमध्ये महिलांसाठी राखीव जागा असल्यामुळे त्यांचा राजकारणातील सहभाग आणि सक्रियता वाढत चालली आहे.

अध्ययनातून असे दिसून आले आहे की उच्च शिक्षण आणि राजकीय सहभाग यामध्ये सहसंबंध असतो. शैक्षणिक पार्श्वभूमी चांगली असलेल्या महिलांची सामाजिक जाणीव व कर्तव्याची भावना अधिक मजबूत असते आणि त्या राजकारणाशी अधिक जोडल्या जातात, असा अनुभव आहे. महिलांच्या शिक्षणाचा स्तर आणि राजकीय सहभाग यामधील रेषीय संबंधातही अनेक पैलू असतात. जसे की वय आणि राजकीय सहभाग यामध्ये सकारात्मक सहसंबंध आढळतो. जर आपण याचा अभ्यास केला तर वाढत्या वयाबरोबर सहभाग वाढत चालल्याचे दिसते. जास्त वयाच्या महिला मतदानात अधिक सहभागी असतात. यावरून लक्षात येते की वयाबरोबर राजकीय ज्ञान आणि रसही वाढतो आणि सक्रिय राजकारणात सहभाग घेण्यास प्रेरणा मिळते. उच्च सामाजिक वर्ग राजकीय क्रियाकलापांत महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देतो. निम्न आर्थिक स्तरावरच्या महिलांशी तुलना केल्यास वय, जात, आर्थिक स्तर, शिक्षणाचा दर्जा, परिसर या पाच पैलूंमुळे शहरी आणि ग्रामीण महिलांमध्ये सहसंबंध स्थापित करता येतो. आजकालच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया, फेसबुक, व्हॉट्सअॅप यांमुळे माहिती मिळवणे सोपे झाले असून त्याचा महिलांच्या सहभागावर सकारात्मक परिणाम होतो. माध्यमांमुळे त्यांना कमी वेळात माहिती मिळते. सरकारी योजना महिलांपर्यंत लवकर पोहोचतात. उदाहरणार्थ, तीन तलाक विषयक सरकारचा निर्णय झाला त्याचा परिणाम उत्तर प्रदेशच्या निवडणुकीवर अधिक दिसला. पूर्वी बहुतेक महिलांचे स्वतंत्र बँक खाते नसायचे, परंतु आज अनेक महिलांचे बँक खाते आहे व त्या UPI चा वापर करतात. महिलांमध्ये जागरूकता वाढली आहे आणि त्याचा प्रभाव पुढील निवडणुकीत दिसून येईल.


महिला विविध संस्थांच्या सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण सहभाग घेत आहेत. यावरून आपण म्हणू शकतो, सामाजिक संस्थांमध्ये सहभाग वाढल्यास राजकीय संघटनांमध्येही सहभाग वाढतो असे दिसून येते. उदाहरणार्थ, स्वयंसहायता गट असो वा विद्यार्थी संघ किंवा राजकीय पक्ष, त्यांचे नेतृत्व महिलांकडे असते. जर आपण आकडेवारी पाहिली तर प्रत्येक ५ पैकी १ महिला कोणत्यातरी संस्थेशी जोडलेली असते आणि ती सक्रिय भागीदार ठरते. सहकारी सहभागाचा विचार करता, मिजोराममध्ये इतर राज्यांच्या महिलांच्या तुलनेत ४ पैकी १ महिला अशा संस्थांची सदस्य आहे. झारखंडमध्ये सुमारे ५ पैकी १ महिला अशा संस्थांची सदस्य आहे,

तर ओडिशामध्ये १८% महिला आपला सहभाग देत आहेत. मिजोराममध्ये एनजीओंमध्ये महिलांचा मोठा सहभाग दिसून येतो. अनेक महिला ग्रामीण स्वयंसहायता गटांमध्येही मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत आहेत.


ग्रामीण महिलांबाबत बोलायचं झालं तर त्यांच्याकडे शिक्षण कमी असते. त्या बहुतेक निम्न आर्थिक स्तरातून येतात, त्यांची वैवाहिक स्थिती, रोजगार या मुद्द्यांचाही परिणाम होतो. अशा प्रकारच्या स्वयंसहायता गटांमध्ये जर आपण महिलांचे प्रमाण पाहिलं तर अविवाहित महिलांचा सहभाग विवाहित महिलांच्या तुलनेत जास्त दिसतो. राजकारणात पुरुषसत्तात्मक पद्धती प्रचलित असल्यामुळे उमेदवार म्हणून महिला कमी दिसतात. केरळ, तेलंगणा, झारखंड या राज्यांबाबत बोलायचं झालं तर या राज्यांतील अधिक महिलांनी सरकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून सरकारी कार्यालयांशी संपर्क साधला आहे.

महिलांना घरच्या जबाबदाऱ्या देखील अधिक सांभाळाव्या लागतात, ज्यामुळे राजकारणातील सहभागामध्ये अडचणी निर्माण होतात. महिला संघटना आणि राजकीय पक्षांमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे, पण निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग कमी दिसतो. महिलांचा संघटनांमध्ये आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे.

**Percentage of Women MPs in Lok Sabha**



# २०२४ लोकसभा निवडणुकीत महिलांचा सहभाग



**श्री. अजीत कुमार**

अलाहाबाद विश्वविद्यालयात शिक्षण घेतले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते म्हणून सामाजिक कामाचा विस्तार केला. भा.ज.प.च्या विदेश विभागात अनेक वर्ष काम केले. राजकीय विश्लेषक, राजकीय रणनीती तज्ज्ञ म्हणून काम करतात. भारत सरकारच्या शिक्षण खात्यातील 'राष्ट्रीय पुस्तक न्यास' चे विश्वस्त म्हणून काम करतात.

महिला मतदारांचा भारताच्या राजकारणात महत्त्वपूर्ण सहभाग आहे. महिला मतदारांचा सहभाग भारतीय लोकशाहीत कसा असतो, त्या कोणत्या विचारांनी मतदान करतात, त्या मतदान केंद्रावर जाताना त्यांच्या मनात कोणते विचार असतात? त्या काय विचार करून मतदान करतात? याचा अभ्यास करण्याची गरज आहे.

१९५१ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत फक्त ८% महिलांनी मतदान केले होते. मात्र २०२४ च्या निवडणुकीत ६४.२% महिलांनी मतदान केले आहे. आपल्या देशात आजच्या आकडेवारीनुसार एकूण ९७ कोटी मतदार आहेत, ज्यापैकी ६४ कोटी लोकांनी मतदान केले आहे. त्यापैकी ३१.२ कोटी महिला मतदार आहेत. जर आपण यापूर्वी झालेल्या निवडणुकांचा अभ्यास केला, तर महिला मतदारांच्या संख्येत झालेल्या वाढीबाबत आपल्याला अधिक माहिती मिळेल. आपण २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ या पाच वर्षांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास महत्त्वपूर्ण माहिती आपल्याला समजेल.

जेव्हा २०१५ मध्ये लोकसभा निवडणूक झाली तेव्हा महिला मतदार आपले मुद्दे समजून घेत, आपले विषय लक्षात घेऊन मतदानाच्या पद्धतीत बदल करण्याच्या स्थितीत दिसू लागल्या होत्या. २००६ मध्ये नरेगा धोरण सुरू झाले, नंतर मनमोहन सिंग यांच्या सरकारने याचे नाव बदलून मनरेगा केले. या धोरणामुळे असंगठित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या मतदानाच्या पद्धतीत बदल दिसू लागला. मजूरांना १०० दिवसांचे काम मिळू लागले आणि याचा मतदान टक्केवारीवर परिणाम झाला. टक्केवारीमध्ये वाढ झाली.

दोन-तीन मुख्यमंत्र्यांच्या कार्यकाळाचा बारकाईने अभ्यास करावा लागेल. नवीन पटनायक (ओडिशा), रमणसिंग, शिवराजजी चौहान (म.प्र.), नरेंद्र मोदीजी (गुजराथ) यांनी महिलांच्या स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. नरेंद्र मोदीजींनी गुजराथला 'धोरण केंद्रित राज्य' बनवण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम चांगला झाला. महिला मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान केले. २०१४ मध्ये नरेंद्र मोदीजी निवडून आले

तेव्हा त्यांनी महिला सशक्तीकरणावर अधिक भर दिला. महिला सशक्तीकरणामुळे महिला मतदारांच्या वर्तनातही बदल दिसू लागला.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीसाठी ७९७ महिलांनी उमेदवारी अर्ज भरले होते, त्यापैकी ७४ महिला उमेदवार निवडून आल्या. २०१९ च्या निवडणुकीत ७८ महिला उमेदवार निवडून आल्या होत्या. पूर्वी असं दिसायचं की भारतातील महिला त्यांच्या पती, मुलं किंवा कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांनी ज्या उमेदवारांसाठी मतदान करायला सांगितलं आहे, त्या उमेदवाराला मतदान करायच्या. परंतु हळूहळू महिलांचा मतदानाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. सरकारच्या महिलांसाठी कोणत्या योजना आहेत? त्याचा लाभ काय होणार आहे? हेही महिला समजून घेतात व त्या स्वतंत्रपणे मतदान करतात.

आपल्या देशाच्या संसदेत ५४३ सदस्य आहेत, पण त्यापैकी फक्त ७४ महिला २०२४ च्या निवडणुकीत निवडून आल्या आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे एकूण मतदारसंख्येत महिला आणि पुरुषांमध्ये फारसा फरक नाही; ३३ कोटी महिला मतदार आहेत, तरीही निवडून येणाऱ्या महिलांची संख्या खूपच कमी आहे.

महिला खासदारांची संख्या संसदेत वाढावी म्हणून ३३% राखीव जागा विधेयक मंजूर करण्यात आले आहे, पण ते अजूनही अंमलात आलेले नाही. आपल्या देशाची लोकसंख्या वाढली आहे आणि लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधींची संख्या वाढवावी लागेल, जेणेकरुन ते अधिक लोकांच्या समस्या सोडवू शकतील. सध्या निवडून आलेल्या प्रतिनिधींचे कामाचे ओझे खूप वाढले आहे. त्यामुळे प्रतिनिधींची संख्या वाढवण्याची तरतूद आहे, ज्यामुळे ती ८०० पर्यंत नेली जाईल. आपल्या देशात नव्याने उभारण्यात आलेल्या संसद भवन 'सेंट्रल विस्टा'ची क्षमता ८०० लोकांची ठेवण्यात आली आहे. २०२९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत महिला सदस्यांची संख्या कमीतकमी ३३% राहील.

२०१४ च्या निवडणुकीत आणि नंतर झालेल्या इतर निवडणुकांमध्ये हे दिसून आले की पुरुषांपेक्षा महिलांनी अधिक मतदान केले आहे. २०१४ च्या निवडणुकीत अशी १६ राज्ये आहेत जिथे महिलांनी पुरुषांपेक्षा जास्त मतदान केले आहे. बिहारमध्ये नीतीश कुमार यांच्या सरकारने ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना ड्रेस आणि सायकल दिली, ज्यामुळे महिला मतदारांची संख्या वाढली. बिहारच्या २०२० च्या विधानसभा निवडणुकीत महिलांनी पुरुषांपेक्षा ३% अधिक मतदान केले.

२०१९ मध्ये भाजपाने ५६ महिलांना तिकीट दिले होते, त्यापैकी १३ निवडून आल्या. तृणमूल काँग्रेसने १२ महिलांना तिकीट दिले होते, ज्यापैकी ११ महिला निवडून आल्या. २०२४ च्या निवडणुकीत १९ राज्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांनी अधिक मतदान केले आहे. ही राज्ये आहेत उत्तर प्रदेश, बिहार, अरुणाचल प्रदेश, आसाम, दादरा नगर हवेली, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ, लद्दाख, मणिपूर. केवळ केरळ हे एकमेव राज्य आहे जिथून कोणतीही महिला संसद सदस्य निवडून आलेली नाही.

२०२४ च्या निवडणुकीबद्दल पाहिले तर भाजपाने एकूण ६९ महिलांना तिकीट दिले, ज्यापैकी ३१ निवडून आल्या. काँग्रेसने ४१ महिलांना तिकीट दिले, त्यापैकी ११ महिला निवडून आल्या. बिहारमध्ये

महिला मतदारांनी चांगली सहभागिता दाखवली. आसाम राज्याबद्दल बोलायचे झाल्यास, तेथील मुख्यमंत्र्यांनी मुलींना स्कूटी देण्याचे आश्वासन दिले, ज्याचा महिला मतदारांवर परिणाम झाला.

ज्या देशात लोकशाही अस्तित्वात आहे, तिथे समाजातील जे भेद आहेत, ते विविध प्रकारे दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी नीती तयार केली जाते, ती अंमलात आणण्यासाठी कार्यक्रम आणि योजना आखल्या जातात. आपल्या देशात अनेक समस्या आहेत. जातीय, आर्थिक भेद, भाषा–भेद, शहरी–ग्रामीण फरक, वनवासी भागात राहणाऱ्यांच्या समस्या आणि लिंगभेद. या प्रमुख समस्या दूर करण्यासाठी सरकार विविध योजना आखते. समाजात समरसता, समता आणि समानता निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारचा असतो. त्याच कारणास्तव महिलांच्या राजकारणातील असमानता दूर करण्यासाठी संसदेत महिलांना ३३% आरक्षण देण्याचा प्रयत्न सरकारचा आहे.

जगभरातील आकडेवारी बघितली तर सर्व संसद सदस्यांपैकी फक्त २५% महिला आहेत. फक्त २१ देशांमध्येच महिला प्रमुख आहेत. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली, पण अजूनपर्यंत कोणतीही महिला सचिव झाली नाही. स्त्री–पुरुषांच्या वेतनातही फरक असतो. रवांडा मध्ये ६१.३% संसद सदस्य महिला आहेत. क्यूबामध्ये ५६%, निकारागुआमध्ये ५२%, न्यूझीलंडमध्ये ५१%, ऑस्ट्रेलियामध्ये ४४.४%, युकेमध्ये ३५%, कॅनडामध्ये ३०.६% महिला संसद सदस्य आहेत. आपल्या देशात यापेक्षा कमी महिला संसद सदस्य आहेत. त्यामुळे योग्य धोरण आखण्याची गरज आहे.

महिलांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रत्येक सरकारने प्रयत्न केले, पण २०१४ पासून अनेक योजना राबवण्यात आल्या ज्यामुळे महिलांचा विकास शक्य झाला. जनधन योजना, उज्ज्वला योजना, आवास योजना, स्वच्छता अभियानांतर्गत प्रत्येक घरात शौचालय बनवण्याची योजना, म्हणजेच महिला–केंद्रित योजना तयार करण्यात आल्या आहेत.

विभिन्न राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी महिलांना केंद्रस्थानी ठेवून अनेक योजना आखल्या, ज्याचा लाभ सामान्य महिलांना झाला. नितीश कुमारजींनी बिहारमध्ये दारू बंदीची कार्यवाही केली. गुजराथमध्ये महिलांच्या सुरक्षिततेवर अधिक भर दिला गेला. गुजराथ, बिहार, ओडिशा, उत्तर प्रदेश ही राज्ये महिलांसाठी असुरक्षित मानली जात होती. उत्तर प्रदेशमध्ये कल्याण सिंग, उमा भारतीजी आणि सध्या योगीजी यांनी महिला सुरक्षेवर अधिक भर दिला आहे.

२०१४ नंतर पद्मभूषण पुरस्कार समाजाच्या निम्न स्तरातील महिलांना दिला जात आहे, ज्यांनी सामाजिक कार्यासह मौलिक कामगिरी केली आहे. यामुळे मोदी सरकारचा महिलांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

| महिला राज्यपाल सूची | | | |
|---|---|---|---|
| **नाव** | **पदभार स्वीकार** | **पदमुक्त** | **राज्य** |
| सरोजिनी नायडू | १५ ऑगस्ट १९४७ | २ मार्च १९४९ | उत्तर प्रदेश |
| पद्मजा नायडू | ३ नोव्हेंबर १९५६ | ३१ मे १९६७ | पश्चिम बंगाल |
| विजयालक्ष्मी पंडित | २८ नोव्हेंबर १९६२ | १८ ऑक्टोबर १९६४ | महाराष्ट्र |
| शारदा मुखर्जी | ५ मे १९७७ | १४ ऑगस्ट १९७८ | आंध्रप्रदेश |
| ज्योती वेंकटचलम | १४ ऑक्टोबर १९७७ | २७ ऑक्टोबर १९८२ | केरळ |
| शारदा मुखर्जी | १४ ऑगस्ट १९७८ | ५ ऑगस्ट १९८३ | गुजरात |
| कुमुदबेन मनीशंकर जोशी | २६ नोव्हेंबर १९८५ | २ फेब्रुवारी १९९० | आंध्रप्रदेश |
| राम दुलारी सिन्हा | २३ फेब्रुवारी १९८८ | १२ फेब्रुवारी १९९० | केरळ |
| सरला ग्रेवाल | ३१ मार्च १९८९ | ५ फेब्रुवारी १९९० | मध्य प्रदेश |
| चंद्रावती | १९ फेब्रुवारी १९९० | १८ डिसेंबर १९९० | पाँडिचेरी |
| राजेन्द्रकुमारी बाजपायी | ३ मे १९९५ | २२ एप्रिल १९९८ | पाँडिचेरी |
| शीला कौल | १७ नोव्हेंबर १९९५ | २३ एप्रिल १९९६ | हिमाचल प्रदेश |
| फातिमा बिबी | २५ जानेवारी १९९७ | १ जुलै २००१ | तामिळनाडू |
| वी. एस. रमादेवी | २६ जुलै १९९७ | १ डिसेंबर १९९९ | हिमाचल प्रदेश |
| रजनी राव | २३ एप्रिल १९९८ | २९ जुलै २००२ | पाँडिचेरी |
| वी. एस. रमादेवी | २ डिसेंबर १९९९ | २० ऑगस्ट २००२ | कर्नाटक |
| प्रतिभा पाटील | ८ नोव्हेंबर २००४ | २३ जून २००७ | राजस्थान |
| प्रभा राव | १९ जुलै २००८ | २४ जानेवारी २०१० | हिमाचल प्रदेश |
| मार्गारिट अल्वा | ६ ऑगस्ट २००९ | १४ मे २०१२ | उत्तराखंड |
| कमला बेनिवाल | २७ नोव्हेंबर २००९ | ६ जुलै २०१४ | गुजरात |
| प्रभा राव | २५ जानेवारी २०१० | २६ एप्रिल २०१० | राजस्थान |
| उर्मिला सिंग | २५ जानेवारी २०१० | २७ जानेवारी २०१५ | हिमाचल प्रदेश |
| मार्गारिट अल्वा | १२ मे २०१२ | ७ ऑगस्ट २०१४ | राजस्थान |
| शीला दीक्षित | ११ मार्च २०१४ | २५ ऑगस्ट २०१४ | केरळ |
| कमला बेनिवाल | ६ जुलै २०१४ | ६ ऑगस्ट २०१४ | मिजोराम |
| मृदुला सिन्हा | ३१ ऑगस्ट २०१४ | | कार्यरत गोवा |
| द्रौपदी मुर्मू | १८ मे २०१५ | | कार्यरत झारखंड |
| किरण बेदी | २९ मे २०१६ | | कार्यरत पाँडिचेरी |
| नजमा हेपतुल्ला | २१ ऑगस्ट २०१६ | | कार्यरत मणिपूर |

स्रोत : कायदेनिर्मितीत स्त्रियांचे योगदान; डॉ. विद्या देवधर

# महिला मुख्यमंत्री सूची

| नाव<br>जन्म / मृत्यू | पदभार स्वीकार | पदमुक्त | राज्य | राजकीय पक्ष |
|---|---|---|---|---|
| सुचेता कृपलानी<br>(१९०८–१९७४) | ०२ ऑक्टोबर १९६३ | १३ मार्च १९६७ | उत्तर प्रदेश | इंडियन नॅशनल काँग्रेस |
| नंदिनी सत्पथी<br>(१९३१–२००६) | १४ जून १९७२ | १६ डिसेंबर १९७६ | ओडिशा | इंडियन नॅशनल काँग्रेस |
| शशिकला काकोडकर<br>(१९३५–२०१६) | १२ ऑगस्ट १९७३ | २७ एप्रिल १९७९ | गोवा | गोमंतक पार्टी |
| अन्वरा तैमूर<br>(१९३६–२०२०) | ०६ डिसेंबर १९८० | ३० जून १९८१ | आसाम | इंडियन नॅशनल काँग्रेस |
| जानकी रामचंद्रन<br>(१९२३–१९९६) | ०७ जानेवारी १९८८ | ३० जानेवारी १९८८ | तामिळनाडू | ऑल इंडिया द्रविड मुन्नेत्र कळघम |
| जयललिता<br>(१९४८ –२०१६) | २४ जून १९९१<br>१४ मे २००१<br>०२ मार्च २००२<br>१६ मे २०११<br>२३ मे २०१५ | १२ मे १९९६<br>२१ सप्टेंबर २००१<br>१२ मे २००६<br>२७ सप्टेंबर २०१४<br>०५ डिसेंबर २०१६ | तामिळनाडू | ऑल इंडिया द्रविड मुन्नेत्र कळघम |
| मायावती<br>(जन्म १९५६) | १३ जून १९९५<br>२१ मार्च १९९७<br>०३ मे २००२<br>१३ मे २००७ | १८ ऑक्टोबर १९९५<br>२१ सप्टेंबर १९९७<br>२९ ऑगस्ट २००३<br>१५ मार्च २०१२ | उत्तर प्रदेश | भा.ज.पा. |
| राजेंद्र कौर भट्टल<br>(जन्म १९४५) | २१ नोव्हेंबर १९९६ | १२ फेब्रुवारी १९९७ | पंजाब | इंडियन नॅशनल काँग्रेस |
| राबडी देवी<br>(जन्म १९५५) | २५ जुलै १९९७<br>०९ मार्च १९९९<br>११ मार्च २००० | ११ फेब्रुवारी १९९९<br>०२ मार्च २००५<br>०६ मार्च २००५ | बिहार | राष्ट्रीय जनता दल |
| सुषमा स्वराज<br>(१९५२ – २०१९) | १२ ऑक्टोबर १९९८ | ०३ डिसेंबर १९९८ | दिल्ली | भा. ज. पा. |

## महिला मुख्यमंत्री सूची

| नाव<br>जन्म / मृत्यू | पदभार स्वीकार | पदमुक्त | राज्य | राजकीय पक्ष |
|---|---|---|---|---|
| शीला दीक्षित<br>(१९३८-२०१९) | ०३ डिसेंबर १९९८ | २८ डिसेंबर २०१३ | दिल्ली | इंडियन नॅशनल काँग्रेस |
| उमा भारती<br>(जन्म - १९५९) | ०८ डिसेंबर २००३ | २३ ऑगस्ट २००४ | म. प्रदेश | भा. ज. पा. |
| वसुंधरा राजे<br>(जन्म - १९५३) | ०८ डिसेंबर २००३<br>१३ डिसेंबर २०१३ | १३ डिसेंबर २००८<br>१७ डिसेंबर २०१८ | राजस्थान | भा. ज. पा. |
| ममता बॅनर्जी<br>(जन्म - १९५५) | २० मे २०११ | -- | प. बंगाल | तृणमूल काँग्रेस |
| आनंदीबेन पटेल<br>(जन्म - १९४१) | २२ मे २०१४ | ०७ ऑगस्ट २०१६ | गुजराथ | भा. ज. पा. |
| मेहबुबा मुफ्ती<br>(जन्म - १९५९) | ०४ एप्रिल २०१६ | १९ जून २०१८ | जम्मू आणि काश्मिर | जम्मू आणि काश्मिर पिपल्स डेमॉक्रॅटीक पार्टी |
| अतिशी<br>(जन्म - १९८१) | २१ सप्टेंबर २०२४ | २० फेब्रुवारी २०२५ | दिल्ली | आम आदमी पार्टी |
| रेखा गुप्ता | २० फेब्रुवारी २०२५<br>(जन्म १९७४) | | दिल्ली | भा. ज. पा. |

स्रोत : कायदेनिर्मितीत स्त्रियांचे योगदान; डॉ. विद्या देवधर

**State/UT-wise number of Elected Representatives and Elected Women Representatives in Panchayati Raj Institutions in the country**

| S. No. | State / UTs | Number of Elected Representatives in Panchayati Raj Institutions | Number of Elected Women Representatives in Panchayati Raj Institutions |
|---|---|---|---|
| 1. | Andaman & Nicobar Islands | 858 | 306 |
| 2. | Andhra Pradesh | 156050 | 78025 |
| 3. | Arunachal Pradesh | 9383 | 3658 |
| 4. | Assam | 26754 | 14609 |
| 5. | Bihar | 136573 | 71046 |
| 6. | Chhattisgarh | 170465 | 93392 |
| 7. | Dadra & Nagar Haveli | 147 | 47 |
| 8. | Daman & Diu | 192 | 92 |
| 9. | Goa | 1555 | 571 |
| 10. | Gujarat | 144080 | 71988 |
| 11. | Haryana | 70035 | 29499 |
| 12. | Himachal Pradesh | 28723 | 14398 |
| 13. | Jammu & Kashmir | 39850 | 13224 |
| 14. | Jharkhand | 59638 | 30757 |
| 15. | Karnataka | 101954 | 51030 |
| 16. | Kerala | 18372 | 9630 |
| 17. | Ladakh | 1661 | 515 |
| 18. | Lakshadweep | 110 | 41 |
| 19. | Madhya Pradesh | 392981 | 196490 |
| 20. | Maharashtra | 240635 | 128677 |
| 21. | Manipur | 1736 | 880 |
| 22. | Odisha | 107487 | 56627 |
| 23. | Puducherry* | - | - |
| 24. | Punjab | 100312 | 41922 |
| 25. | Rajasthan | 126271 | 64802 |
| 26. | Sikkim | 1153 | 580 |
| 27. | Tamil Nadu | 106450 | 56407 |
| 28. | Telangana | 103468 | 52096 |
| 29. | Tripura | 6646 | 3006 |
| 30. | Uttar Pradesh | 913417 | 304538 |
| 31. | Uttarakhand | 62796 | 35177 |
| 32. | West Bengal | 59229 | 30458 |
| | **Total** | **3188981** | **1454488** |

* Panchayat elections in Puducherry have not been conducted after 2011.

***

Sourse: https://mospi.gov.in/sites/default/files/reports_and_publication/statistical_publication/Women_Men/mw24/DecisionMaking.pdf



स्वत:च्या कुटुंबासाठी हवे

**स्वत:चे घर,**

ठेवा विश्वास जनसेवेच्या

**'घरकुल' कर्जावर !**

# जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

* अटी लागू

- आकर्षक व्याजदर
- तत्पर सेवा
- अल्प प्रोसेसिंग फी
- रु. 2 कोटींपर्यंत कर्ज


**संपर्क क्र. - 84 85 87 12 52**


## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.


जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net













































# दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र

**१३६०, भारत भवन, शुक्रवार पेठ, सरस्वती मंदिर शाळेच्यामागे,**

**पुणे ४११००२ (महाराष्ट्र)**

**संपर्क क्रमांक – ८६६८२१०१७४**


**- विशेषांक २०२५-**